


समताशक्ती महिला नागरी सहकारी पतसंस्था, बीड

समताशक्ती

# समताशक्ती

## महिला उद्योजक विशेषांक 2025

# समता प्रतिष्ठान, बीड

## संचालक मंडळ

(२०२१ ते २०२६)

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | कॉ. त्र्यंबक भगवानराव हरगंगे | अध्यक्ष |
| २ | कौशल्या अरुण बावणे | उपाध्यक्ष |
| ३ | किरण नागेशराव घाटगे | सचिव |
| ४ | अनिता सुरेश पाडुळे | सहसचिव |
| ५ | राम भीमराव शेळके | कोषाध्यक्ष |
| ६ | राधाकृष्ण काकंडीकर | कार्यकारिणी सदस्य |
| ७ | अशोक सुंदरराव दुबाले | कार्यकारिणी सदस्य |
| ८ | आयोध्या नामदेव टपले | कार्यकारिणी सदस्य |
| ९ | मंदार वाळवेकर | कार्यकारिणी सदस्य |
| १० | मंगल पाराजी कुरे | कार्यकारिणी सदस्य |
| ११ | संतोष बाबाराव प्रभावती | कार्यकारिणी सदस्य |
| १२ | संगीता पंडितराव पाठक | विशेष निमंत्रित सदस्य |
| १३ | शुभांगी सुभाष कुलकर्णी | विशेष निमंत्रित सदस्य |
| | मार्गदर्शक / सल्लागार मंडळ | |
| १ | डॉ. मेधाताई सामंत (पुरव), अन्नपूर्णा परिवार, पुणे | मार्गदर्शक सल्लागार |
| २ | डॉ. सुजाताताई खांडेकर, कोरो, मुंबई | मार्गदर्शक सल्लागार |
| ३ | कॉ. विश्वास उटगी, मुंबई | मार्गदर्शक सल्लागार |
| ४ | कॉ. देविदास तुळजापुरकर, छत्रपती संभाजीनगर | मार्गदर्शक सल्लागार |

# आमचे प्रेरणास्थान



# पद्मश्री कॉ. प्रेमाताई पुरव

संस्थापक सचिव

## अन्नपूर्णा महिला मंडळ, मुंबई

पद्मश्री कॉ. प्रेमाताई पुरव, या ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक तथा सामाजिक कार्यकर्त्या असून त्यांचा गोवा मुक्ती संग्राम व संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात सक्रीय सहभाग होता. ताई अन्नपूर्णा महिला मंडळ, मुंबईच्या संस्थापक सचिव होत्या. मुंबईतील लाखो गरीब महिलांना रोजगार मिळवून देण्यासाठी व त्यांच्या स्वाभिमानी-आत्मनिर्भर जगण्यासाठी आयुष्य वेचणाऱ्या प्रेमाताईंना

**विनम्र अभिवादन !**

जन्म दिनांक : १५ ऑगस्ट १९३५ स्मृतिदिन : १ जुलै २०२४

नोंदणी क्रमांक :- बीएचआर /बीएचआऱ/आऱ एस आऱ /सीआऱ /१५२/२०२१

# समताशक्ती महिला नागरी सहकारी पतसंस्था, बीड

## संचालक मंडळ

(२०२३ ते २०२८)

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | संगीता पंडितराव पाठक | अध्यक्ष |
| २ | शुभांगी सुभाषराव कुलकर्णी | कार्यकारी संचालक |
| ३ | कौशल्या अरुण बावणे | संचालिका |
| ४ | सीमा शाम कैवाडे | संचालिका |
| ५ | संगीता सतीश महामुनी | संचालिका |
| ६ | लैलाबी अफसर पठाण | संचालिका |
| ७ | सुरेखा धोंडीराम होंडरे | संचालिका |
| ८ | उषा दिनकर नागरगोजे | संचालिका |
| ९ | वर्षा अशोक दुबाले | संचालिका |
| १० | सुरेखा दत्तात्रय देवकते | संचालिका |
| ११ | पल्लवी संजय मगर | संचालिका |
| १२ | किरण नागेशराव घाटगे | व्यवस्थापक |
| १३ | हरगंगे त्र्यंबक भगवानराव | तज्ञ संचालक |
| १४ | संतोष बी.पी | तज्ञ संचालक |

# प्रास्ताविक

समता प्रतिष्ठानच्या रौप्य महोत्सवी (२५ व्या) वर्धापन दिनानिमित्त आणि समता प्रतिष्ठानचे अध्यक्ष कॉ. त्र्यंबक हरगंगे यांच्या अमृत महोत्सवी (७५ व्या) वाढदिवसानिमित्त **'समताशक्ती उद्योजक महिला महामेळावा'** दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी बीड येथे आयोजित करीत आहोत. या निमित्ताने ७५ उद्योजक महिलांची माहिती पुस्तिका प्रकाशित करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

समता प्रतिष्ठान बीड या चळवळीची सुरुवात २००१ मध्ये वर्ल्ड सोशल फोरम, भारत ज्ञान विज्ञान समिती, जन आरोग्य अभियान, अन्नपुर्णा परीवार यापासून प्रेरणा घेत समता, बंधुता, लोकशाही, स्वातंत्र्य, जागतिक शांतता, स्त्री पुरुष समानता, आर्थिक साक्षरता व साम्यवाद, समाजवाद, धर्म निरपेक्षता ही मूल्ये समाजात रुजावीत व वृध्दींगत व्हावीत यासाठी कऱण्यात आली. या कार्यासाठी बीड मधील आम्हा सर्व कार्यकर्त्यांच्या पाठीशी आमचे प्रेरणास्थान कॉ. त्र्यंबक हरगंगे (काका) हे सक्रीयपणे उभे होते, आहेत. आज काकांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. तसेच समताचे काम सुरू केले त्याला देखील २५ वे वर्षे लागत आहे. १९९५ ते २००० या काळात आम्ही BGVS, जन आरोग्य अभियान, लोक प्रतिष्ठान, वर्ल्ड सोशल फोरम या मार्फत विविध सामाजिक, शैक्षणिक, ज्ञान विज्ञान प्रसार असे उपक्रम राबविले. पुढे समताने प्रामुख्याने महिला सक्षमीकरण व स्वावलंबन या विषयावर कार्य करावे असे ठरले त्यातूनच बचत गट व महिला सक्षमीकरणासाठी पॅक्स प्रकल्पा अंतर्गत अन्नपुर्णा महिला मंडळ यांचे मार्फत व डॉ.मेधा सामंत पुरव यांच्या मार्गदर्शनाने कार्य सुरू झाले.नंतर महिला सहकारी पतसंस्थामार्फत महिलांसाठी आर्थिक साक्षरता व सक्षमीकरण उपक्रम सुरू केले यासाठी अन्नपुर्णा महिला मंडळ मार्फत कर्ज उपलब्ध झाले त्यातूनच हे काम वाढत गेले.

कोरो साक्षरता समिती मार्फत ग्रासरुट फेलोशिपमधुन महिला कार्यकर्त्यांसाठी स्थानिक नेतृत्व विकास कार्यक्रमामार्फत समताच्या २० महिला कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. तसेच एकल महिला संघटना स्थापनेत देखील समताने सक्रिय सहभाग घेतला आहे. आरोग्य सेवांवरील लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेत समता प्रतिष्ठानचा सहभाग उल्लेखनीय राहिलेला आहे. यातून प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र, आंगणवाडी तसेच गावातून दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवा व त्यावर लोकांची देखरेख यात समतातील महिलांनी विशेष सहभाग घेतला आहे. यात मानव लोक ही जिल्हा समन्वय संस्था होती तर समता ही बीड तालुका समन्वय संस्था होती. महिलांच्या साक्षरता व वाचन संस्कृती जोपासण्यासाठी समताच्या पुढाकाराने भारतरत्न कॉ. अरुणा आसफ अली सार्वजनिक वाचनालय सुरु करण्यात आले आहे. समता महिला बचत गट सदस्यांची सहकारी पतसंस्था व समताशक्ती महिला सहकारी पतसंस्था मार्फत समताने महिलांमध्ये आर्थिक साक्षरता व स्वावलंबन यासाठी नियमीत बचत व गरजेनुसार वारंवार उपलब्ध होणारे कर्ज यातून समता सभासदांना उद्योग – व्यवसाय सुरु करण्यासाठी भांडवल उपलब्ध झाले आणि आपण आर्थिक विकास करण्यासाठी व्यवसाय करु शकतो हा विश्वास निर्माण झाला.

बीड तालुका समता महिला पतसंस्थेला सुरुवातीला अन्नपुर्णाने फ्रेंचायसी स्किममधुन कर्ज पुरवठा उपलब्ध करुन दिला. महाराष्ट्र ग्रामीण बँकेने पुढे रू.५० लाखाचे कॅश क्रेडिट कर्ज उपलब्ध करून दिले. समता सभासदांनी गेल्या पाच वर्षांपासून सर्व कर्ज परतफेड करीत पतसंस्था स्वावलंबी केली आहे. आज रोजी ५००० सभासदांच्या रू ३५०.०० लाख ठेवी असून रु. ३०० लाख कर्ज येणेबाकी आहे. या सर्व कामाचा सकारात्मक परिणाम म्हणजे समताच्या सुमारे ५०० महिला उद्योजक, व्यावसायिक झालेल्या आहेत. त्यातील निवडक व सुमारे तीन वर्षापासून उद्योग व्यवसाय करणाऱ्या ७५ महिलांची माहिती पुस्तिका या कार्यक्रमात प्रकाशित करण्यात येत आहे. या सर्व कामात गेल्या २५ वर्षांत खूप चढउतार पाहिले. अनेक अडीअडचणींवर मात केली कारण कॉ. त्र्यंबक हरगंगे काका दीपस्तंभासारखे समताच्या मागे

खंबीरपणे सक्रिय होते. या पार्श्वभूमीवर हा समताशक्ती उद्योजक महिला महामेळावा आयोजित करण्यात येत आहे. तसेच यावर्षीपासून कॉ.त्र्यंबक हरगंगे यांच्या पुढाकाराने आपण **'पद्मश्री कॉ. प्रेमाताई पुरव महिला उद्योजक पुरस्कार'** समता परिवारातील सदस्य महिला उद्योजीकेस देण्याचा संकल्प करीत आहोत. यावर्षी हा पुरस्कार दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी देत आहोत तर पुढील वर्षीपासून दरवर्षी ८ मार्च, जागतिक महिला दिनी हा पुरस्कार वितरीत करण्यात येणार आहे.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत उद्योजकता व व्यवसायिकता यांचे महत्व आहे. स्वावलंबी व स्वयंपूर्ण होण्यासाठी महिलांनी बचत व कर्ज याच्या पुढे जाऊन स्वतःचे उद्योग, व्यवसाय सुरु केले पाहिजेत ही समता प्रतिष्ठानची व त्याच्या सहयोगी पतसंस्थांची कायम भूमिका राहिली आहे. त्यासाठी समता परिवाराने पुढाकार घेत विविध प्रशिक्षण आयोजित केलेले आहेत. यासाठी नाबार्ड, जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा ग्रामोद्योग केंद्र, एमसीईडी अशा संस्थासोबतही महिलांची प्रशिक्षणे वारंवार आयोजित केली जातात. महिलांचा सामाजिक, आर्थिक, सांकृतिक, शैक्षणिक, कौटुंबिक, राजकीय स्तरावरील विकास व निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढवायचा असेल तर त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहणे व स्वावलंबी होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी समता परिवार सतत प्रयत्नशील आहे. ही जरी ७५ महिलांची यशोगाथा असली तरी यापुढे जाऊन समता परिवार सभासद असलेल्या सुमारे ५०० महिला आपले छोटे मोठे उद्योग, व्यवसाय करीत आहेत व त्यांची व त्यांच्या कुटुंबाची आर्थिकदृष्ट्या उन्नती करीत आहेत. महिलाच्या हातात आर्थिक निर्णय आल्यावर त्याच्या कुटुंबातील मुलामुलींच्या शिक्षणासाठी चांगला उपयोग होतो हे दिसून आले आहे. बचत व गुंतवणूक या आर्थिक साक्षरतेतील महत्वाचा टप्पा आता समता परिवारातील महिला सभासदाच्या लक्षात आला आहे. तसेच कोठून कर्ज घ्यावे, कर्जावरील व्याजदर या बाबीची समज निर्माण झाल्यामुळे महिला आपल्या खर्चासाठी सावकाराकडे जायच्या थांबल्या आहेत हे दिसून येत आहे. खर्च कोठे करायचा व कोठे खर्चाला आवर घालायचा याचे एक आत्मभान समता परिवारातील सदस्य महिलांना आलेले आहे.

एखाद्या सामाजिक संघटनेने पंचवीस वर्षाचा टप्पा गाठावा हे आजच्या युगात महत्वपूर्ण आहे, सभासदाचा दुर्दम्य विश्वास व आपण समताने हाती घेतलेले कार्य व त्याची सभासदांना असलेली गरज हे यामागचे सूत्र आहे. संघटनेची पुढील वाटचाल अधिक यशस्वी व सभासदांसाठी फलदायी व्हायला हवी यासाठी आपण उद्योजक महिला सभासदाच्या या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करीत आहोत.

यावेळी आपण जरी ७५ महिला उद्योजकाची माहिती देत असलो तरी पुढील काही वर्षात दरवर्षी किमान ७५ ते १०० महिलांची माहिती असलेली पुस्तिका आपण नक्की प्रकाशित करू. यंदा आपण ही पुस्तिका छपाई करून प्रकाशित करीत आहोत. यापुढे मात्र आपण डिजिटल फॉर्म मध्ये या पुस्तिका प्रकाशित करूत. या पुस्तिकेसाठी ज्या ज्या महिलांनी त्यांची माहिती दिली व ती फोटोसह प्रकाशित करण्यासाठी संघटनेला परवानगी दिली त्यासाठी संस्था त्याचे आभारी आहे. या सभासदाच्या उद्योगाची माहिती संकलित करणे हे खूप जिकरीचे काम होते पण समताच्या सर्व फिल्ड ऑफिसर्स कौशल्याताई, अनिताताई, गीताताई, छायाताई, कल्पनाताई, आयोध्याताई, अशोकभाऊ, शुभांगी यांनी अवघ्या एका महिन्यात या ७५ महिलांची माहिती संकलित केली व ती या पुस्तिकेच्या रूपाने आपल्यापर्यंत पोहचवता आली आहे. या माहितीचे संपादन समताचे पूर्णवेळ कार्यकर्ते किरण घाटगे व शुभांगी कुलकर्णी यांनी केले आहे. तर छपाई रोहिणी ऑफसेटचे श्री. मनगटे यांनी करून दिली आहे.

यासर्व कामासाठी ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्या सर्वांचे मनापासून आभार.

**संगीता पाठक**
**अध्यक्षा**
**समता शक्ती महिला सहकारी पतसंस्था म. बीड**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | नाव व गाव | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | छाया बापूराव सातपूते, बहिरवाडी, बीड | ०७ |
| २ | करुणा संजय मगर, धानोरा रोड, बीड | ०८ |
| ३ | अर्चना अनंत आवारे, पिंपळादेवी, बीड. | १० |
| ४ | रोहिणी शिवाजी मस्के, पालवण, बीड | १२ |
| ५ | मंगल पाराजी कुरे, अंतरवन पिंपरी, बीड. | १३ |
| ६ | संगीता प्रकाश जाधव, बहिरवडी ता.जि. बीड | १५ |
| ७ | अक्तरबी सुभानखान पठाण, खामगाव ता.जि. बीड | १६ |
| ८ | सत्वशीला अंगद घाडगे, आहेर वडगाव | १७ |
| ९ | मंजू कमलेश चंदेल, नरसोबा नगर, बीड | १८ |
| १० | सुरेखा धोंडीराम होण्डरे, ढेकनमोहा | १९ |
| ११ | रत्नमाला भीमराव माने, मुर्शदपूर | २० |
| १२ | वंदना गौतम वीर, पाली | २१ |
| १३ | कोमल गणेश गलांडे, ढेकनमोह | २२ |
| १४ | सुरेखा अशोक देवकाते, ढेकनमोहा | २३ |
| १५ | रुपाली गोरख पांचाळ, ग्रामसेवक कॉलोनी, बीड | २४ |
| १६ | सुशीला मोहन थापडे, ढेकनमोहा | २५ |
| १७ | राजश्री गोरख होण्ड्रे, ढेकनमोहा | २६ |
| १८ | विजया हिरालाल सोनी, चाऱ्हटा फाटा, बीड | २७ |
| १९ | अर्चना आनंत डोंगरे, शनी मंदिर गल्ली, बीड | २८ |
| २० | देवई भागवत केंगार, मुर्शदपूर | २९ |
| २१ | शेख शेहनाज शेख अखिल, गोरे वस्ती, बीड | ३० |
| २२ | विजुबाई नंदकुमार घुमरे, शहाजानपूर | ३१ |
| २३ | रेखा संजय गायकवाड, गोविंद नगर, बीड | ३२ |
| २४ | संगीता सतीश महामुनी, अयोध्या नगर, बहिरवाडी, बीड. | ३३ |
| २५ | अर्चना नवनाथ मस्के. बीड. | ३४ |
| २६ | शाहिन बशीर शेख, सुर्डी ता.जि. बीड | ३५ |
| २७ | शिवकन्या सतिश भोकरे, बहिरवाडी, बीड | ३६ |
| २८ | शितल विनोद रामदासी, गया नगर, बीड. | ३७ |
| २९ | संगीता राजेश क्षीरसागर, बीड | ३८ |
| ३० | जाधव अनिता महादेव, जाधववाडी, ता.जि. बीड | ३९ |
| ३१ | शैला सुहासराव देशमुख, चक्रधर नगर, बीड | ४० |
| ३२ | सुरेखा भिमोद भोगे, ढेकणमोह, बीड | ४२ |
| ३३ | फटाले शिवकन्या बाबासाहेब, बहिरवाडी, बीड | ४३ |
| ३४ | मंगल बाबासाहेब मस्के, पालवण, ता.जि. बीड. | ४४ |
| ३५ | उषा दिनकर नागरगोजे, वडगाव, ता.जि. बीड | ४५ |
| ३६ | सुहाशिनी राम बचूटे, प्रकाश आंबेडकर नगर, इमामपूर रोड, बीड | ४६ |
| ३७ | सागर विशाल बचूटे, प्रकाश आंबेडकर नगर, बीड | ४७ |

३८ मोमीन खैरोनीसा जब्बार मिया, प्रकाश आंबेडकर नगर, बीड ....४८
३९ मोहर लहू गोरे, दगडी शहाजनपूर, बीड ....४९
४० अंजली अशोक बेदरे, सराफ लाईन धोंडीपुरा, बीड ....५०
४१ वणवे जिजाबाई संतोष, बीड ....५१
४२ आशा रामप्रसाद कोल्हे....५२
४३ फटाले स्वाती दत्ता....५३
४४ कविता गोकुळ गायकवाड ....५४
४५ पुनम बाबासाहेब बिरलिगे, नेकनुर ता.जि. बीड....५५
४६ ज्योती आनंदस्वामी तेवर, बीड ....५६
४७ उषा गोरख कांबळे, बहिरवाडी, बीड ....५७
४८ सुनिता सुधाकर जगताप, मुर्शदपूर, ता.जि. बीड....५८
४९ संगीता सुनील जाधव, बहिरवाडी, बीड ....५९
५० संगीता अनंतराव वानरे, स्नेह नगर, बीड ....६०
५१ राधा इंद्रजीत चित्रे, वांगी, बीड....६१
५२ मंदाकिनी विष्णू खेत्रे, लिंबारुई ता.जि. बीड ....६२
५३ सुजाता प्रशांत वासनिक, बीड ....६३
५४ सीमा प्रवीण डोळसे, कृषी कॉलनी, बीड....६४
५५ बबिता रेणुकादास मुळे, भक्ती कॅन्स्ट्रक्शन, बीड ....६५
५६ संगीता प्रकाश काळे, बीड ....६६
५७ अरुणा अनिल केंगार, मुर्शदपूर....६७
५८ सुनीता संतराम जाधव, जाधववाडी ....६८
५९ शैला प्रेमदास केंगार, मुर्शदपूर ता.जि. बीड....६९
६० शबाना मुख्तार शेख, बीड ....७०
६१ ज्योती प्रभाकर नागरगोजे, वडगाव-गुंधा, बीड....७१
६२ ललिता नागेश शृंगारे, भक्ती कंट्रक्शन, बीड ....७२
६३ सोनाली शशिकांत आगळे, तिरुपती नगर, बीड ....७३
६४ निकिता दीपक आगळे, सराफ लाईन धोंडीपुरा, बीड ....७४
६५ राधा बाळू शेळके, मैंदा ता.जि. बीड ....७५
६६ संजीवनी पंढरीनाथ मोरे, गोविंद नगर, बीड ....७६
६७ अनिता संतोष राऊत, काळेगाव, बीड ....७७
६८ भाग्यश्री अंगद खांडे, म्हाळस जवळा, बीड....७८
६९ रंजना रमेश इनामदार, मानकुरवाडी, बीड ....७९
७० भाग्यश्री विश्वंभर खडके, विप्रनगर, बीड ....८०
७१ छाया संजय घुमरे, मैदा ता. जि. बीड ....८१
७२ ज्योती विलास काळे, पालवण, बीड....८२
७३ मीना पांडुरंग जोगदंड, गोरेवस्ती ता.जि. बीड ....८३
७४ उषा बालाजी गळांगे, बहिरवाडी, बीड ....८४
७५ सरस्वती बाबासाहेब ठाकरे, स्नेह नगर, सटवाई मैदान, बीड ....८५
७६ विमल मोहन चव्हाण, दगडी शहाजनपूर, बीड ....८६
७७ राणी संगपाल शेजवळ, बहिरवाडी, बीड ....८७
७८ शालन अशोक उमप, नामलगाव, बीड ....८८



| | |
|---|---|
| नाव | छाया बापूराव सातपूते |
| गाव | बहिरवाडी, बीड |
| वय | ५५ वर्ष |
| शिक्षण | ३ री |
| व्यवसाय | बूट, चप्पल बनवणे. |
| बचत गट नाव | पूजा समता महिला बचत गट |

**छाया सातपुते** या बहिरवाडीच्या रहिवाशी असुन त्यांचे पती एमआयडीसीमधील चमडा फॅक्टरीमध्ये नौकरी करायचे. सर्व काही सुरळीत सुरु असताना अचानक फॅक्टरी बंद पडली. कुटुंबाच्या उत्पन्नाचे एकमेव साधन पण गेले. हाताला काम नाही अन पोटाला दाणा नाही. मिळेल ते काम करून पोट भरावे लागत होते. काही काळ शेतात मजूर म्हणून दोघांनी काम केले. नवऱ्याला चांगले बूट व चप्पल बनवण्याचे काम जमत होते पण हातात कला असुन भांडवल नव्हते. व्यवसाय करावा तर कसा करावा काही सुचत नव्हते पण जगण्याची धडपड सुरुच होती. याच काळात त्या पूजा नावाच्या बचत गटात येऊन समताच्या सभासद झाल्या. पहिले पाच हजाराचे कर्ज त्यांनी घेतले व यातून त्यांनी चप्पल, बूट व्यवसायासाठी लागणारा चमडा विकत आणण्यासाठी वापरला. छोटी का होईना व्यवसायाची सुरुवात झाली. जसजसा काळ पुढे सरकत गेला तसतसा कर्जाचा आकडाही बदलत गेला. घेतलेले कर्ज व्यवसायात लावायचे अन व्यवसाय वाढवायचा असे त्यांचे सुरु होते. आज घडीला त्यांनी तिसऱ्यांदा पन्नास हजाराचे कर्ज घेऊन आपल्या व्यवसायाला लावले आहे. आपल्या नवऱ्यासोबत त्या सुद्धा या कामात स्वतः चपला, बूट बनवतात.

एकवेळ सकाळी जेवण केल्यानंतर रात्रीच्या जेवणाचे काही खरे नव्हते असा कठीण काळ ते आता परिश्रमातून, कष्टातून व तेवढ्याच जिद्दीने उभे केलेले स्वतःचे दुकान असा लढा छायाताई व त्यांचे पती यांनी लढत यशस्वी केला. हे सर्व करत असताना त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे सुद्धा दुर्लक्ष होऊ दिले नाही. दोन्ही मुलींचे शिक्षण पुर्ण करून त्यांचे यथासांग लग्नही लावून दिले आहे व मुलाचेही शिक्षण चांगले सुरु आहे. गटात आल्यावर समताच्या कार्यक्रम, शिबिरातून मिळालेले आर्थिक साक्षरतेचे धडे शिक्षण कमी असताना सुद्धा त्यांनी चांगल्याप्रकारे अंगिकारले व त्यातून एक यशस्वी महिला उद्योजकतेची वाट चालत राहिल्या व आजही चालत आहेत. गटाचे महत्व, गटातील चर्चा, कर्जाचा व बचतीचा नियमित भरणा यातून त्यांच्या गटाला प्रेमताई पुरव उत्कृष्ट समता बचत गट या पुरस्काराने देखील गौरविण्यात आलेले आहे. गेल्या चौदा वर्षापासून सुरु असलेला त्यांचा गट आजही त्याच उत्साहाने सुरु आहे.



| | |
|---|---|
| नाव | करुणा संजय मगर |
| गाव | धानोरा रोड, बीड |
| वय | ३८ वर्ष |
| शिक्षण | बी.ए. |
| व्यवसाय | ब्युटी पार्लर, बुटीक |
| बचत गट नाव | हिरकणी समता महिला बचत गट |

**करुणा संजय मगर** यांचे माहेर नाथापूरचे लग्न खूप कमी वयात झाले. पती बीड शहरांमध्ये नोकरीला असल्यामुळे त्या येथे येऊन स्थायिक झाल्या. कुटुंबाची म्हणावी तशी आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे कुटुंबाचा गाडा पुढे घेऊन जाणे अवघड वाटत होते. घरच्या कामातून वेळ काढून शिवणकामाचे प्रशिक्षण घेऊ लागल्या. शिकण्याची प्रचंड जिद्द असल्यामुळे इतरही व्यवसायाचे प्रशिक्षण त्या करू लागल्या. त्यात प्रामुख्याने अगरबत्ती, मेणबत्ती, केक बनवणे, विणकाम यांचेहि त्यांनी प्रशिक्षण घेतले. घरची आर्थिक परिस्थिती खूप नाजूक असल्यामुळे प्रशिक्षणासाठी त्या तब्बल पाच किलोमीटर दूर पायी जाऊन प्रशिक्षण पुर्ण करायच्या. विविध व्यवसायाचे यशस्वी प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर व्यवसाय करायचा म्हणजे पैसा लागणारच! पण आर्थिक बाजू कमकुवत असल्यामुळे त्यांनी बीडमधील जनशिक्षण संस्थेमध्ये नौकरी करण्याचे ठरवले. यात त्या मुलींना व्यवसायाचे प्रशिक्षण देऊ लागल्या. या कामातून त्यांना दरमहा सातशे रुपये पगार मिळू लागला.

पतीच्या अचानक निधनाने कुटुंबाचा सारा भार त्यांच्यावर पडला. त्यामुळे आर्थिक परिस्थिती अजूनच खालावत गेली. अश्या परिस्थितीत जवळच्यांनी सुद्धा साथ सोडली. सुरुवातीपासून संघर्ष करण्याची तयारी असल्यामुळे त्या सुद्धा जिद्दीने पुन्हा उठल्या व कामाला लागल्या. दोन मुली व एक मुलगा असं त्याचं कुटुंब हेच त्यांचे आधार बनून त्यांच्यासोबत राहिले होते. कुटुंबाच्या दैनंदिन गरजा व त्यांचे शिक्षण अशी मोठी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर येऊन पडली होती. त्यांच्या काही मैत्रिणी समताच्या बचत गटामध्ये होत्या. त्यांनी करुणा ताईंना बचत गटामध्ये सहभागी करून घेतले. ताई आता समताच्या नियमित सभासद झाल्यामुळे त्यांनी पहिले पाच हजार रुपयांचे कर्ज घेऊन शिलाई मशीन घेतली. आपल्या घरासमोर ब्लाउज शिवून मिळेल असा बोर्ड लावला. बोर्ड बघून हळूहळू त्यांच्याकडे महिला काम घेऊन येऊ लागल्या. असा छोटेखाणी व्यवसाय सुरु झाल्यानंतर त्यांनी समताचे दुसरे दहा हजाराचे कर्ज घेऊन ब्युटी पार्लरचे काही सामान व खुर्ची खरेदी केली. ब्युटी पार्लरचे काम जसजसे वाढत गेले तसतसे त्यांनी त्यांच्या दोन्ही मुलींना पार्लरचे प्रशिक्षण दिले. दोन्ही मुलींना पार्लरचे चांगले काम येऊ लागल्यामुळे त्यांच्यावरचा कामाचा तान कमी झाला. पुढे चालून त्यांनी पन्नास हजाराचे कर्ज घेऊन पार्लरचे आणखीन साहित्य खरेदी केले. त्यांच्या दोन्ही मुली पार्लर नीट सांभाळू लागल्या. यादरम्यान करुणाताई ग्रामीण भागात जाऊन मुलींना व महिलांना पार्लर, शिवणकाम, विणकाम यांचे प्रशिक्षण देऊ लागल्या. यातून त्यांच्या कुटुंबाची आर्थिक घडी बऱ्यापैकी बसत गेली. या कामामुळे त्यांची चांगली ओळख

तयार झाली. जसजसा व्यवसाय वाढत होता तसतसा त्यांच्या कर्जाचा आकडाही वाढत गेला. आता त्यांनी समताचे एक लाखाचे कर्ज घेऊन धानोरा रोडवर मोठे प्रियंका ब्युटी पार्लर नामक दुकान व मेकअप स्टुडिओ उभारले आहे. ब्युटी पार्लरची कमी किमतीत व चांगली सेवा देत असल्यामुळे त्यांच्याकडे आता लांबून सुद्धा महिला येतात.



आपल्या दोन्ही मुलींना ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे केल्यानंतर त्यांनी आपल्या मुलासाठी पुन्हा समताचे एक लाखाचे कर्ज घेऊन ब्युटी पार्लर शेजारीच प्रियंका जनरल स्टोअर्स व इंटरप्राईजेस नावाचे दुकान टाकून दिले. त्याचबरोबर करुणा ताई शिवणकाम चांगले करायच्या त्याला धरूनच त्यांनी परख बुटिक पण टाकले यातून त्या मुलींना आजही प्रशिक्षण देत आहेत. करुणा ताईच्या प्रगतीकडे बघून त्यांना आता संस्थेने दिड लाखाचं कर्ज दिले आहे. या कर्जाचा वापर त्या आपल्या व्यवसायात करत आहेत. त्यांच्या व्यवसायाची उलाढाल आता लाखाच्या घरात गेली आहे. **समताने त्यांचा महिला उद्योजक पुरस्काराने गौरव केला आहे.** कठीण काळात सर्व जवळचे सोडून गेल्यानंतर सुद्धा करुणाताई जिद्दीने आपल्या ठरवलेल्या वाटेवर चालत राहिल्या व येईल त्या आव्हानांना सामोऱ्या जात एक यशस्वी महिला उद्योजक म्हणून नावारूपाला आल्या आहेत. संघर्ष काय असतो व तो कसा करायचा असतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे करुणा ताई! समताने वेळोवेळी दिलेला आर्थिक मदतीचा हात जरी महत्वाचा असला तरी समताच्या विविध कार्यक्रम व मेळाव्यातून मिळालेले मार्गदर्शन हेही तितकेच महत्वाचे आहे. आज घडीला करुणाताई एक यशस्वी उद्योजकच नाही तर एक उत्तम कुटुंबप्रमुख सुद्धा झाल्या आहेत. समताच्या आर्थिक साक्षरता, स्वावलंबन, स्त्री पुरुष समानता यांना समर्पक असे स्थान त्यांनी आज समाजात मिळवले आहे. त्यांच्या या यशस्वी वाटचालीमध्ये समता नेहमीच त्यांच्या सोबत होती व राहील.

**आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ चे औचित्य साधून बीड तालुका समता महिला बचत गट सदस्यांची सहकारी पतसंस्था व समताशक्ती नागरी महिला सहकारी पतसंस्था यांनी आपल्या उद्योजक महिलांचा परिचय व्हावा व महिलांमधील उद्योजकता सहकार चळवळीच्या माध्यमातून वाढावी यासाठी महिला उद्योजकता महा मेळावा आयोजित केला आहे तसेच समताशक्ती महिला उद्योजकता विशेषांक २०२५ प्रकाशित करण्यात आला आहे.**








| | |
|---|---|
| नाव | आवारे अर्चना अनंत |
| गाव | पिंपळादेवी, ता.जि. बीड. |
| वय | ४६ वर्ष |
| शिक्षण | १२ वी |
| व्यवसाय | शिवणकाम, साडी सेंटर, ज्वेलरी दुकान |
| बचत गट नाव | योगेश्वरी समता महिला बचत गट |

**अर्चना अनंत आवारे** राहणार पिंपळादेवी ता.जि. बीड. पिंपळादेवी हे अतिशय कमी लोकसंख्या असेलेले छोटसं गाव. अर्चना ताईंच्या कुटुंबात त्यांचे पती, सासूसासरे अन दोन दीर व दोन मुले असे मोठे कुटुंब. कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन म्हणजे शेती. शेतीच्या उत्पन्नावर एवढे मोठे कुटुंब चालवणे खूप जिकिरीचे होऊन जात. पावसाच्या अनियमितते मुळे शेतीपण करणे जड जात होते. कुटुंबाच्या दैनंदिन गरजा भागवणे सुद्धा कठीण होऊन बसले होते. मुलांना दुकानातून साधे चॉकलेट घ्यायचे म्हंटले तरी हाताकडे बघावं लागायचे. लेकरांचे वाढदिवस करायचे म्हटले की गऱ्याचा शिरा करून तो प्लेटमध्ये घ्यायचात्याला गावातीलच झाडांची फुले लावायची अन त्यावर मेणबत्ती लावायची अन वाढदिवस साजरा करायचो. परिस्थिती नाजुक असल्यामुळे माझे अन नवऱ्याचे सारखे भांडण होत असे. आमच्या गावात समता संस्थेचे काम सुरू झाले. गट स्थापनेच्या बैठकीत बचत गटाची माहिती सांगून झाल्यावर आपल्या गावात एखादा बचत गट तयार करा असे सांगितले. गटात जाण्याची फार गरज वाटत होती पण आधीच असलेल्या बिकट परिस्थितीमुळे दरमहा शंभर रुपये भरायचे कसे हा ही प्रश्न होताच. माझी असलेली अडचण मी समताच्या कार्यकर्त्यांसोबत बोलून दाखवली असता त्यांनी मला दरमहा पन्नास रुपयाने बचत गट चालू करा असे संगितले. वर्ष २००७ साली आम्ही आमचा पहिला नविन बचत गट तयार केला. दरमहा पन्नास रुपये बचत करायचे ठरले. आमच्या बचत गटाचे नाव योगेश्वरी समता महिला बचत गट असे ठेवले व गटात एकूण दहा महिला झाल्या.

समताने गटात सर्वप्रथम पाच हजार रुपये प्रत्येक महिलेला कर्जवाटप केले. मिळालेल्या कर्जातून मी एक शिलाई मशीन घेतली. मला शिवणकाम म्हणावे तसे करता येत नव्हते. पण हळू हळू सरावाने मी ब्लाउज शिवायचे शिकले. शिकण्याची खूप धडपड असल्यामुळे मी लवकरच शिवणकाम चांगले करू लागले तशी माझ्याकडे महिला शिवणकामासाठी येऊ लागल्या. यातून मग कर्जाचे हफ्ते वेळेवर व नियमित भरू लागले. टप्याटप्प्याने मी दहा, वीस, तीस हजाराचे कर्जघेऊन माझ्या गरजा भागू लागले. पण असे किती दिवस चालणार म्हणून मी पुढचे पन्नास हजारचे कर्ज घेऊन मी कपड्याचे दुकान टाकले. यात मी लहान मुलांचे कपडे, साड्या असा माल भरून माझा छोटासा व्यवसाय सुरू केला. पुढे चालून मी ज्वेलरी साहित्य खरेदी करून ते सुद्धा विकायला लागले. यात बेन्टेक्स ज्वेलरीचे दागिने यांची गावामध्ये खूप मागणी वाढू लागली. यातून मला चांगला नफा मिळत गेला व याचा फायदा मला माझ्या कुटुंबाच्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी होत गेला. माझ्या दोन मुलांना मी चांगले शिक्षण देऊ शकले. माझा एक मुलगा आता एमबीबीएसचे शिक्षण घेत आहे.

समताने दिलेल्या कर्जातून मी आता पत्र्याच्या घरातून सिमेंटच्या घरात रहायला गेले आहे. समताने मला एक लाखाचे कर्ज तीन वेळा दिले आहे. माझा व्यवसाय आता सुरळीत सुरू आहे. आता मला जेव्हा कर्जाची गरज पडते तेव्हा समताचा हात नेहमी माझ्या पाठीवर असतो. नुकतेच मी दिड लाखाचे कर्ज घेऊन माझ्या व्यवसायात गुंतवले आहे. समताची ही लाख मोलाची साथ माझ्यासह सर्व महिलांना नेहमी मिळत राहो. कारण मी ज्या परिस्थितीमधून वर आले त्या परिस्थितीत जर समताने मला मदत केली नसती तर याची मला कल्पनाही करवत नाही. समता संस्था ही छोट्या छोट्या उद्योगापासून मोठ्या उद्योगाच्या टप्प्यावर नेऊन सोडणारी संस्था आहे. समताच्या नियमित होणाऱ्या बैठका, आर्थिक साक्षरते वरचे कार्यक्रम, मेळावे यातून आम्हाला नेहमीच ऊर्जा देण्याचे काम सातत्याने केले आहे व करत आहे. **समताने मला चूल व मूल एवढेच मर्यादित न ठेवता माझ्यातला उद्योजक घडवला आहे.** मुलांच्या शिक्षणाला मला साथ दिली. उद्योजक पुरस्काराने माझा गौरव केला. माझ्यासह माझ्या गटातील इतर महिलांनी सुद्धा शेतीला पूरक जोडधंदे सुरू केले आहेत व करत आहेत.

## समता प्रतिष्ठान, बीड

**ही संस्था/चळवळ खालील संस्था/संघटनांशी संलग्न आहे.**

- **अन्नपूर्णा परिवार, पुणे**
- **कोरो साक्षरता समिती, मुंबई**
- **महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषद**
- **जन आरोग्य अभियान**
- **महिला हिंसा मुक्ती परिषद**
- **एकता महिला संघटना**

## समता प्रतिष्ठान, बीड

**ने आरोग्य सेवावरील देखरेख व नियोजन प्रक्रियेत तालुका समन्वय संस्था म्हणून मानवलोक, अंबाजोगाई व साथी सहेत, पुणे यांच्या सोबत उल्लेखनिय कार्य केलेले आहे.**



| | |
|---|---|
| नाव | मस्के रोहिणी शिवाजी |
| गाव | पालवन, ता.जि. बीड |
| वय | ३९ वर्ष |
| शिक्षण | बी.ए. |
| व्यवसाय | पिठाची गिरणी, कापड दुकान |
| बचत गट नाव | वैष्णवी समता महिला बचत गट |

**रोहिणी शिवाजी मस्के** राहणार पालवण यांचा एक यशस्वी महिला उद्योजकाचा प्रवास महिलांना प्रेरणा देणारा आहे. त्यांचे पती इलेक्ट्रोनिक्सचे दुकान चालवतात. त्यांच्या कुटुंबात पतीसह, दोन मुले व सासू सासरे असा परिवार आहे. गावात व आजूबाजूला बचत गट चळवळीचे वारे जोरात वाहू लागले त्या काळात समतासोबत झालेला त्यांचा संपर्क अन त्यातून त्यांचा झालेला नवीन वैष्णवी समता महिला बचत गट. वर्ष २०१३ मध्ये त्यांचा बचत गट स्थापन झाला तो आजतागायत सुरु आहे. ताईचे शिक्षण चांगले पदवीपर्यंत झालेले. बचत गटात आल्यावर त्यांच्यावर बचत गटाचे संस्कार होण्यास जास्त वेळ लागला नाही.

अतिशय समजदार व तेवढ्याच शांत असलेल्या ताई काही काळ समता संस्थेच्या संचालक मंडळावर सुद्धा कार्यरत होत्या. शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या ताईचे शिक्षण झाले कि, त्या सासरी आल्यावर शेतीकडे लक्ष देऊ लागल्या. पण शिक्षण चांगले झाले असल्यामुळे त्या शांत बसने अशक्यच. लवकरच त्या पालवण गावच्या अशा कार्यकर्तीची नोकरी करू लागल्या. आशाची कामे, शेतीचे कामे करून मिळालेल्या वेळेत त्या शिवणकाम सुद्धा करत होत्या. कर्ज व बचतीची नियमित भरणा करताना त्यांनी गावातही काही नवीन बचत गट तयार केले. समताच्या महिला उद्योजक कर्ज योजनेतून त्यांनी एक लाखाचे कर्ज घेऊन गावातच कपड्याचे दुकान टाकले. बचत गट व आशाच्या नोकरीमुळे त्यांचा जनसंपर्क चांगला असल्यामुळे त्यांच्या व्यवसाय वाढीसाठी त्यांनी चांगला उपयोग करून घेतला.

विविध कार्यक्रम, मेळावे, शिबीर यात मिळणारे समताचे मार्गदर्शन त्या लक्ष देऊन ऐकत. कपड्याचे दुकान टाकून थांबतील त्या रोहिणी ताई कसल्या! एक लाखाच्या कर्जातून शिल्लक राहिलेल्या पैश्यात त्यांनी पिठाची गिरणी सुद्धा घेतली एका व्यवसायाला दुसऱ्या व्यवसायाची जोड देत त्या आज कर्जमुक्त झाल्या आहेत. त्यांच्या कपड्याच्या व्यवसायाने आता चांगली गती घेतली असुन त्या सुद्धा आता कुटुंबाचा आर्थिक कणा बनल्या आहेत. आजही त्यांच्या बचत गटाची नियमित बैठक होते व त्या बैठकीला उपस्थित राहून आपली बचतही नियमित भरत आहेत.



| | |
|---|---|
| नाव | मंगल पाराजी कुरे |
| गाव | अंतरवन पिंपरी |
| व्यवसाय | रेडीमेड कपडे, ए टू झेड दुकान, सर्व प्रकारच्या पापड्या,पापड, कांडन यंत्र, मसाले भगरीचे पीठ, दिवाळीचे पदार्थ आणि केटरिंग. |
| बचत गट नाव | संत मीराबाई समता महिला बचत गट |

कष्टांना जिद्दीची जोड मिळाली तर किती मोठे कर्तुत्व पाहायला मिळू शकते त्याचे उत्तम उदाहरण **मंगलताई कुरे.** मंगल पाराजी कुरे २००४ पासून समता परिवाराच्या सदस्य आहेत. तसेच समता पतसंस्थेच्या संचालक पदावरही त्या आहेत. २००४ मध्ये अंतरवन पिंपरीमध्ये संत मीराबाई महिला बचत गट हा पहिला बचत गट झाला. बचत गटात आल्यावर अक्षर ओळखही नसलेल्या मंगलताई स्वतः ची सही करायला शिकल्या. जेव्हा बचत गटात आल्या तेव्हा मंगल ताई तुराट्याच्या कुडात राहत होत्या. काही दिवस ताईंनी ऊसतोडीचे काम केले. पण त्यांना ऊसतोड नेहमीसाठीच करायचे नव्हते. त्यामुळे मंगलताईंनी संत मीराबाई या बचत गटातून दोन हजार कर्ज घेऊन जुनी शिलाई मशीन खरेदी केली. बीडमध्ये येऊन त्यांनी शिवणकाम शिकले. गावात दुसरे लेडीज टेलर नसल्यामुळे मंगल ताईंकडे शिवण्यासाठी भरपूर काम येऊ लागले. त्यानंतर त्यांनी पाच हजार कर्ज घेऊन डबल पाटाची शिलाई मशीन खरेदी केली. त्यानंतर त्या शिवनाबरोबरच पिको फॉल करू लागल्या. यानंतर ताईंनी सतत वाढीव कर्ज घेतले आणि राहण्यासाठी पत्र्याचे शेड तयार केले. त्यानंतर मंगल ताईंनी मागे वळून पाहिलंच नाही. वरचेवर कर्ज घेऊन त्यांनी रेडिमेड कपडे त्यानंतर बांगड्या भरणे, तसेच ए टू झेड शॉपी ही सुरू केली. या सर्वात त्यांना त्यांच्या पतीची पाराजी कुरे यांची मोलाची साथ मिळाली. मंगल ताईंनी हे व्यवसायाचे बीज फक्त स्वतः पुरतेच ठेवले नाही, तर गावात लग्न होऊन आलेल्या नवीन सुना यांना सुद्धा शिवणकाम शिकवले, त्यांना बचत गटात घेतले. त्यामुळे या सर्व महिलांना देखील रोजगार मिळाला. त्या स्वयंपूर्ण झाल्या. हे सर्व काम चालू असताना त्यांनी मोठ्या मुलीचे लग्न केले. तसेच मुलाचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. छोट्या मुलीचे शिक्षण चालू आहे.

त्यानंतर मंगल ताईंनी सिमेंट काँक्रिटचे दोन खोल्यांचे घर बांधले. कांडन यंत्र, पिठाची गिरणी पापड्यांची मशीन घेतली. आणि रेडिमेड मसाले, हळद, भगरीचे पीठ, तिखट या सर्वांचा व्यवसाय सुरू केला. त्याबरोबरच पापड्यांच्या मशीन घेऊन सर्व प्रकारच्या पापड्या कुरडया सर्व उन्हाळा कामे तसेच दिवाळीच्या फराळाचे पदार्थ आणि जेवणाच्या ऑर्डर देखील मंगल ताई गटातील महिलांना सोबत घेऊन घेऊ लागल्या. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे काहीच शिक्षण न घेतलेल्या, अक्षर ओळख ही नसलेल्या मंगल ताईंनी ब्युटी पार्लरचा कोर्सही केला आणि बेसिक ब्युटी पार्लर देखील सुरू केले. आज मंगल ताई एक यशस्वी उद्योजिका म्हणून सर्व बचत गटातील महिलांसमोर आदर्श म्हणून उभ्या आहेत. मंगलताईचा समताच्या वतीने उत्कृष्ट उद्योजिका सन्मान मिळाला आहे. तसेच पुरुष उवाच या पुण्यातील संघटनेच्यावतीने सुद्धा त्यांना महिला उद्योजक



पुरस्कार मिलाला आहे. तसेच बीड आणि इतरही ठिकाणी उमेद अभियानाच्या वतीने त्यांचे अनेक सत्कार झालेले आहेत. उमेद अभियानाच्या बहिरवाडी ग्रामसंघाच्या त्या अध्यक्ष आहेत. या त्यांच्या लघु उद्योगसमूहातील उत्पादने घेऊन मंगलताई राज्यभर जेथे जेथे बचत गटांचे स्टॉल लागतात तेथे जातात. त्यांना त्यात भरपूर नफा मिळतो असे त्या म्हणाल्या. मंगलताईनी त्यांचा उद्योग व्यवसाय केवळ बचत गटांच्या भांडवलावर सुरू केला आणि एकातून अनेक व्यवसाय उभे करून उद्योगसमूह उभा केला आहे. आज या सर्व व्यवसायाला जागा पुरत नसल्याने आता मंगलताईनी दोन मजली बांधकाम सुरू केले आहे. खालचा मजला सर्व व्यावसायासाठी आणि वरचा मजला राहण्यासाठी त्या बांधत आहेत. मंगल ताईंची वर्षाची उलाढाल तीन चार लाखच्या घरात आहे.





| | |
|---|---|
| नाव | संगीता प्रकाश जाधव |
| गाव | बहिरवडी, ता.जि. बीड |
| वय | ३५ वर्ष |
| शिक्षण | १२ वी |
| व्यवसाय | किराणा, पार्लर, साडी सेंटर, झेरॉक्स सेंटर |
| बचत गट नाव | नारीशक्ती समताशक्ती महिला बचत गट |

मी **संगीता प्रकाश जाधव** बहिरवाडी येथे राहते माझे पती मी आणि एक मुलगी असे माझे छोटेसे कुटुंब. आम्ही दोघेही नवरा बायको मोलमजुरी करुन आयुष्याचे दिवस ढकलत जगत होतो. संकटे सांगून येत नसतात तसे माझ्या आयुष्यात सुद्धा संकटांची कमी नव्हती पण त्यावर मात करत आम्ही पुढे जाण्याचा प्रयत्न करत होतो. पण अचानक पतीचे आजारपण उद्‌भवले! पतीचे आजारपण सांभाळावे कि, कामाला जावे! कामाला गेले नाही तर पैसा कुठून येणार! सोबत लहान मुलगी होतीच. काय करावे ते सुचत नव्हतं! उत्पन्नाचे ठोस साधन नसल्यामुळे मला बचत गटामध्येही कोणी घेत नव्हते. असे असंख्य प्रश्न माझ्यासमोर होते. पण यावर मात करण्याचा मी नेहमीच प्रयत्न करत राहिले. आर्थिक गरजा भागवण्यासाठी मीच पुढाकार घेऊन एक नवीन १० जणींचा गट तयार केला. हा गट आम्ही समता संस्थेला जोडून घेतला.

संस्थेच्या नियमित होणाऱ्या बैठका व शिस्त यामुळे आमचा गट चांगला चालतो आहे. मी समताचे पहिले पाच हजाराचे घेतले. या कर्जातून शिलाई मशिन घेऊन शिवणकाम करण्यास सुरुवात केली. या कामामुळे माझी आजूबाजूच्या परिसरात ओळख वाढत गेली. पहिले कर्ज नियमित फेडून मी पुढचे दहा हजाराचे कर्ज घेऊन त्या पैश्यातून साड्यांचा माल खरेदी केला. हा व्यवसाय करत असताना अचानक माझ्या पतीचे निधन झाले. अचानक झालेल्या या आघातातून पुन्हा उभे राहण्याची ताकत म्हणजे माझी मुलगीच! या आघातातून सावरण्यासाठी मला माझी आई माहेरी घेऊन गेली. पण माझे मन तेथे काही रमले नाही. मी माहेरी काही दिवस राहुन परत बहिरवाडीत आले. उत्पन्नाचे काही साधन नव्हते अश्या परिस्थितीत आईने दिलेले काही पैसे होते. पण ते किती दिवस पुरणार! त्यामुळे समता संस्थेचे तीस हजाराचे कर्ज काढून स्वत:च्याच घरात थोडे किराणा साहित्य घेऊन छोटे दुकान टाकले. जसजसा नफा मिळत गेला त्यातून मग आईसक्रीम पार्लर सुद्धा सुरू केले. अश्या बिकट परिस्थितीत मला जशी माझ्या आई वडिलांनी साथ दिली तेवढीच मोलाची साथ समता संस्थेने दिली. आज मी समताला माझ्या परिवाराचाच एक भाग मानते.

माझा समता मधला पाच हजार ते दिड लाख पर्यंतच्या कर्जाचा प्रवास हा यशस्वीपणे सुरू आहे. त्याचबरोबर समताने मला नुसते कर्जाचे महत्वच संगितले नाही तर मला बचत करायला दोन पैसे मागे टाकायला सुद्धा शिकवले आहे. माझी आज समता संस्थेत चांगली बचत पण जमा आहे व त्याला नियमित व्याजसुद्धा चांगले भेटते. बचत गटाच्या माध्यमातून मी जशी आर्थिकदृष्ट्या सक्षम, स्वावलंबी झाले तशीच माझ्या परिसरातील महिलांनी सुद्धा स्वावलंबी व्हावे. यासाठी मी समता संस्थेला ६ नवीन बचत गट जोडण्यास मदत केली आहे. माझ्या गटासोबत या गटांच्या नियमित बैठका होत असतात. माझ्यासह या गटातील काही महिलांनी सुद्धा स्वतःचे व्यवसाय देखील सुरू केले आहेत.



| | |
|---|---|
| नाव | अक्तरबी सुभानखान पठाण |
| गाव | खामगाव, ता.जि. बीड |
| वय | ४५ वर्ष |
| शिक्षण | ८ वी |
| व्यवसाय | शेती व शेती पूरक व्यवसाय |
| बचत गट नाव | हाजीअली समता महिला बचत गट |

वर्ष २००७ मध्ये नांदूर हवेली येथे समताचा पहिला माऊली बचत गट सुरु झाला. बघता बघता या गावात गटांची संख्या वाढत गेली. नांदूर हवेलीच्या लगत असलेले दुसरे गाव म्हणजे खामगाव! नांदूर हवेली मधील गटांचा उत्साह बघून या गावात २००९ मध्ये समताचे काम सुरु झाले. खामगाव येथेही गटांची संख्या हळू हळू वाढत गेली. त्यातीलच एक गट म्हणजे हाजीअली समता महिला बचत गट. या गटात एकूण १० महिला असुन हा गट आजतागायत समताला जोडून आहे. या गटातील अक्तरबी सुभानखान पठाण यांचा समतासोबतचा प्रवास फारच रंजक व प्रेरणा देणारा आहे. गावापासून जवळपास दोन पावणे दोन किलोमीटर अंतरावर अक्तरबी यांचे ७२ गुंठे शेत आहे. या शेतात छोटेसे पत्र्याचे शेड मारून त्या व त्यांचे पती राहतात. दोघे नवरा बायको जोडीने गेल्या कित्येक वर्षापासून शेती करत आहेत. बचत गटात आल्यापासून त्या नियमित कर्ज घेऊन शेती करत आहेत.

शेतीसोबत त्यांनी शेतीपूरक काही व्यवसाय सुद्धा केले आहेत यात गांडूळ खत निर्मिती, मळणी यंत्र, कुक्कुटपालन, शेळीपालन व दुग्धपालन इत्यादी व्यवसायांचा समावेश आहे. गटात आल्यापासून समताच्या सर्वच कार्यक्रम व मेळाव्यांना ताई न चुकता हजर राहतात. काही वेळेस तर सोबतीला कुणी नसल्यामुळे त्या एकट्या का होईना यायच्याच. समताच्या सर्वात जुन्या व नियमित सभासदापैकी त्या एक आहेत. अक्तरबी पठाण यांनी आत्तापर्यंत तब्बल १३ वेळा समताचे सहा लाखाच्यावर कर्ज घेतले आहे. या कर्जाची परतफेड करताना त्या आपल्या शेतातल्या घरापासून दोन पावणे दोन किलोमीटर पायी येऊन गटाच्या बैठकीत आपला नियमित कर्ज हफ्ता व बचत न चुकता भरतात. काही अडचण असल्यास त्यांचे पती गटाच्या बैठकीत येऊन हफ्ता भरतात पण हे फार क्वचित वेळा घडले आहे.

समताचे कार्यकर्त्यांनी जेव्हा त्यांच्या शेतातल्या घरी भेट दिली तेव्हा त्या ज्या रस्त्यांनी गटाच्या बैठकीला यायच्या त्या शेतातल्या काळ्या, काट्याकुट्याच्या व वळणावळणाच्या रस्त्याची प्रचीती आली. आम्ही सहज त्यांना प्रश्न विचारला कि, तुम्ही पावसाळ्यात कोणत्या रस्त्याने गटाच्या बैठकीला येता! यावर त्या म्हणाल्या याच रस्त्याने चिखलातून येते! गटाच्या बैठकीतला व कार्यक्रम, मेळाव्यातील त्यांचा उत्साह प्रचंड असतो. गटातील चर्चा असो वा कार्यक्रम, मेळाव्यातील मार्गदर्शन त्या सर्व लक्ष देऊन त्यात सहभागी असतात. अतिशय हुशार, सकारात्मक दृष्टीकोन व हजरजबाबी असलेल्या अक्तरबी ताई गेल्या १५ वर्षापासून समता सोबत जोडून आहेत. समताच्या एक यशस्वी महिला उद्योजक व महिला सक्षमीकरणाचे उत्तम उदाहरण म्हणजे अक्तरबी पठाण!



| | |
|---|---|
| नाव | सत्वशीला अंगद घाडगे |
| गाव | आहेर वडगाव |
| वय | ३७ वर्ष |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | किराणा, कपडे, स्टेशनरी, शेळीपालन, शेती |
| बचत गट नाव | संजीवनी समता महिला बचत गट |

**सत्वशीला अंगद घाडगे** यांचे माहेर महाकाळा तर सासर म्हणजे आहेर वडगाव. आई वडिलांची आर्थिक परिस्थिती खूपच नाजूक असल्यामुळे शिक्षण अर्धवटच राहिले त्यामुळे लग्नही लवकर झाले. लग्न करून सासरी आल्यावर सुद्धा आर्थिक परिस्थिती जैसे थे होती. कुटुंब चालवत असताना आर्थिक चनचन पावलापावलावर जाणवत होती. त्यांच्या आजारपणामुळे त्यांना शेतात काम करणे जमत नव्हते पण कुटुंबासाठी आपणही काहीतरी काम केले पाहिजे. शिक्षण सुद्धा अर्धवट झाल्यामुळे त्यांना एखादी नोकरी मिळणे शक्य नव्हते. त्यातूनच त्यांनी मग ठरवलं की, आपण घरात बसून काहीतरी स्वतःचा व्यवसाय करायचे. नवऱ्याच्या सहाय्याने त्यांनी छोटेसे किराणा दुकान टाकले. किराणा दुकानाच्या माध्यमातून त्यांचा छोटेखानी व्यवसाय सुरु झाला. या व्यवसायातून दोन पैसे मागे पडायला लागले. गावात नुकतेच समता संस्थेचे बचत गटाचे काम सुरु झाले होते.

सत्वशीला ताईनी सुद्धा एक नवीन बचत गट केला व समताच्या सभासद झाल्या. बचत गट म्हणजे काय? तो कसा चालतो अशी सगळी माहिती गटाच्या बैठकीतून मिळत गेली. अतिशय कमी व्याजाचे कर्ज घेऊन आपण छोटेछोट लघुउद्योग करू शकतो याची माहिती समताच्या होणाऱ्या विविध कार्यक्रम व मेळाव्यातून त्यांना मिळत गेली. पहिले पाच हजाराचे कर्ज घेऊन त्यांनी आपल्या किराणा दुकानात गुंतवले. किराणा दुकानामुळे त्यांच्या दुकानात गिऱ्हाईकांची सतत ये जा होत असे. यातूनच त्यांना त्यांची गरज लक्षात येऊन त्यांनी समताचे दुसरे दहा हजाराचे कर्ज घेऊन साड्या व छोट्या मुलांचे कपडे विक्रीचा व्यवसाय सुरु केला. आधीच्या व्यवसायाला नव्या व्यवसायाची जोड मिळाली नफ्यात वाढ झाली. तसेच कर्जाचे हफ्ते भरण्यास पण मदत झाली. पुढे त्यांनी वीस हजाराचे कर्ज घेऊन आपला व्यवसाय वाढवत नेला.

बघता बघता व्यवसायाची घडी नीट बसत गेली. यामुळे मुलांच्या शिक्षणाचा खर्च करण्याचा मार्ग मोकळा होत गेला. त्यांचे मुलं आता चांगले शिक्षण घेत असुन दोन शेळ्याही त्यांनी घेतल्या आहेत. सत्त्वशिला ताईकडे आता पन्नास हजाराचे कर्ज असुन त्याचा वापर त्यांनी आपल्या व्यवसायवाढीसाठी केला आहे. त्यांचा संजीवनी समता महिला बचत गट आजही सुरळीत असुन गटाची नियमित बैठक होते. उद्योजकतेकडून स्वावलंबनाकडे असा त्यांचा अखंड प्रवास आजतागायत सुरु आहे. समता गटाच्या स्वयं शिस्तीमुळे व वेळोवेळी दिलेल्या आर्थिक पाठबळामुळे सत्वशीला ताई सारख्या असंख्य महिलांना व त्यांच्या कुटुंबाना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम समता सातत्याने करते आहे. **सत्त्वशीला ताईंनी शून्यातून घेतलेली झेप आज त्यांना एक यशस्वी महिला उद्योजक म्हणून पुढे घेऊन जात आहे.**



| | |
|---|---|
| नाव | चंदेल मंजू कमलेश |
| गाव | नरसोबा नगर, बीड |
| वय | ४० वर्ष |
| शिक्षण | नाही |
| व्यवसाय | पाणी पुरी |
| बचत गट नाव | जगदगुरु समताशक्ती महिला बचत गट |

मी गेल्या बारा वर्षापासून समता पतसंस्थेच्या बचत गटामध्ये आहे. आम्ही राहणारे यूपीमधील आहोत पण पोट भरण्यासाठी बीडमध्ये येऊन स्थायिक झालो आहोत. माझ्या घरात आई-वडील पाच मुलं व आम्ही दोघे नवरा बायको असं आमचं नऊ जणांचं कुटुंब आहे. बीडमध्ये रहायला आल्यावर आमच्यासमोर प्रश्न होता की, एवढं मोठं आमचं कुटुंब जगणार कसं! असा विचार करत असतानाच मला देवदूतासारखे समताचे कार्यकर्ते भेटले. विशेष म्हणजे समता पतसंस्थेतील कार्यकर्त्यांनी आमच्यावर विश्वास ठेवून मला बचत गटामध्ये घेतलं. या पतसंस्थेकडून मी पहिले कर्ज पाच हजार घेतले इथपासून आज दीड लाखापर्यंत कर्ज घेत आले आहे. पाच हजार ही रक्कम लोकांसाठी खूप कमी आहे पण माझ्यासाठी लाख मोलाची होती. मी समता पतसंस्थेकडून पाच हजाराचे कर्ज फेडून दुसरे दहा हजार रुपये कर्ज घेतले. आमचे दोघांचे पण शिक्षण कमी असल्यामुळे दुसरं काहीच करू शकत नव्हतो. आम्ही पाणीपुरीचा गाडा घेतला. आम्ही दोघेही पाणीपुरीचा गाडा चालवतो. आम्हाला या व्यवसायामध्ये थोडा थोडा नफा मिळू लागला. या नफ्यामधूनच आमचं घर चालत होतं. कर्जाचा हप्ता ही व्यवस्थित परतफेड होत होता. समताचा कर्जाचा हप्ता भरण्यासाठी रिक्षाला पैसे जातील म्हणून आम्ही दोघ नवरा बायको सायकलवर गटाच्या बैठकीला कर्जाचा हप्ता भरायला जायचो.

पाणीपुरीचा गाडा चालवत चालवत मी दुसऱ्याच्या इथे कामही करू लागले. माझ्या पतीला माझी मदत होऊ लागली. समताचं कर्ज वाढत गेलं आणि मी जागा घेऊन त्या जागेमध्ये पत्र्याचे शेड मारल. आता आम्ही स्वतःच्या जागेत राहू लागलो. समता पतसंस्थेमुळे मला स्वतःचं घर झालं. रहायला घर असले की, खायचं काही अवघड नसतं. समता पतसंस्थेमुळे आमचा संसार एकदम सुरळीत चालला होता. अचानक २०२१ मध्ये कोरोनासारखा आजार आला आणि लॉकडाऊन पडलं. आम्ही रोज लोकांना खाऊ घालणारे एक दिवस आम्ही स्वतःच्याच घरात उपाशी राहिला लागलो. आम्हाला समताच्या कार्यकर्त्यांनी उपाशी राहू दिलं नाही. आम्हाला समता पतसंस्थेनी कोरोना सारख्या महामारीच्या काळामध्ये किराणा भरून दिला तसेच रोज भाकरीही पुरवत होते.

लॉकडाउनच्या काळात समता पतसंस्थेचे माझ्याकडे एक लाख रुपये कर्ज होते. या काळात ते भरणे अशक्य होतं पण मला कधीच समताच्या कार्यकर्त्यांनी तसे जाणून दिले नाही की, माझ्याकडे कर्ज आहे आणि ते मी भरत नाही. पुढे चालून हे दिवसही निघून गेले. पुन्हा आमचा पाणीपुरीचा गाडा सुरु झाला. आज आमचं कुटुंब हसत खेळत आहे ते फक्त समता पतसंस्थेमुळे. अशा बिकट काळात त्यांनी वेळोवेळी आम्हाला आधार दिला. बीड जिल्ह्यामध्ये एकमेव पतसंस्था आहे की जी फक्त पैशापुरतं न बघता ती महिलांच्या सुखदुःखात सहभागी असते. **मला माझा अभिमान आहे की मी या चांगल्या संस्थेसोबत जोडली गेलेली आहे अन कायम जोडलेलीच राहील.**



| | |
|---|---|
| नाव | सुरेखा धोंडीराम होंडरे |
| गाव | ढेकनमोह, ता.जि. बीड |
| वय | ४२ वर्ष |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | शिवणकाम |
| बचत गट नाव | जागृती समताशक्ती महिला बचत गट |

मी **सुरेखा धोंडीराम होंडरे** माझ्या घरात मी आई आणि माझी मुलगी असा आमचा तीन जणांचा परिवार आहे. गेल्या बारा वर्षापासून समता पतसंस्थेच्या बचत गटामध्ये आहे. बिकट परिस्थितीत स्वतःमधल्या कलागुणांना बाहेर काढून व्यवसाय करून स्वतःच्या पायावर उभा कस राहायच हे मी समताकडून शिकले. माझ्याकडे शिलाईच्या दोन मशीन आहेत ढेकनमोह मधील गावातील आणि गावाच्या जवळपास जे दुसरे खेडे आहेत तिथूनही ब्लाउज शिवण्यासाठी महिला माझ्याकडे येतात. जेव्हा आपण जगण्यासाठी संघर्ष करतो तेव्हा परिस्थिती कधीही कशीही बदलू शकते विशेषत: कौटुंबिक! मी सुद्धा माझ्या जीवनात खूप संघर्ष केला अन् आजही करत आहे.

बहुतांश महिला या आर्थिक परिस्थितीने गांजलेल्या असतात त्या परिस्थितीवर मात कशी करावी यावर त्यांना मार्ग सापडत नाही. मी खूप नशीबवान आहे की मला समतामुळे मार्ग सापडला. समतामुळे माझा स्वतःचा व्यवसाय सुरू करून स्वतःच्या पायावर उभी राहिले. आज शेकडो महिला माझ्याकडे ब्लाउज शिवण्यासाठी येतात. एक काळ असा होता की, माझ्या हाताला काम नव्हतं. आज माझ्याकडे काम आहे तर वेळ पुरत नाही. आज मी कमी भांडवलामध्ये माझा स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे. म्हणतात ना, 'गाय कमी शिंगाची असावी पण दूध देणारी असावी' तसाच माझा व्यवसाय आहे भांडवल कमी आणि नफा जास्त.

मला नेहमी अभिमान वाटतो कि, मी समताच्या गटामध्ये आहे. त्याचबरोबर मी समताशक्ती महिला सहकारी नागरी सहकारी पतसंस्थेची संचालक सुद्धा आहे. मी माझ्या गावात व परिसरातनवीनकिरण, देवांश, रागिनी असे तीन गट केले आहेत. या गटाच्या बैठका माझ्याच घरी होतात. या गटाच्या बैठका घेण्यासाठी आमच्या गावात समताच्या कार्यकर्त्या कौशल्याताई नियमित ठरलेल्या तारखेला येतात. आमचे गट फक्त कर्ज घेण्यासाठी आणि देण्यासाठी नाहीत तर आमच्या गटा मध्ये विविध चर्चा होतात. एकमेकांच्या सुखदुःखा विषयी जाणून घेतलं जात. कोणाला काही अडचण आली तर त्याला सामोरे कसं जायचं त्याच्यावर मात कशी करायची या सगळ्या चर्चा होतात. आम्हाला समता पतसंस्थेचे गट खूप आवडतात. समता प्रतिष्ठानचे कार्यक्रम, महिला मेळावे असले तर आम्ही सगळ्या महिला रिक्षा करून मेळाव्यासाठी खूप उत्साहाने जातो. सगळ्या महिलांना खूप अभिमान आहे की आम्ही समता पतसंस्थेच्या गटामध्ये आहोत.

**समतेच्या वाटेनं तु खनकावीत पैंजण यावं**
**तू यावं... तू याव... बंधन तोडीत याव...**



| नाव | माने रत्नमाला भीमराव |
|---|---|
| गाव | मुर्शदपुर, ता.जि. बीड |
| वय | ४३ वर्ष |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | किराणा दुकान |
| बचत गट नाव | नरसुबाबा समताशक्ती महिला बचत गट |

मी **माने रत्नमाला भीमराव** गाव मूर्शदपूर, ता.जि. बीड, माझ्या घरात मी, पती आणि दोन मुलं असं आमचं कुटुंब आहे. समता पतसंस्था सुरू झाली तेव्हापासूनचा आमचा गट आहे. आज माझी संस्थेमध्ये एकूण बचत जवळपास सव्वीस हजार इतकी जमा आहे. सुरुवातीला जेव्हा आम्ही समता तालुका पतसंस्थाकडून कर्ज घेत होतो तेव्हा आम्हाला सुरूवातीचे छोटे पाच हजार कर्जापासून सुरुवात झाली होती. बघता बघता मी या पतसंस्थेकडून पाच हजार ते पन्नास हजार पर्यंतचा टप्पा पूर्ण केला. या पतसंस्थेने मला गटात आल्यापासून नेहमीच मदत केली आहे. माझं दहा वर्षापासून किराणा दुकान चालू आहे ते फक्त समता पतसंस्थेच्या सहकार्यामुळेच. मी नेहमी आमच्या गावातील महिलांना घेऊन समता पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला, मेळाव्याला किंवा इतर दुसरे काही सामाजिक कार्यक्रम असतील तर त्यांना घेऊन येते. या पतसंस्थेकडून मेळाव्यामध्ये आमच्या गटाला वर्ष २०१८ चा उत्कृष्ट बचत गट पुरस्कारही मिळालेला आहे. मलाही उद्योजक महिला म्हणून पुरस्कार मिळालेला आहे.

आम्ही आमच्या गावातही समतातर्फे वेगवेगळे उपक्रम राबवत असतो. जसे की, सावित्रीबाई फुले जयंती, ८ मार्च–जागतिक महिला दिन आणि वृक्षारोपण, यामध्ये आम्ही सीताफळ, जांभळ, आवळा, केशर आंबा ही झाडं आम्हाला लावण्यासाठी या पतसंस्थेने वाटप केली होती. आजही ही सर्व झाडे आम्ही चांगल्या प्रकारे जोपासलेली आहेत. समता पतसंस्था ही फक्त पतसंस्था नाही तर महिला सक्षमीकारणासाठी लढणारी संस्था असुन आमच्या सुखदुःखात आम्हाला साथ देणार एक कुटुंबच आहे. कोरोनाच्या जागतिक महामारीच्या काळात हातावरचे पोट असणाऱ्या गरजू लोकांचे/महिलांचे काम बंद झाले होते. अश्या आणीबाणीच्या काळात रोजच्या भाकरीचा प्रश्न निर्माण झाला होता. मुर्शदपुर येथील महिलांनी त्यांची व्यथा समताच्या कार्यकर्त्या कौशल्या ताई यांच्या जवळ व्यक्त केली. त्यावेळेस आमच्या अडचणी ऐकून आम्हाला कोरो, मुंबई तथा समता पतसंस्थेच्या माध्यमातून महिलांना किराणा किट वाटप केल्या होत्या. या संस्थेने सातत्याने एकल महिला व त्यांच्या मुलांनाही शिक्षणासाठी आर्थिक, शैक्षणिक साहित्याची मदत केलेली आहे. गटातील सगळ्याच महिलांना खूप अभिमान आहे की आम्ही समता पतसंस्थेसारख्या संस्थेला जोडून आहोत याचा.

**जे का रंजले गांजले... त्यासी म्हणे आपुले...!!**



| | |
|---|---|
| नाव | वंदना गौतम वीर |
| गाव | पाली, ता.जि. बीड |
| वय | ४५ वर्ष |
| शिक्षण | नववी |
| व्यवसाय | कुक्कुट पालन |
| बचत गट नाव | दिक्षा समताशक्ती महिला बचत गट |

मला ३ मुली आहेत व माझे पती रिक्षा चालवतात. नवऱ्याच्या उत्पन्नावरच आमचे कुटुंब चालायचे. यातून आमच्या गरजा भागत नव्हत्या. त्यामुळे बचत गटात सहभागी झाले. मी गेल्या २० वर्षापासून वेगवेगळ्या गटामधून कर्ज घेतले व फेडले आहे. सुरूवातीला जेव्हा कर्ज घ्यायचे तेव्हा माझे पती माझ्यासोबत असत. बँकेत गेल्यावर मी फक्त कर्जाचे पैसे हातात घ्यायचे व ते माझ्या पतीकडे द्यायचे. ते पैसे घ्यायचे आणि मोजून खिशात ठेवायचे मला काहीच विचारत नसत.

आता मी गेल्या १० वर्षापासून समता महिला बचत गट पतसंस्थेमध्ये दिक्षा नावाचा गट केला आहे. या गटात मी अध्यक्ष आहे. या गटात येण्याअगोदर मी कधीच काही विचार केला नव्हता. कर्ज घ्यायचं गरजा भागवायच्या! पण आता समताच्या गटांमध्ये आल्यापासून मला विचार करण्याची सवय लागली आहे. छोटासा काहीतरी उद्योग चालू करायचा ठरवले आणि लगेचच निर्णय घेतला. समता ही एकमेव संस्था आहे की या संस्थेतून फक्त महिलांना उद्योगासाठी कमी व्याजामध्ये कर्ज दिल्या जाते. समतामध्ये पुरुषांचा काही हस्तक्षेप नसतो. इथ महिलांनीच कर्ज घ्यायचे आणि आपला उद्योग चालू करायचा. त्यामुळे महिला समता बचत गटाच्या माध्यमातून महिला आपले विविध व्यवसाय सुरू करायला लागल्या आहेत. माझे पती रिक्षा चालवतात पण त्यांच्या रिक्षाच्या पैशांमधून आमचं घर भागत नव्हते. त्यामुळे मी समताच्या गटातून माझ्या नावावर दहा हजार रुपयाचे पहिले कर्ज घेतले. या कर्जातून मी कुक्कटपालनाचा व्यवसाय करायचा ठरवले. त्यानुसार मी सुरूवातीला काही कोंबड्या खरेदी केल्या व व्यवसायला सुरुवात केली.

माझ्या या कुक्कटपालनाच्या व्यवसायामुळे माझ्या नवऱ्यालाही हातभार लागला व कुटुंबाचा गाडा चांगल्या पद्धतीने चालू लागला. माझे कुटुंब आता आर्थिकदृष्ट्या चांगले चालू लागले आहे. आता आम्हाला कुणाच्या हाताकडे बघायची वेळ येत नाही. पहिले कर्ज मी नियमित फेडून पुन्हा दुसरे वीस हजार रुपये कर्ज घेतले आहे. या कर्जातून घेतलेले पैसे मी याच व्यवसायामध्ये टाकून व्यवसाय वाढवला आहे. आता माझा कुक्कुटपालनाचा व्यवसाय चांगला चलत आहे. आता मला माझ्या नवऱ्याला हप्ता भरण्यासाठी पैसे मागावे लागत नाहीत. मी माझ्या या व्यवसायातून माझी गटाची बचत व कर्ज हप्ते नियमित भरत आहे. मी माझ्या गटासोबत अजून जयदीप व भारती या नावाचे दोन गट समताला जोडले आहेत. आता माझ्याकडे समता पतसंस्थेचे तीस हजाराची कर्ज चालू आहे. २०२१ मध्ये एवढ्या कोरोनाच्या आणीबाणीच्या काळातही समतामूळे मी माझ कुटूंब स्वतः सांभाळू शकले. नाहीतर कोरोना सारख्या महामारीच्या काळात जगणं कठीण झालं असतं.



| | |
|---|---|
| नाव | कोमल गणेश गलांडे |
| गाव | ढेकनमोह, ता.जि. बीड |
| वय | २९ वर्ष |
| शिक्षण | बी.ए. |
| व्यवसाय | शिलाई मशीन कामे |
| बचत गट नाव | सत्यजीत समताशक्ती महिला बचत गट |

मी **कोमल गणेश गलांडे** राहणार ढेकनमोह आमच्या घरामध्ये मी माझे पती आणि एक मुलगी असा आमचा परिवार आहे. मी गेल्या नऊ वर्षापासून सत्यजित समताशक्ती महिला बचत गटामध्ये अध्यक्ष म्हणून आहे. माझं माहेर आहेर धानोरा आहे. मला शिक्षणाची खूप आवड होती पण घरच्यांच्या आग्रहामुळे लवकर लग्न झाले. ढेकनमोह या गावात मी आले. नवीन गाव नवीन घर माझ्यासाठी हे खूप अनोखं होत. थोड्याच दिवसांमध्ये मी या घरात चांगलीच रुळले व घरचे, शेतातले कामही करू लागले. मला शिक्षणाची खुप आवड होती म्हणून मी माझे शिक्षण पूर्ण केलं. माझे एक स्वप्न होतं की पोलीस ऑफिसर बनायच पोलीस भरतीचे क्लासेस लावुन मी ते नियमित करू लागले. सगळे सुरळीत सुरु असताना अचानक माझे आजारपण मागे लागले. बघता बघता या आजारपणाने माझा पिच्छा काही सोडला नाही अन माझे पोलीस बनायचे स्वप्नं स्वप्नंच राहिले. मी आणि माझे पती दोघेही मग शेतात काम करू लागलो. आजारपणामुळे शेतात मला जास्त काम होत नव्हत म्हणून आम्ही आता शेतात शेत मजूर लावून काम करून घेतो. मी माझी ही व्यथा समता पतसंस्थेच्या कार्यकर्त्यांपाशी मांडली तेव्हा ताईंनी मला खूप चांगला सल्ला दिला की ताई तुम्हाला शेतातलं काम होत नाही तर तुम्ही काहीतरी घरच्या घरी उद्योग चालू करा म्हणजे तुम्हाला आराम भेटेल. त्यांनी मला बऱ्याच उद्योजक महिलांची माहिती सांगितली मग मी आणि माझ्या पतीने पण ठरवलं की आपणही काहीतरी घर बसल्या व्यवसाय चालू करायचा. स्त्री आणि पुरुष ही संसार रथाची दोन चाके आहेत आणि या दोन चाकांनी विचारांनी हा गाडा ओढायचा असं आम्ही ठरवलं.

माझ्याकडे अगोदर शिलाई मशीन होती मग मी ब्लाऊज शिवू लागले. पार्लरचा कोर्स केला आणि एकाच दुकानात मी बांगड्या, ज्वेलरी, स्टेशनरी, शिवणकाम आणि पार्लर असा व्यवसाय चालू केला. आता हे करण्याची मला सवयच लागून गेली या व्यवसायामध्ये मला माझ्या नवऱ्याची ही भरभक्कम साथ होती. आम्ही दोघेही हे करत करत शेतीचंही काम पाहू लागलो. आमच्या गावात आठवडी बाजार भरतो. बाजारच्या दिवशी माझ्या दुकानांमध्ये खूप गिऱ्हाईक असते सगळाच माल खूप विकल्या जातो. खेड्याच्या महिला बांगड्या भरण्यासाठी येतात मी त्यांना बांगड्या ही भरते. हे मी सर्व करू शकले कारण, समताने दिलेल्या आर्थिक पाठबळामुळे. आता माझ्याकडे समताचे चाळीस हजाराचे कर्ज असुन ते मी नियमित भरते आहे.



| | |
|---|---|
| नाव | सुरेखा अशोक देवकते |
| गाव | ढेकनमोह, ता.जि. बीड |
| वय | ४२ वर्ष |
| शिक्षण | १२ वी |
| व्यवसाय | पिठाची गिरणी आणि कांडन यंत्र |
| बचत गट नाव | किरण समता महिला बचत गट |

मी **देवकते सुरेखा अशोक** राहणार ढेकणमोहा. अंगणवाडीमध्ये मदतनीस आहे. वीस वर्षापूर्वी माझ्या पतीचं निधन झालं. पदरात एक मुलगी आणि एक मुलगा. मुलीचं लग्न झालं. घरात फक्त मी आणि मुलगा मला आंगणवाडीत पगारही कमी जमीनही नाही घरखर्च ही भागत नव्हता. मी सहा वर्षापूर्वी समता पतसंस्थेच्या बचत गटामधे आले. बचत गटात येण्याअगोदर मला बाहेरच काहीच माहिती नव्हतं. समताच्या बचत गटामध्ये आल्यामुळे आम्हाला वेगवेगळी माहिती मिळू लागली. समता पतसंस्थेच्या बचत गटांमध्ये आल्यावर विचार करायची सवय लागली. विचार करत असताना मनामध्ये एक कल्पना आली की आपण काहीतरी व्यवसाय चालू करावा म्हणजे स्वतःच्या पायावर उभा राहता येईल.

व्यवसाय करायचा तर पैसा आणायचा कुठून हाही एक माझ्यापुढे प्रश्न होता. सावकाराकडून जर कर्ज काढावं तर सावकाराचे व्याज द्यायला परवडणार नाही म्हणून मी कमी व्याजामध्ये समता पतसंस्थेचे दहा हजार कर्ज घेतले आणि पिठाची गिरणी घेतली. गिरणी घेतल्यामुळे माझं घरही भागू लागलं आणि पैसेही थोडेफार शिल्लक राहू लागले. नंतर ते कर्ज परतफेड करून मी वीस हजाराचं कर्ज घेतलं आणि पिठाची गिरणी घेतली. आता माझ्या दोन्हीही गिरण्या चांगल्या चालू लागल्या आहेत, नफा ही चांगला होतो हे सगळं मी करू शकले फक्त समता पतसंस्थेच्या मदतीमुळे. संघर्ष काय असतो हे कळायला लागले, या जगात सुखी कोणीच नाहीये संघर्ष हा प्रत्येक व्यक्तीच्या नशिबात आहेच हे पाहायला मिळायला लागले आपल्यापेक्षा खूप दुःखी लोक आहेत हे पाहिल्यावर मला माझ दुःख कमी वाटू लागल...



**प्रयत्न ही आयुष्यातील अशी एक पायरी आहे..**
**तिच्यापुढे नशीब सुद्धा हार मानते..**



| | |
|---|---|
| नाव | पांचाळ रुपाली गोरख |
| गाव | ग्रामसेवक कॉलनी, नगर रोड, बीड |
| वय | ३३ वर्ष |
| शिक्षण | १२ वी |
| व्यवसाय | साडी सेंटर व लेडीज वियर |
| बचत गट नाव | जानकी समताशक्ती महिला बचत गट |

मी **रुपाली गोरख पांचाळ** राहणार ग्रामसेवक कॉलनी, नगर रोड, बीड. माझ्या घरात माझे पती, सासु, सासरे, दीर व छोटी दोन मुलं असा आमचा भरलेला परिवार आहे. मी २०१६ मध्ये समता तालुका पतसंस्थेच्या बचत गटामध्ये होते. काही कारणास्तव तो बचत गट बंद झाला. मी त्या बचत गटात असताना तालुका पतसंस्थेकडून पाच हजार रुपये कर्ज घेऊन साधी शिलाई मशीन घेतली होती. समता पतसंस्थेमुळे मला माझा व्यवसाय सुरु करण्यासाठी मदत झाली. शिलाई मशीनच्या माध्यमातून माझ्या हाताला काम मिळालं.तेव्हापासून माझ्या मनामध्ये पुन्हा बचत गट चालू करण्याची मनापासून इच्छा होती. २०२२ मध्ये मी माझ्या गल्लीतील दहा महिला जमा करून जानकी नावाचा बचत गट तयार केला. आज आमच्या गटामध्ये समता पतसंस्थेचे दोन लाख रुपये कर्ज वाटप झाले आहे. गटातील बऱ्याच महिला छोटे-मोठे व्यवसाय करतात. त्यापैकीच मी एक माझ्याकडे साडी सेंटर व लेडीज वेअर, पिको फॉलची मशीन आहे. त्याचबरोबर मी हाताने कपड्यावर हॅन्ड वर्क पण करते. मला साड्यांचा माल भरण्यासाठी आणि पिको फॉलची मशीन घेण्यासाठी समता पतसंस्थेची खूप मदत झाली.

मी अगोदर बँकेमध्ये नौकरी करत होते. जसजसा माझा व्यवसाय वाढू लागला तेव्हा मी बँकेची नौकरी सोडण्याचा निर्णय घेतला. आता मी पूर्णवेळ माझ्या व्यवसायामध्ये लक्ष देऊ लागले. माझे पती खाजगी वाहनावर ड्रायव्हर म्हणून नोकरी करतात. आज आमच्याकडेही स्वतःची चारचाकी गाडी आहे. गाडीला नियमित भाडे लागत नसल्यामुळे माझे पती दुसऱ्याच्या गाडीवर ड्रायव्हर म्हणून काम करतात. माझ्या पतीला आणि माझ्या कुटुंबाला माझी खूप मदत होते. महिलांना नेहमी घरच्यांच्या बंधनात राहाव लागतं. लग्नाआधी बाप, भाऊ आणि लग्नानंतर नवरा! हा प्रवास निरंतर चालूच राहतो. माझ्या पतीचा स्वभाव खूप समजूतदार असल्यामुळे मला कधीच त्यांनी कोणत्या बंधनात ठेवल नाही. मी नेहमी नवीन नवीन काहीतरी शिकण्यामध्ये एक पाऊल पुढे टाकत होते माझे पतीही मला मदत करत होते. सावित्रीबाई फुले यांना जसी महात्मा फुलेंची साथ होती अगदी तशीच मला माझ्या पतीची साथ आहे.

सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे माझ्या सासूबाई, त्या सासू नाहीतर माझ्या आई समान आहेत. आई समान नाही तर आईच आहेत असं म्हटलं तरी चालेल. आज त्यांची मला खूप साथ आहे. त्यांनी साथ दिली आणि घरात लक्ष दिले म्हणून मी हे करू शकले.

**पहिली माझी ओवी गं, सावित्रीच्या बुद्धीला, स्त्रियांच्या शिक्षणाचा पाया तू घातला...**



| | |
|---|---|
| नाव | सुशीला मोहन थापडे |
| गाव | ढेकनमोह, ता.जि. बीड. |
| वय | ६० वर्ष |
| शिक्षण | नाही |
| व्यवसाय | किराणा दुकान आणि भाजीपाला |
| बचत गट नाव | उन्नती समता महिला बचत गट |

मी **सुशीला मोहन थापडे** ढेकणमोहा येथील आहे. माझी सून मंगल थापडे ही समताच्या बचत गटामध्ये आहे. मला अगोदर माहीत नव्हतं की तिने बचत गटामध्ये नाव टाकले आहे. ती दर महिन्याच्या तीन तारखेला गटाच्या मिटिंगला जात असे. मग मी तीला एक दिवस विचारलं तू हे पासबुक घेऊन कुठे जात आहे. तेव्हा तिने मला सांगितले की समता पतसंस्थेचा गट आहेत्या गटामध्ये मी माझं नाव टाकलेलं आहे. मी तिच्याकडून गटाविषयी सगळी सविस्तर माहिती घेतली व तिने मला सांगितले की त्या गटातून मी कर्ज घेते आणि माझी बचतही होते. मी तिला विचारले की या गटात माझं नाव टाकण्यासाठी काय करावे लागेल. याबाबत तिने मला समताच्या कार्यकर्त्या कौशल्या ताई यांचा नंबर दिला व त्यांच्याशी बोलून घ्या असे संगितले. मी ताईंना फोन करून विचारले की तुम्ही आमच्या गावात किती तारखेला येणार आहात. त्यानुसार त्यांनी सांगितलेल्या तारखेला मी त्यांना जाऊन भेटले. गटाविषयी माहिती विचारली तेव्हा समताच्या ताईंनी मला गटाविषयी सगळी माहिती सांगितली. आपल्या संस्थेमधून कमी व्याजामध्ये कर्ज भेटते तसेच कर्जासोबत आपली बचतही होते. मी जेव्हा विचार केला की, असेही महिलांच्या नावावर काहीच नसत घर नवऱ्याच्या नावावर जमीन नवऱ्याच्या नावावर मग बाईच्या नावावर काय? म्हणून मी बचत गटात नाव टाकायच ठरवलं जेणेकरून माझ्या नावावर काहीतरी बचत होईल. आमच्या नवरा बायकोच्या अडचणीच्या काळामध्ये मला मुलांना पैसे मागण्याची गरज पडणार नाही हे पैसे आमच्या म्हातारपणी आम्हाला उपयोगी येतील.

आज आमच्या गटाला आठ वर्ष झाले आहेत. आमच्या गटामध्ये दहा सभासद असून सगळे सभासद व्यवस्थित कर्ज परतफेड व बचत भरतात. मी सुद्धा नेहमी कर्ज घेते व नियमित परतफेड करते. माझा स्वतःचा भाजीपाल्याचा व्यवसाय आहे. मला या पैशांचा फायदा भाजीपाला मार्केटमधून आणण्यासाठी होतो. भाजीपाल्याचा व्यवसाय करत असतानाच मला एक कल्पना सुचली ती अशी की, मी एक छोटसं किराणा दुकान टाकायचं ठरवलं. यासाठी मी माझ्या नवऱ्यासोबत बोलले आणि तेही किराणा दुकान टाकण्यासाठी तयार झाले. घरचे काही भांडवल व समताचे तीस हजार कर्ज घेऊन मी माझे स्वतःचे किराणा दुकान टाकले आहे. आज माझं किराणा दुकान चांगल्या प्रकारे चालत असून मला नफाही चांगलाभेटत आहे.

आता माझे पती माळव्याचा व्यवसाय करतात व मी किराणा दुकान चालवते. मी खूप जिद्दीने आणि चिकाटीने हा व्यवसाय केला असूनया व्यवसायामध्ये यशस्वी झाले. आज मला कुठेही बाहेर कामाला जायची गरज पडत नाही. आज मी स्वतःच्या घरी बसून हा व्यवसाय करत आहे. **मी समता पतसंस्थेमुळे स्वतःच्या पायावर उभा राहिले हे सगळ करण मला फक्त समता मुळे शक्य झाल.**



| | |
|---|---|
| नाव | होंड्रे राजश्री गोरख |
| गाव | ढेकनमोह, ता.जि. बीड. |
| वय | ३० वर्ष |
| शिक्षण | ४ थी |
| व्यवसाय | साडी सेंटर आणि लेडीज वेअर |
| बचत गट नाव | उन्नती समता महिला बचत गट |

मी **राजश्री गोरख होंड्रे** राहणार ढेकणमोह तालुका जिल्हा बीड. आमच्या घरामध्ये मी पती दोन मुलं आणि एक मुलगी असा आमचा परिवार आहे. माझे पती हे खाजगी कंपनीचे औषध-गोळ्या प्रत्येक मेडिकल वर देण्याचे काम करतात. या कामाचा त्यांना पगार सुद्धा जास्त मिळत नव्हता. जमीनही थोडी असल्यामुळे म्हणावे तेवढे उत्पन्न त्यातून येत नव्हते. त्यात मुलांचे शिक्षण, घराचा, दवाखान्याचा खर्च भागणे अतिशय कसरतीचे होऊन जायचे. यातून काहीतरी मार्ग काढणे आवश्यक वाटत होते. आपण एखादा छोटासा व्यवसाय जर केला तर नक्कीच आपल्याला व कुटुंबाला याचा फायदा होईल. पण कोणता व्यवसाय करावा हे काही कळत नव्हते. याबाबत मी माझ्या पतीसोबत बोलले तर त्यांनी मला साडी व लेडीज वेअरचा आपण व्यवसाय करू शकतो असे सुचवले. कारण या गोष्टी दैनंदिन जीवनात लागतात त्याच्यामुळे आपला व्यवसाय चांगला चालू शकतो.

शेवटी आम्ही दोघांनी मिळून साड्यांचा व लेडीज वेयर विकण्याचा व्यवसाय चालू करायच ठरवल. पण यासाठी भांडवल लागणार! मग हे आणायचे कुठून? हा प्रश्न होताच. आमच्याजवळ असलेलं थोडं भांडवल व माझ्या समता पतसंस्थेच्या बचत गटातून कर्ज काढून व्यवसाय करण्याचे ठरले. तत्पूर्वी हा व्यवसाय करताना येणाऱ्या अडचणी कोणत्या, हा व्यवसाय किती रुपयांपासून सुरू करू शकतो, व्यवसायामध्ये किती नफा होतो ही सगळी माहिती आम्ही घेतली अन मगच हा व्यवसाय आम्ही चालू केला. तीस ते पन्नास हजाराच्या भांडवलातून सुरू केलेला हा व्यवसाय आज लाखात जाऊन पोहोचला. मी गेल्या आठ वर्षापासून उन्नती समता शक्ती महिला बचत गटांमध्ये आहे या गटाचाही मला खूप उपयोग झाला कारण जेव्हा आम्ही मीटिंगला एकत्रित येतो तेव्हा माझ्या दुकानाविषयी चर्चा होते. गटात असल्यामुळे सगळ्या महिला माझ्या व्हाट्सअप ग्रुपला जोडल्या आहेत. गटातील बऱ्याच महिला माझ्याकडून साड्या घेण्यासाठी येतात त्यातून माझी विक्री होते व इतर काही नवीन ओळखी वाढत जातात. हे सर्व मी करू शकले ते फक्त समता पतसंस्थेच्या आणि माझ्या पतीच्या मदतीमुळे.

**मला अभिमान आहे मी समता पतसंस्थेच्या गटामध्ये आहे इच्छा असेल तर मार्ग नक्कीच निघतो फक्त संधीच सोन करता आल पाहिजे...**



| | |
|---|---|
| नाव | सोनी विजया हिरालाल |
| गाव | चऱ्हाटा फाटा, ता.जि. बीड. |
| वय | ३९ वर्ष |
| शिक्षण | ७ वी |
| व्यवसाय | किराणा दुकान |
| बचत गट नाव | धनराज समताशक्ती महिला बचत गट |

मी **सोनी विजया हिरालाल** गेल्या दोन वर्षापासून धनराज समताशक्ती महिला बचत गटामध्ये आहे, स्वतः च्या नावावर काहीतरी पाहिजे म्हणून बचत गटामध्ये नाव टाकलं. बचत गटात नाव तर टाकलं खरं पण कधी कधी शंभर रुपये ही बचत भरण्यासाठी नसायचे. घरातल्यांना सतत मागावे लागत होते. असे आपण किती दिवस घरच्यांकडे हात पसरायचे? आपले आपण स्वतः पायावर उभा राहायच. एक दिवस आमच्या बचत गटाची मीटिंग चालू असताना वेगवेगळ्या विषयावर आम्ही सगळेजण चर्चा करत होतो. आमच्या येथील धनराज आणि राजयोग दोन गटाच्या मीटिंग एकत्र असतात. मिटींगला जवळ जवळ २० महिला उपस्थित असतात. आमची मीटिंग फक्त आर्थिक व्यवहारासाठीच नसते तर आम्ही सगळे मनाने एकत्र असतो. गटाच्या बैठकीत फक्त धन व्यवहार नाही तर मन व्यवहारही होतो. एकमेकांच्या अडचणी विषयी देवाण घेवाण होते.

गटाच्या बैठकीत मी ताईंशी मलाही काही व्यवसाय करायचा आहे याबाबत बोलले. आमच्या सर्व चर्चा झाल्यानंतर आम्ही सगळ्या गटातल्या महिलांनी आणि समता संस्थेच्या ताईंनी मिळून ठरवलं की किराणा दुकान टाकायचं. किराणा दुकान ही प्रत्येक गावाची प्रत्येक भागाची गरज आहे. कोरोना सारख्या महामारीच्या काळातही किराणा दुकान चालूच होते. वर्षाचे बारा महिने चालणारा व्यवयसाय म्हणून या व्यवसायाकडे बघितले जा. या उद्योगासाठी कोणत्याही डिग्री ची गरज नाही. व्यवसायाची थोडीफार माहिती आणि भांडवल असले की हा व्यवसाय आपण सहजपणे करू शकतो. असा विचारा आम्ही सगळ्या महिलांनी केला. भांडवल तर समता पतसंस्थेकडून मिळेलच हे आम्हाला माहीत होतआणि मी एक दिवस समता पतसंस्थेची मदत घेऊन किराणा दुकान चालू केले, आज माझे दुकान खूप चांगले चालू लागले आहे. गिऱ्हाईकांच्या गरजा त्यांच्या आवडी निवडी पसंती ना पसंती आणि गिऱ्हाईक कोणत्या गोष्टी जास्त खरेदी करतात यावरून दुकानात मी जास्त प्रमाणात माल ठेवते. प्रत्येक भागामध्ये राहणाऱ्या गिऱ्हाईकांच्या दैनंदिन गरजा वेगवेगळ्या असतात..

**आज मी स्वतःच्या पायावर उभा राहिले फक्त माझ्या गटातील मैत्रिणींच्या आधारामुळे आणि समता महिला बचत गट संस्थेमुळे.**



| | |
|---|---|
| नाव | अर्चना अनंत डोंगरे |
| गाव | शनी मंदिर गल्ली, बीड. |
| वय | ३० वर्ष |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | किराणा दुकान. |
| बचत गट नाव | विठोबा समताशक्ती महिला बचत गट |

मी **अर्चना अनंत डोंगरे** राहणार शनीमंदिर गल्ली बीड, आमच्या घरात मी पती सासू-सासरे, दोन मुलं आणि लहान दीर असा सात जणांच आमच कुटुंब आहे. घरची परिस्थिती जेमतेमच असून पण बीड सारख्या ठिकाणी रहायला पत्र्याचं का होईना घर असल्यामुळे तेवढेच बळ आहे. माझे सासु-सासरे शिदोड येथे लोकांच्या इथे वर्षाच्या करारावर शेतात काम करतात. पती खाजगी शाळेवर नौकरीला आहेत पण पगार कमी असल्यामुळे घर खर्च भागणार कसा त्यातमुलांच्या शिक्षणाचा खर्च वेगळाच. मी गेल्या चार वर्षापासून समता पतसंस्थेच्या विठोबा गटामध्ये अध्यक्ष आहे. गटामध्ये बचत भरू लागले कर्जही घेऊ लागले, पण एक दिवस मी ठरवलं की आपण काहीतरी व्यवसाय चालू करायला पाहिजे. माझ्या कुटुंबाला व पतीला माझी मदत होईल. मी समता पतसंस्थेच्या मदतीने किराणा दुकान टाकायचे ठरवले आणि किराणा दुकान चालू केले.

आज स्वतःचे किराणा दुकान टाकून स्वतःचा खर्च स्वतः भागवू लागले आहे. मी हे सर्व करू शकले ते फक्त समता पतसंस्थेमुळे अन समताच्या कार्यकर्त्याशी मनमोकळेपणे बोलल्यामुळे. कुठलंही अबोल नातं व्यक्त व्हायला शब्दांची नव्हे तर सुंदर विचारांची गरज भासते कारण या विचारांतूनच एकमेकांबद्दल विश्वास निर्माण होतो. अश्या नात्यातूनच चांगल्या भावना तयार होतात. हाच विश्वास आमच्यामध्ये आणि समता पतसंस्थेमध्ये निर्माण झाला. आता मी अजून एक नवीन राघव. नावाचा गट केला आहे. आपला व्यवसाय यशस्वी करण्यासाठी तोंडात साखर आणि डोक्यावर बर्फाचा गोळा ठेवावा लागतो, लोकांशी गोड बोलावं लागत. आता माझ्यामध्ये खूप आत्मविश्वास आला असून मी हा आत्मविश्वास सगळ्या महिलांपर्यंत पोहोचवत आहे..

**आता पुरे झालं घरात बसून ...**
**या आव्हानाला पेलूया हसून..**
**उठ हक्कासाठी कंबर कसून...**



| | |
|---|---|
| नाव | देवई भागवत केंगार |
| गाव | मुर्शदपुर, ता.जि. बीड |
| वय | ५९ वर्ष |
| शिक्षण | ४ थी |
| व्यवसाय | किराणा दुकान. |
| बचत गट नाव | सुप्रिया समताशक्ती महिला बचत गट |

मी **देवई भागवत केंगार** बीड पासून जवळच दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या मुर्शदपुर या गावातील रहिवाशी आहे. माझ्या गावात सुप्रिया समताशक्ती महिला बचत गट असून या गटात मी अध्यक्ष पदावर आहे. आमच्या गटामध्ये दहा सभासद आहेत. आम्ही गेल्या आठ वर्षापासून समता पतसंस्थेच्या गटामध्ये आहोत. आम्हाला सगळ्यांना एकत्र आणणारा घटक म्हणजे समता पतसंस्था आहे. माझे पती पोस्ट ऑफिसमध्ये कामाला होते. मुलगा क्लासेस चालवतो त्यामुळे आमचीपरिस्थिती बेताचीच आहे.

आम्ही काय पेशाने व्यवसायिक नाहीत पण व्यवसाय करण्याची आवड होती. मी जेव्हा समता पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला, मेळाव्याला जायचे तेव्हा मला तेथे व्यवसाय करणाऱ्या महिला भाषण करताना दिसायच्या. समता प्रतिष्ठान त्यांना उद्योजक महिला म्हणून पुरस्कार देत असे हे मी सगळं पाहत होते. माझ्याही मनामध्ये कुठेतरी खंत होती की आपणही काहीतरी व्यवसाय करायला पाहिजे.

परिस्थिती बेताची असल्यामुळे व्यवसाय करण्यासाठी पैसे आणायचे कुठून! व्यवसायाचे ज्ञान नसल्यामुळे कोणता व्यवसाय करायचा असे प्रश्न समोर होते. पण मी जेव्हा समता पतसंस्थेच्या गटात सहभागी झाले तेव्हा माझ्या व माझ्या सासूबाईंच्या नावावर कर्ज घेतलं. या कर्जातून मी सर्वप्रथमकाही शेळ्या घेतल्या. मी तेवढ्यावरच थांबले नाही तर स्वतःचे किराणा दुकान टाकायचं ठरवलं. यासाठी मी समता पतसंस्थेकडून पुढचे सासूबाईंच्या नावावर वीस हजार व माझ्या नावावर तीस हजार असे एकूण पन्नास हजार कर्ज घेतले. या कर्जातून सर्वप्रथम काही माल भरून एक छोटसं किराणा दुकान चालू केलं. बघता बघता किराणा दुकान चांगले चालू लागले. जसजसे गिराईक वाढूलागले तसतसा माझा आत्मविश्वास वाढत गेला.

आता मी शेतात जरी गेले तरी शेतातल्या महिलांना मी आत्मविश्वासाने व्यवसायामध्ये कशी प्रगती केली ते सांगते. माझा हा व्यवसाय बघून आणि माझी झालेली प्रगती बघून आमच्या गावातील जवळच्या वस्तीत अजून दोन गट नवीन झाले. मला माझाच अभिमान वाटतो की माझ्यामध्ये आत्मविश्वास नव्हता एवढा आत्मविश्वास कुठून आला! हा आत्मविश्वास मला समता पतसंस्थेच्या प्रोत्साहनामुळे आला हे आता मला कळून चुकले. मी समताच्या बचत गटात येण्याअगोदर मला काहीच कळत नव्हते. रोज उठ आणि फक्त चुल आणि मुल एवढंच करायचं, पण आज मी समतामुळे ताठ मानेने सगळ्यांना सांगू शकते की, **महिलाही कशातच कमी नाहीत फक्त आपल्यामध्ये जिद्द आणि आत्मविश्वास पाहिजे.**



| | |
|---|---|
| नाव | शेख शेहनाज अखिल |
| गाव | गोरे वस्ती, ता.जि. बीड |
| वय | ३५ वर्ष |
| शिक्षण | ७ वी |
| व्यवसाय | हरमाल तथा ज्वेलरी विक्री |
| बचत गट नाव | तनिष्क समता महिला बचत गट |

मला दोन मुली एक मुलगा पती आणि मी असा आमचा परिवार आहे. परिस्थिती थोडी हालाखीची असल्यामुळे माझे पती स्टेशनरी सामान छोट्या रिक्षामध्ये घेऊन जिथे यात्रा किंवा बाजार असेल तिथे जाऊन विकत असत. त्याच पैशावर आमचं घर भागत असे. मुलं मोठी झाली खर्च वाढू लागला घरात पैशाची खूप चनचन वाटू लागली. पैसा कितीही आला तरी घरात पुरत नव्हता. मग आमची चिडचिड होऊ लागली व घरात भांडण होऊ लागली. मी २०१५ पासून समता पतसंस्थेच्या बचत गटामध्ये होते. या गटातून मी पाच हजारापासून ते चाळीस हजारापर्यंत कर्ज घेऊन माझ्या पतीला व्यवसायासाठी नेहमी मदत करायचे. घेतलेले कर्ज महिन्याचे महिन्याला नियमित परतफेड करत असे. आमचे कर्ज खाते नियमित चांगले असल्यामुळे मी ठरवलं की आता पन्नास हजाराचे कर्ज घ्यायचे आणि माझ्या पतीला त्याच व्यवसायामध्ये स्वतः मदत करायची.

समता पतसंस्थेचे कर्ज हे कमी व्याजामध्ये भेटत असल्यामुळे आणि महिन्याला हप्ता असल्यामुळे आम्हालाही कर्ज घ्यायला परवडत होतं. आम्ही जर सावकाराचं कर्ज घेतलं असतं तर आम्हाला महिन्याचे महिन्याला व्याज द्यावं लागलं असतं. मुद्दल त्याला कधीही एकत्र द्यावी लागली असती. आपण जर समताचे कर्ज घेतलं तर सावकाराला जे व्याज द्यायचं आहे त्या व्याजामध्ये इकडं कर्जाचा हप्ता भरून आमचं कर्ज थोडं थोडं कमी होईल. कर्ज फिटल म्हणून मी समताचं पन्नास हजाराचे कर्ज घेतलं आणि स्वतः ज्वेलरी आणि छोटे छोटे भांडे सामान खरेदी करून मी माझा स्वतःचा व्यवसाय सुरू केला. आज मी स्वतः माझ्या पतीसोबत यात्रेला जाऊन त्यांना मदत करीत आहे. आज आमचा व्यवसाय खूप चांगला चालत आहे. **मी धन्यवाद मानते समता पतसंस्थेचे आज मी तुमच्यामुळे या व्यवसायात प्रगती करू शकले..**



| | |
|---|---|
| नाव | विजूबाई नंदकुमार घुमरे |
| गाव | शहाजनपूर रुई, ता.जि. बीड |
| वय | ३८ वर्ष |
| शिक्षण | ३ री |
| व्यवसाय | किराणा दुकान, गाय पालन |
| बचत गट नाव | महाराजा समता शक्ती महिला बचत गट |

आमच्या गावामध्ये समता पतसंस्थेचा जिजाऊ नावाचा बचत गट होता. या गटाची मीटिंग घेण्यासाठी समता पतसंस्थेच्या कौशल्याताई बावणे ह्या नेहमी शहाजनपुर या गावात आम्हाला दिसायच्या. एक दिवस मी त्यांच्याशी चर्चा केली व गटाविषयी माहिती विचारून घेतली. आम्ही नवीन गट करण्याचा निर्णय घेऊन त्यांना फोन करून आमच्या गावात बोलावून घेतले. महाराजा नावाचा दहा महिलांचा बचत गट केला. आमच्या गटाला आता चार वर्षे पूर्ण झालेली आहेत. सुरुवातीला कौशल्याताई आमच्याकडे मिटींगला यायच्या तेव्हा वेगवेगळ्या गटात महिला कशा स्वतःचे व्यवसाय करतात ही माहिती सांगायच्या. हे ऐकून माझ्याही मनात विचार आला कि, आपणही काहीतरी व्यवसाय करावा. स्वतःचा व्यवसाय असावा असे प्रत्येकाला वाटते असेच मलाही वाटत होते. माझाही स्वतःचा छोटा मोठा काहीतरी व्यवसाय पाहिजे. माझे शिक्षण कमी आणि भांडवल नसल्याकारणाने काहीही करता येत नव्हतं भांडवल नाही म्हणून शांत बसाव लागत होत. आम्हाला जमीनही थोडीच असल्यामुळे मी विचार केला की, शांत बसायचं नाही.

समता ही बँक कमी व्याजामध्ये कर्ज देते मग आपणही या संस्थेकडून कर्ज घेऊन काहीतरी उद्योग चालू करायचा हे ठामपणे मनामध्ये ठरवले. मी व माझी सून यांच्या नावाने आम्ही वीस वीस हजार रुपये कर्ज घेऊन एक छोटासं किराणा दुकान टाकलं. किराणा दुकान चांगले चालू लागले. समताचे दोघीच्या नावावर घेतलेले चाळीस हजार कर्ज नियमित फेडले. पुढील कर्ज आम्ही दोघीच्या नावावर तीस-तीस हजार अशी एकूण साठ हजार रुपये घेतले. या कर्जाच्या पैश्यात घरचे काही पैसे घालून दोन गायी घेतल्या व दुधाचा व्यवसाय सुरु केला. माझ्या पतीच्याही हाताला यामुळे काम मिळाले. आता सध्या मी सकाळ संध्याकाळ किराणा दुकान चालवते व दिवसभर रानातल काम करत आम्ही दोघ नवरा बायको गायी सांभाळतो. माझे पती रोज दूध घालतात आम्हाला किराणा दुकान आणि दूध या दोन्हीचा मिळून चांगला नफा होतो. आम्ही दोघेही नवरा बायको कुठेही कामाला जात नाहीत आम्ही आमचा स्वतःचाच व्यवसाय करून स्वतःच घर भागवतो व कर्जाचे हप्ते आणि बचतही नियमित भरतो. **मी समताच्या गटामध्ये आल्यामुळे आम्हाला ही व्यवसाय करण्याची चांगली संधी मिळाली.**





| | |
|---|---|
| नाव | गायकवाड रेखा संजय |
| गाव | गोविंद नगर, ता.जि. बीड. |
| वय | ४० वर्ष |
| शिक्षण | ५ वी |
| व्यवसाय | पिठाची गिरणी |
| बचत गट नाव | शक्ती समता महिला बचत गट |

मला एक मुलगा व मुलगी आणि माझे पतीसासुबाई असा आमचा परिवार आहे. राहायला स्वतःचे घर आहे पण हाताला काही काम नाही. उत्पन्नाचं कसलं साधन नाही. पती कधी कामाला जातात तर कधी जात नाहीत घरीच असतात. घरात दोन लहान मुलं सासूबाईजवळ सोडून मी हॉस्टेलवर पोळ्या लाटायला जायचे. आलेल्या माफक पैशांमध्ये आम्ही घर भागवायचो. मुले जसजशी मोठे होऊ लागली तसतसा खर्च वाढू लागला. कामाच्या येणाऱ्या पैशांमध्ये घर भागत नव्हते. मी २०१५ पासून समता पतसंस्थेच्या बचत गटामध्ये आहे. या गटातून पाच हजारापासून तीस हजारापर्यंत खूप वेळा कर्ज घेतले. कर्जाचे पैसे घर खर्चासाठी वापरले त्याच पैशांमध्ये माझ्या दोन मुलांचं संगोपन झालं. मला जेव्हा गरज लागेल तेव्हा-तेव्हा मी समता पतसंस्थेचे कर्ज घेत असे व नियमित परतफेड करत असे. एक दिवस मी ठरवलं की, असं किती दिवस लोकांच्या इथं कामाला जायचं! स्वतःचा काहीतरी उद्योग करायला पाहिजे. मी समताच्या बचत गटाच्या ताईंना कर्जाविषयी बोलले व पन्नास हजार कर्ज मला मिळेल का? असे विचारलं तेव्हा त्यांनी मला प्रश्न केला तुम्ही ५० हजार रुपये कर्ज घेऊन काय करणार आहात.

मी त्यांना सांगितलं जर तुम्ही मला ५० हजार रुपये कर्ज दिले तर मी स्वतःची पिठाची गिरणी टाकेल. मी गिरणी टाकली तर माझी लहान मुलं सोडून मला दुसरीकडे कामाला जायची गरज पडणार नाही. माझ्या घरात बसून माझा व्यवसाय करू शकेल. यावर ताई म्हणाल्या, मी आपल्या संचालक मंडळाच्या मिटींगमध्ये बोलून तुम्हाला सांगते आणि लगेचच ताईंनी संचालक मंडळाच्या मीटिंगमध्ये ठेऊन माझा पन्नास हजाराचा अर्ज मंजूर झाला आहे असे सांगितले. कर्ज रक्कम हातात मिळाल्यावर मी लगेचच एक पिठाची गिरणी घेतली. आता मी माझा स्वतःचा व्यवसाय चालू केला आहे. आज माझी गिरणी खूप चांगली चालत आहे. माझा सगळा घर खर्च भागवून मी व माझे मुलं दिवसभर एकत्र राहून आनंदात आहोत. आज या व्यवसायामुळे मी खूप आनंदात आहे. कर्जाची हप्ते आणि बचतही नियमित भरते. समतानी मुलींच्या नावावर एक खूप छान योजना उघडलेली आहे 'कन्यारत्न' ठेव योजना. माझ्या मुलीच्या नावावर या कन्यारत्न योजनेमध्ये दरमहा पाचशे रुपये भरते.

समताच्या बचत गटांमध्ये आल्यामुळे मला एक खूप चांगली गोष्ट शिकायला मिळाली की महिला या कोणत्याच गोष्टीत कमी नाहीत पुरुषाच्या खांद्याला खांदा देऊन काम करू शकतात. **आज समता मुळे मी समाजात माझी वेगळी ओळख निर्माण केली आहे. मी स्वतः आमच्या गल्लीमध्ये अजून दोन नवीन सईबाई आणि गुंजन नावाचे गट केले तेही खूप छान चालतात.**



| | |
|---|---|
| नाव | संगीता सतीश महामुनी |
| गाव | अयोध्या नगर, बहिरवाडी, बीड |
| वय | ४८ वर्ष |
| शिक्षण | १२ वी |
| व्यवसाय | कटलरी दुकान |
| बचत गट नाव | श्री समर्थ समताशक्ती महिला बचत गट |

मी **संगीता सतीश महामुनी** राहणार अयोध्या नगर बहिरवाडी. माझ्या घरी मी माझे पती, मुलगी दोन मुले सासू असे माझे कुटुंब आहे. मी समता पतसंस्थेची गेल्या सात वर्षापासून सभासद आहे. मी बहिरवाडी येथील रहिवाशी असून येथेच आमचा साई समर्थ समताशक्ती महिला बचत गट नावाचा गट असून मी या गटात आहे. सुरुवातीला संस्थेतून पहिले पाच हजार कर्ज घेतले होते. पहिले कर्ज नियमित भरून मी पुढील कर्ज घेत राहिले. माझी परतफेडीची पत बघुन आता समतासंस्थेने मला पंच्याहत्तर हजार कर्ज दिले आहे.

आम्ही सोनार असल्यामुळे माझ्या पतीचे छोटेखानी सोन्याचे दुकान आहे. पण त्यातून कुटुंबाचा उदरनिर्वाह जेमतेमच होत होता. कुटुंबाच्या जबाबदाऱ्या सांभाळून मीही या कामात पतीला जमेल तशी मदत करत होते. कुटुंबाचा खर्च बघता या कामातून शिल्लक पैसे राहत नव्हते. एखादा नवीन काही व्यवसाय आपल्याला करता येईल का असा सतत विचार डोक्यात सुरु होताच. मी गटात असल्यामुळे माझ्या मागे समताचे आर्थिक पाठबळ होतेच. त्यातून मग मी कटलरी साहित्य विकण्याचा व्यवसाय करायचे ठरवले. मी समताशक्ती संस्थेचे पन्नास हजार कर्ज घेतले. या पैशातून मी माझे कटलेरी दुकान स्वतःच्या घरी सुरू केले आहे.

माझे चालू कर्ज फेडून मी आता पुढचे पंच्याहत्तर हजार कर्ज घेऊन दुकानातील साहित्य वाढवले आहे. आता माझे दुकान चांगले सुरु आहे. यातून मिळणाऱ्या नफ्यातून मी व माझे कुटुंब तसेच मुलांच्या शिक्षणाच्या गरजा चांगल्या प्रकारे भागत आहेत.पतीच्या खांद्याला खांदा लावुन आज मी त्यांना व कुटुंबाला आर्थिक दृष्ट्या सक्षम करत आहे. हा कुटुंबाचा गाडा पुढे घेऊन जाण्यासाठी केलेले कष्ट व समताने दिलेली साथ खूप मोलाची होती. आता मला सावकाराच्या अव्वा ते सव्वा व्याजाचे कर्ज घेण्याची गरज पडत नाही. **समता संस्था माझ्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे याचा मला नेहमी अभिमान वाटतो.**



| | |
|---|---|
| नाव | अर्चना नवनाथ मस्के |
| गाव | बीड |
| वय | ३६ वर्ष |
| शिक्षण | १२ वी |
| व्यवसाय | वडापाव सेंटर व रसवंती गृह |
| बचत गट नाव | तुलसी समताशक्ती महिला बचत गट |

माझे नाव **अर्चना नवनाथ मस्के** असुन मी बीड मधील रहिवाशी आहे. गेल्या ५ वर्षापासून मी समता संस्थेसोबत जोडून आहे. आमचा तुलसी समताशक्ती महिला बचत गट नावाचा गट या संस्थेमध्ये जोडलेला असुन मी या गटाची सभासद आहे. समता संस्था हि दरवर्षी बचत गट महिलांसाठी विविध कार्यक्रम व मेळावे घेत असते. यात महिलांचा सहभाग प्रचंड असतो. मी सुद्धा यात सहभागी होत असते. या होणाऱ्या कार्यक्रमांची आतुरतेने वाट पाहत असे. या मेळाव्यात विविध गावच्या बचत गटातील महिला सहभागी होतात. यात बऱ्याच महिला समताचे कर्ज घेऊन छोटे मोठे व्यवसाय करत आहे. या मेळाव्यात आल्यावर या महिलाशी मोकळे पणाने बोलणे होत असे.

यातून मला पण काहीतरी छोटा मोठा व्यवसाय करायची उर्जा मिळत होती. पण माझे शिक्षण कमी असल्यामुळे मी एखादा व्यवसाय करू शकेल नाही याची मला शंका होती. समताच्या मेळाव्यात व्यवसाय प्रशिक्षण सुद्धा दिले जाते. व्यवसाय करायला शिक्षणाची अट नसते तर धाडस, कष्टाची व नवीन शिकण्याची इच्छा असावी लागते हे कळाले. सर्वप्रथम मी समताचे पाच हजार कर्ज काढले व पतीचे काही रक्कम घेऊन पिठाची गिरणी घेतली. या छोट्याश्या व्यवसायामधून मला बऱ्यापैकी उत्पन्न मिळू लागले. पण यातूनही आपल्याला थोडे पुढे जाता येईल का? असा मनात विचार आला! गिरणीच्या व्यवसायातून थोडे पैसे मागे पण पडले होते. जवळ असलेले काही पैसे व समताचे वीस हजार पुढचे कर्ज घेऊन मी बीडच्या खंडेश्वरी यात्रेत माझ्या कुटुंबासह वडा पाव, भजे सेंटर चालू केले. ही यात्रा सलग १० दिवस चालू असते. या यात्रेमधून मला बराच नफा मिळाला. खंडेश्वरी यात्रा ही वर्षातून एकदाच असल्याने नंतर काय करायचे हा मोठा प्रश्न माझ्यासमोर होता. पण यावर सुद्धा मी मात करत बीडमधील सावता माळी चौकात भाड्याने जागा घेऊन स्वतःचे ऋषिकेश वडा पाव, चहा, रसवंती गृह, हॉटेल सुरू केले.

मी स्वतः हे हॉटेल चालवते! हे सर्व मी समताच्या बचत गटात आल्यापासून टप्प्याटप्प्याने करू शकले. मी सुद्धा व्यवसायिक होऊ शकते हा आत्मविश्वास माझ्यात आला आहे. माझे शिक्षण फक्त ६ वी पर्यंत झाले असले तरी मी आज सर्व आर्थिक व्यवहार स्वतः करते. खऱ्या अर्थाने समताने मला आर्थिक साक्षर केले आहे. आज माझ्या यशाने माझे सर्वत्र कौतुक होताना पाहून डोळे भरून येतात.



| | |
|---|---|
| नाव | शेख शाहिन बशीर |
| गाव | सुर्डी, ता.जि. बीड |
| वय | ४२ वर्ष |
| शिक्षण | तिसरी |
| व्यवसाय | साडीसेंटर टेलरकाम ज्वेलरी दुकान |
| बचत गट नाव | तेजस्विनी समताशक्ती महिला बचत गट |

माझे नाव **शेख शाहिन बशीर** गाव सुर्डी ता.जि. बीड असुन मी २००९ पासून समता संस्थेची सभासद आहे. उद्योजक म्हटले की, छोट्या मोठ्या कर्जाची गरज लागत असते. माझ्या गटाचे नाव तेजस्विनी समताशक्ती महिला बचत गट असुन मी या गटाची अध्यक्ष म्हणून सर्व काम पाहते. मी समताकडून सुरुवातीला पाच हजार कर्ज घेतले होते. एवढ्याशा कर्जात काय होते असे लोकं म्हणायचे. पण ज्याला काही तरी करायची जिद्द असते तो काहीही करू शकतो. मिळालेल्या या कर्जात मी जवळचे २-३ हजार रुपये टाकून एक शिलाई मशीन घेतली. माझा पहिला व्यवसाय सुरू झाला. या शिलाई कामातून मला महिन्या काठी तीन हजार रुपये शिल्लक राहू लागले.

माझे पहिले कर्ज मी नियमित फेडले व पुढचे दहा हजाराचे दुसरे कर्जे घेतले. या कर्जाच्या मिळालेल्या पैश्यातून पुढे काय करायचे हे मी आधीच ठरवून ठेवले होते त्यानुसार मी एक शेळी घेतली या शेळीपासून मला सहा महिन्याला दाम दुप्पट उत्पन्न मिळू लागले. माझ्या व्यवसायाला माझ्या पतीचीही जोड मिळाली व माझे पतीसुद्धा टेलर काम करू लागले. माझं कुटुंब म्हणजे एक मुलगा व दोन मुली व आम्ही दोघे. कुटुंबाची आर्थिक घडी बसल्यामुळे मुलांचे शिक्षण व्यवस्थितपणे सुरु होते. दुसरे कर्ज नियमित भरल्यानंतर मला टप्प्याटप्प्याने पुढील कर्ज मिळत गेले. तीस हजाराच्या कर्जातून मला माझ्या मोठ्या मुलीचे लग्न चांगले करता आले. बघता बघता व्यवसायाची घडी नीट बसल्यामुळे व उपन्नाचे साधन पण वाढल्यामुळे मी साडी सेंटर व ज्वेलरी विक्रीचे दुकान चालू केले. या नवीन व्यवसायामुळे माझ्या उत्पन्नात अजून वाढ झाली. त्यामध्ये मला चांगला नफा राहू लागला. तीस हजाराचे कर्ज नियमित फेडल्यानंतर मला चाळीस हजाराचे कर्ज मिळाले. या कर्जातून मी आणखी माल खरेदी करून व्यवसाय थोडा मोठा केला.

आता माझ्या दुसऱ्या मुलीचे लग्नही मी चांगले केले आहे. माझे आता पन्नास हजाराचे कर्ज चालू आहे. माझ्या व्यवसायातून मी आता दोन पैसे मागे टाकत आहे. समताला जोडून राहिल्यामुळे मला कधी सावकारी कर्ज काढायची गरज पडली नाही. समताचे माझ्याकडे फक्त कर्जच नाही तर माझी बचतही माझ्या खात्यात बऱ्यापैकी जमा झाली आहे. समताच्या माध्यमातून मला यशाचा चांगला मार्ग गवसला आहे. माझ्या सारखाच माझ्या गावातील महिलांनी काहीतरी व्यवसाय करावा म्हणून माझ्या पुढाकारातून गावात अजून सहा ते सात नवीन बचत गट झाले आहेत. हे सर्व गट समताला आजही जोडून आहेत. बचत गटामुळे मी स्वावलंबी झाले. **समताची हि लाखमोलाची साथ मला व माझ्यासारख्या अनेक महिलांना साथ मिळत राहो हीच इच्छा.**



| | |
|---|---|
| नाव | शिवकन्या सतिश भोकरे |
| गाव | बहिरवाडी, बीड |
| वय | ४३ वर्ष |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | पापड, कुरडया, बटाटा पापड, वेफर्स |
| बचत गट नाव | निकिता समताशक्ती महिला बचत गट बहिरवाडी |

माझे नाव **शिवकन्या सतिश भोकरे** असुन माझे मूळ गाव मालेगाव आहे. या गावात आमची थोडीफार शेती आहे. पण शेतीच्या उत्पन्नातून माझ्या कुटुंबाच्या गरजा भागत नव्हत्या. बीड येथे माझे मामा राहत असल्यामुळे त्यांनी येथे तुम्हाला बऱ्यापैकी काम मिळेल असे सांगितले. त्यामुळे मी माझे पती व दोन मुले घेऊन बीडला आले. शहरातच बहिरवाडी येथे एक खोली किरायाने घेतली आहे. माझे पती किराणा दुकानांत कामाला लागले त्यातून येणाऱ्या उत्पन्नावर आमचे कुटुंब जेमतेम तग धरून होते. मी सुद्धा काहीं काळ शेत मजूर म्हणून काम केले आहे. घरी राहून कुरडया, पापडाचे काम करत असताना एक दिवस शेजारच्या काकूनी मला माझे काम बघून मला सुद्धा कुरडया बनून देशील का? असे विचारले होते. मी त्यांना हो म्हणून करून देते असे सांगितले व त्यांना जे हवे ते करून दिले. यातूनच मग मी अश्या बऱ्याच जणींना हि कामे करून दिली. न कळतच माझा हा व्यवसाय सुरु झाला. हळूहळू मी विविध प्रकारचे पापड, कुरडया किलोप्रमाणे दर ठरवून विकायला लागले. यातील नाचणीच्या पापडांची मागणी जास्त यायला लागली. बीडमध्ये हॉटेल, खानावळ व जेवणाचे ढाबे यांचे प्रमाण भरपूर असल्यामुळे नाचणीचे पापड यांची मागणी जास्त होती. व्यवसायाला मिळणारा प्रतिसाद भरपूर होता पण हातात भांडवल नव्हते. व्यवसायाला लागणारे भांडवल कसे उभे करावे हे काही सुचत नव्हते.

या व्यवसायामुळे माझ्या आजूबाजूच्या परिसरात चांगल्या ओळखी झाल्या होत्या. माझ्या एका मैत्रीणींच्या घरी बचत गट स्थापन होणार होता त्यांनी मला तुम्ही गटात या असे विचारले! मी सुद्धा लगेचच या गटात सभासद झाले. आमचा गट समता संस्थेशी जोडला गेला. गटाची नियमित होणारी बैठक व या बैठकीतून आरोग्य, शिक्षण, व्यवसाय, आर्थिक साक्षरता या गोष्टीवर होणाऱ्या चर्चा यातून बरेच काही शिकायला मिळत होते. समताचे होणारे विविध कार्यक्रम, मेळावे यांना मी आवर्जून उपस्थित राहू लागले. कर्ज हि तात्पुरती सोय असुन यातून आपण काही तरी उद्योग करावा जेणेकरून घेतलेल्या कर्जाची नियमित कर्ज परतफेड करणे सोपे जाईल. महिलांनी फक्त कर्ज काढून कर्जबाजारी न होता आपली बचत सुद्धा केली पाहिजे. या गोष्टी मी समतामध्ये आल्यावर शिकले. मी पहिले पाच हजार ते घेतले हे कर्ज मी नियमित फेड करून टप्प्याटप्प्याने पन्नास हजाराचे कर्ज घेतले आहे. मी हे सर्व कर्ज माझ्या व्यवसायात वापरले आहे. आता मला भांडवलाची चिंता राहिली नाही कारण समता माझ्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. मी तयार केलेले पापड आज नागपूर, मुंबई, पुणे, नगर, अश्या अनेक शहरात जात आहेत. माझ्या या व्यवसायात माझे पती, मुलगी, मुलगा हे सुद्धा मला मदत करत आहेत. **माझ्या या कामाची दखल घेऊन समताने मला माझा पहिला 'समता महिला उद्योजक' पुरस्काराने गौरव केला आहे.** याचा मला खुप अभिमान वाटतो.




| | |
|---|---|
| नाव | शितल विनोद रामदासी |
| गाव | गया नगर, बीड |
| वय | ३४ वर्ष |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | किराणा, ज्वेलरी, स्टेशनरी, लेडीज वेअर, मेस |
| बचत गट नाव | निरंकारी समताशक्ती महिला बचत गट |

मी **शितल विनोद रामदासी,** राहणार गया नगर, बीड येथील रहिवाशी असुन मी मागील दोन–अडीच वर्षापासून समता संस्थेच्या महिला बचत गटात आहे. माझ्या पतीच्या उत्पन्नात कुटुंब चालणे अवघड असल्यामुळे कमी वयातच घराची जबाबदारी माझ्या वर पण आली. पतीच्या उत्पन्नातून दोन पैसे मागे टाकणे पण अवघड होत होते. यातून काहीतरी मार्ग काढणे आवश्यक होते तो मार्ग म्हणजे बचत गटाचा! माझ्या जश्या अडचणी होत्या तश्याच अडचणी माझ्या आसपासच्या महिलांच्या सुद्धा होत्या. अश्या आम्ही ५ जणींचा मिळून एक नवीन बचत गट तयार केला व समता संस्थेला जोडून घेतला. पहिले दहा हजाराचे कर्ज घेऊन घरघुती मेस चालवण्यासाठीचे साहित्य खरेदी करून कामाला सुरुवात केली. मी केलेल्या स्वयंपाकाची चव माझ्या शेजरी राहणाऱ्या काकूना आवडली. तू आमच्या घरचा सुद्धा स्वयंपाक कर असे त्यांनी मला सांगितले तेव्हा मी पण करायला लागले. अजुन काही ३–४ महिलांच्या घरचे पण त्यांनी मला काम मिळवून दिले. घरघुती मेस, डब्बे देणे व स्वयंपाक कामे असे माझे व्यस्त दिवसभराचे काम सुरु झाले. या कामातून मला चांगला नफा राहू लागला. यातूनच मग मी घरगुती ज्वेलरी आणि लेडीज वेअरचे साहित्य विकायला सुरुवात केली.

या कामातून सुद्धा मला चांगले पैसे मिळत होते व यातून माझ्या कुटुंबाच्या गरजा चांगल्या भागात होत्या. जसजसे काम वाढत होते तसतसे कामाचा पण ताण वाढत होता. आता मला या कामात माझ्या पतीचीही चांगली मदत होत आहे. मी बचत गटाचे पहिले कर्ज नियमित भरून पुढचे वीस हजाराचे कर्ज घेऊन याच व्यवसायात गुंतवले आहे. समताच्या बचत गटाच्या नियमित होणाऱ्या बैठका, कार्यक्रम, महिला मेळावे यात मी सहभागी होऊ लागले. व्यवसायाला आवश्यक असणाऱ्या बाबींचे चांगले ज्ञान मिळू लागले. कष्ट, वेळेची शिस्त याचे महत्व कळायला लागले. बचत गटात आल्यावर मला कर्ज व बचतीचे महत्व काय? हे समताने आम्हाला शिकवले. फक्त एक कर्ज देणारी संस्था व वाट्टेल तशी वसुली करणारी संस्था नसून सामाजिक भावनेतून सहकाराच्या दिशेने घेऊन जाणारी लोक चळवळ म्हणून कार्य करते. आज समता माझ्या पाठीशी कणखर उभी असल्यामुळे मी हे सर्व धाडस करू शकले व स्वतःच्या पायावर कष्टाने उभी राहू शकले. आता माझा व्यवसाय भरभराटीला आला असुन मी महिन्याला दोन ते तीन लाखाची उलाढाल करत आहे. बचतीचे महत्व कळल्यानंतर मी आता समतामध्ये माझे दरमहा आर.डी. चे खाते उघडले आहे व या खात्यामध्ये मी नियमित पैसे जमा करत आहे. सुरू केलेल्या व्यवसायातून थोडी आर्थिक स्थिरता आल्यानंतर मी आता माझे स्वतःचे दुकान टाकले आहे. या दुकानात किराणा साहित्य, आईस्क्रीम, जनरल स्टोअर्स अश्या विविध दैनंदिन लागणाऱ्या वस्तू विकत आहे. मी आता बचत गटातील तीस हजाराचे कर्ज घेऊन याच व्यवसायात गुंतवले आहे.



| | |
|---|---|
| नाव | क्षीरसागर संगीता राजेश |
| गाव | गयानगर, बीड |
| वय | ५६ वर्ष |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | किराणा दुकान |
| बचत गट नाव | श्रीगणेश समता शक्ती महिला बचत गट |

**क्षीरसागर संगीता राजेश** ह्या मुळच्या राहाणार विदर्भातील डोंबरी या गावच्या. गाव खूप छोटं असल्यामुळे हाताला काही काम मिळत नव्हते. पोट भरण्यासाठी त्या बीडमध्ये येऊन स्थायिक झाल्या. बीडमध्ये रहायला आल्यावर त्यांच्या पतीला पाटोदा येथे खाजगी नोकरी लागली पण पगार फक्त साडेतीनशे रुपये होता पण नंतर बीडमध्येच सरकारी दवाखान्यांमध्ये त्यांना काम मिळालं. येथे सुद्धा पगार फक्त साडे तेराशे रुपये होता व कालांतराने तो वाढत गेला. तरीही पतीच्या पगारामध्ये कुटुंबाचा गाडा चालणे अवघडच होत होते. त्यात दोन मुलांचे शिक्षण होतेच! जसजसे मुलं मोठी होत गेली तसतसे खर्चाचे आकडे पण वाढत होते. यातून काहीतरी मार्ग नक्कीच निघेल या आशेवर आला दिवस ढकलण्याचे काम चालू होते. या काळात आजारपण व इतर खर्चाने फारच तारांबळ झाली. रहायला स्वतःचं घरही नव्हतं! सरकारी क्वार्टरमध्ये राहत असल्यामुळे तेवढाच काय तो आधार होता. अश्या परिस्थितीत माझ्या पतीला व कुटुंबाला आपली काहीतरी आर्थिक मदत व्हावी असे सारखे वाटत होते. यातूनच मग त्या २००८ मध्ये समता संस्थेच्या बचत गटांमध्ये दाखल झाले.

अगदी सुरुवातीचे त्यांनी पहिले कर्ज पाच हजाराचे घेतले. या छोट्याश्या कर्जात कोणता व्यवसाय करता येईल हे अगोदरच त्यांनी ठरवून ठेवल्यामुळे आहे त्याच घरात एक छोटेखाणी दुकान थाटले. या छोट्याश्या दुकानांत त्यांनी लहान मुलांना लागणारे कुरकुरे, मुरकुल, वेफर्स, चॉकलेट हे ठेवायला सुरुवात केली. यातून येणाऱ्या उत्पन्नातून त्यांनी त्यांचे पहिले कर्ज नियमित फेडून पुढचे दहा हजाराचे कर्ज घेऊन दुकानातील माल वाढवला. दुकानातील माल वाढवल्यामुळे त्यांना आता दिवसाकाठी शंभर ते दोनशे रुपये मिळत होते. पुन्हा त्यांनी समता संस्थेकडून तीस हजाराचे कर्ज घेतलं आणि त्याच व्यवसायामध्ये गुंतवले. थेंबे थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे त्यांनी स्वतःला व कुटुंबाला आता सक्षम केले आहे. त्यांचा मुलगा चांगला शिकुन आता नोकरीला लागला आहे. त्याचबरोबर त्यांनी स्वत:चे घर सुद्धा घेतले आहे. आजही त्यांचे दुकान आहे त्याच ठिकाणी चांगले सुरू आहे. आता त्यांनी नवीन घरात सुद्धा असेच छोटेखानी दुकान सुरू केले असुन त्यांना यातून चांगले उत्पन्न मिळत आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी कष्टाचा मार्ग निवडला व त्यावर जिद्दीने चालत यशस्वी करून दाखवला याचा त्यांना नेहमीच अभिमान वाटतो. समताने वेळोवेळी त्यांना साथ दिल्यामुळे त्या आज एक यशस्वी उद्योजक म्हणून पुढे आल्या आहेत. समताच्या आर्थिक सहकार्यातून त्यांची वाटचाल सोपी होत गेली. त्यांच्याकडे आज फक्त समताचे कर्जच नाही तर समतामध्ये चाळीस हजारापेक्षा जास्त बचत पण त्यांच्या नावावर जमा आहे. **समताने त्यांच्या यशस्वी वाटचालीची दखल घेऊन त्यांना २०१८ चा 'महिला उद्योजक' पुरस्कार व गटाचा 'प्रेमाताई उत्कृष्ट बचत गट' पुरस्काराने गौरव केला आहे.**



| | |
|---|---|
| नाव | जाधव अनिता महादेव |
| गाव | जाधववाडी, ता.जि. बीड |
| वय | ३४ वर्ष |
| शिक्षण | ९ वी |
| व्यवसाय | भाजीपाला/मशीन काम |
| बचत गट नाव | प्रगती समताशक्ती महिला बचत गट |

**अनिता महादेव जाधव** या बीड तालुक्यातील जाधववाडी गावच्या रहिवाशी. जाधववाडी हे गाव म्हणजे डोंगरात असलेले छोटसं गाव. साहजिकच छोटं गाव असल्यामुळे अन् तेही डोंगर पट्टायातील त्यामुळे नेहमी सर्व सोयी सुविधापासून वंचित आहे. ना धड रस्ता ना कश्याची सुविधा! संपर्कासाठी महत्वाचे असणाऱ्या मोबाईलाही रेंज नाही. शेतात राबून जे काही पिकल हेच उत्पन्नाचे साधन. शेतात पिकलेला भाजीपाला शहरात दारोदारी जाऊन विकावा लागत असे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना भरपूर फायदा होतो हे फक्त ऐकून होते. माझी पण फार इच्छा होती कि, आपण सुद्धा एखाद्या बचत गटात असावे. आमचे गाव फार लहान असल्यामुळे व येण्याजाण्यासाठी चांगला रस्ता नसल्यामुळे आमच्या गावाकडे बँकांचे व संस्थांचे नेहमीसारखे दुर्लक्ष राहिले.

एक दिवस मी बीड शहरात भाजीपाला विकण्यासाठी आले असता एका गल्लीमध्ये मला समता प्रतिष्ठानची पाटी दिसली ती पाटी बघून मी त्या कार्यालयात जाऊन बचत गटाची चौकशी केली तेव्हा मला तेथील कर्मचाऱ्यांनी बचत गटाविषयी चांगली माहिती सांगितली. त्यांनी सांगितलेली माहिती ऐकून आम्हाला सुद्धा आमच्या गावात बचत करायचा आहे असे सांगितले. ठरलेल्या तारखेला समताचे कार्यकर्ते आमच्या गावात आले व त्यांनी सर्व महिलांची एकत्रित बैठक घेऊन समता बद्दल व गटाबद्दल सविस्तर माहिती दिली. या बैठकीमुळे आमच्या गावात तीन बचत गट तयार झाले. मी समताचे कर्ज घेऊन शिलाई मशीन घेतली यातून शिवणकाम करायला लागले. यातून मिळणाऱ्या पैश्यातून कुटुंबाच्या खर्चाला हातभार लागला. माझे पती खाजगी वाहनावर ड्रायव्हर म्हणून काम करतात पण कधी काम असते तर कधी नाही. त्यामुळे घरात येणारे उत्पन्न पण अनियमित असायचे. जेव्हा काम नसेल तेव्हा शेतीमध्ये काम करावे लागत. अश्या परीस्थित माझ्या कामातून कुटुंबाला थोडा हातभार लागत होता. समता संस्थेच्या गटात आल्यापासून मी आतापर्यंत पाच हजार ते पन्नास हजार पर्यंतच्या कर्जाचा टप्पा गाठला आहे. या कर्जातून कधी गाय, तर कधी शेतीसाठी आवश्यक बी-बियाणे, खत घेण्यासाठी वापरत राहिले. शहरात जाऊन भाजीपाला विकून राहिलेल्या वेळात शिवणकाम करते. कधी कधी तर भाजीपाला नसल्यामुळे शेतातले कामे करून मी हे मशीनकाम करत असे. मला मिळालेल्या कर्जातून मी माझ्या मुलाचे शिक्षण सुद्धा चांगल्याप्रकारे करू शकले. माझा मुलगा आता शहरात राहून पोलीस भरतीचे शिक्षण घेत आहे. सावकाराच्या कर्जाची कधी गरजच पडली नाही कारण समता पाठीशी खंबीरपणे उभी होती. आता माझ्या मुलीचेही लग्न मी झालं आहे. समता संस्थेनंतर आमच्या गावात वेगवेगळ्या संस्था आल्या आणि बंद ही पडल्या त्यात कित्येक लोकांचे पैसेहि बुडाले पण समताचे पारदर्शक काम आजही नियमित सुरू आहे. आता आमचा समतावर पुर्ण विश्वास बसला असुन समताच्या विविध कार्यक्रम व मेळाव्यात आम्ही आवर्जून सहभागी होतो.



| | |
|---|---|
| नाव | शैला सुहासराव देशमुख |
| गाव | चक्रधर नगर, बीड |
| वय | ३४ वर्ष |
| शिक्षण | बी. कॉम. |
| व्यवसाय | ज्वेलरी, स्टेशनरी |
| बचत गट नाव | भाग्यलक्ष्मी समताशक्ती महिला बचत गट |

माझ्या कुटुंबात मी, माझे पती, सासू, सासरे व दोन मुले असे कुटुंब आहे. माझे पती हे खाजगी नोकरी करतात. आमच्या कुटुंबाचा सर्व भार माझ्या पतीवर असल्यामुळे कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागण्यापुरते उत्पन्न घरात येत होते. भविष्याचा विचार करता येणारा काळ अजूनच संघर्षात्मक राहणार होता कारण मुलांचे शिक्षण, सासू सासऱ्यांचे आजारपण! आपलाही आपल्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा असे सारखे वाटत होते. मला सुद्धा माझ्या स्वतःच्या पायावर उभं रहायची फार इच्छा होती. दिवसभर घरच्या कामातून वेळ मिळत तर नव्हताच पण मन सुद्धा स्वस्थ बसू देत नव्हते. जिद्द होती काहीतरी करायची! घरातील सर्व कामे आवरून दोन-तीन तास वेळ शिल्लक राहतच होता. या एवढ्याश्या वेळेत बाहेर जाऊन काम मिळणे अशक्यच होते. आपण एखादा घरगुती व्यवसाय करू शकतो असे मला वाटताच मी माझ्या कुटुंबासोबत याबाबत बोलले असता त्यांनी सुद्धा मला यासाठी प्रोत्साहन दिले. माझी एक बहिण मुंबईला राहत होती मी माझ्या बहिणीशी बोलून मुंबई वरून ज्वेलरी साहित्य होलसेल दरात मागवले व घरूनच त्याची विक्री सुरु केली. यातून थोडा फार नफा मागे पडत होता पण माल खरेदी करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती पण भांडवल अपुरे पडत होते. माझी मैत्रीण शितल रामदासी ही समता संस्थेच्या बचत गटात असल्यामुळे त्यांनी मला गटाबद्दल माहिती सांगितली. मलाही भांडवलाची गरज असल्यामुळे मी सुद्धा एक भाग्यलक्ष्मी नावाचा नवीन बचत गट तयार केला.

मी गटाचे पहिले दहा हजाराचे कर्ज घेतले. माझे स्वताः कडील काही पैसे व घेतलेले कर्ज यातून मी मला हवे असलेले आणखीन साहित्य खरेदी केले त्यात ज्वेलरी, लेडीज वेअर आणि मोत्याचे विणकाम असे सहित्य होते. आणलेल्या साहित्याचे फोटो काढून मी माझ्या व्हाटसअप स्टेटसवर ठेऊ लागले यातून माझे चांगले मार्केटिंग होऊ लागले. यामुळे महिला मला ऑनलाईन ऑर्डर देऊ लागल्या. माझा व्यवसाय वाढवण्यास मला चांगली मदत झाली. महिला आता माझ्या घरी येऊन खरेदी करू लागल्या आहेत व बघता बघता माझ्या आजूबाजूच्या परिसरातील महिलांचा सुद्धा मला चांगला प्रतिसाद मिळू लागला. यात प्रामुख्याने गटातील महिला, नातेवाईक, हितचिंतक महिलांचा प्रतिसाद जास्त होता. पुढे जाऊन मी परत वीस हजार रुपयाचे कर्ज याच व्यवसायात गुंतवले. हळू हळू मला लग्नाच्या ऑर्डर पण भेटू लागल्या. गटाची नियमित बैठक व नियमित कर्जफेड यामुळे आमचा गट शिस्तीत सुरु आहे. समताच्या शिस्तीमुळे आम्ही सुद्धा नियमित बैठकीला जाऊन

बचत व कर्ज हफ्ता नियमित भरू लागलो. सर्व काही सुरळीत चालू असताना अचानक पतीला अर्धांगवायूचा झटका आला अन माझ्या पायाखालची जमीनच सरकली! काय करावं हे सुचत नव्हतं! त्यांना तातडीने संभाजीनगर येथील दवाखान्यात नेण्यात आले तिथं गेल्यावर त्यांचे बायपास ऑपरेशन करण्याचे सांगण्यात आले. पण ऑपरेशनसाठी लागणारा एवढा पैसा माझ्याकडे नव्हता. मी तातडीने समताच्या ताईंना फोन करून सर्व घटना सांगितली त्यांनी मला थोडा धीर दिला व लगेचच पुढचे तीस हजार व अंतर्गत गटाचे साठ हजार असे एकूण नव्वद हजार रुपयांचे कर्ज मंजूर करून दिले. माझ्या पतीचे ऑपरेशन व्यवस्थित झाले असुन ते बरे झाले आहेत. मी आता पुन्हा माझ्या व्यवसायावर लक्ष केंद्रित केले आहे व कर्जाची नियमित परतफेड करत आहे. आयुष्याच्या कठीण काळात चांगला मार्ग निघतच असतो तो मार्ग माझ्या आयुष्यात समताच्या रूपाने आला. समताच्या विविध कार्यक्रम व मेळाव्यातून आम्हाला नेहमीच सकारात्मक काम करण्याची उर्जा मिळत असते. समताच्या खंबीर आधारामुळे आमचा बचत गट सुरळीत चालत आहे.




**५ वी महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषद, बीड**

परिषदेच्या अध्यक्षा मेधाताई सामंत, अन्नपूर्णा परिवार–पुणे

यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले.



| | |
|---|---|
| नाव | **भोगे सुरेखा भिमोद** |
| गाव | ढेकणमोह, ता.जि. बीड |
| वय | ३४ वर्ष |
| शिक्षण | ११ वी |
| व्यवसाय | शिवणकाम, पिठाची गिरणी, भांड्याचे दुकान |
| बचत गट नाव | अवंती समता महिला बचत गट |

**भोगे सुरेखा भिमोद** माहेर म्हणजे केज तालुक्यातील विडा हे गाव. आत्याच्या मुलाशी लग्न करून त्या बीडच्या ढेकणमोहा या गावाच्या रहिवाशी झाल्या. बारावीत असतानाच लग्न झाल्यामुळे शिक्षण अर्धवटच राहिले. त्या स्वतः शेतात काम करायच्या व त्यांचे पती बीडमध्ये एका भांड्याच्या दुकानावर कामाला जात होते. शेतीमधले अनियमित उत्पन्न व नवऱ्याचा मिळणारा पंधराशे रुपये पगार यावरच घर चालायचं. ताई एक दिवस शेतात जात असताना जवळच्याच गल्लीत सावित्रीबाई फुले जयंतीचा कार्यक्रम साजरा करताना काही महिला त्यांना दिसल्या. कश्याचा कार्यक्रम आहे असे त्यांनी महिलांना विचारलं असता महिलांनी त्यांना समताच्या बचत गट महिलांचा कार्यक्रम असल्याचे सांगितले. हा कार्यक्रम बघून त्यांनाही गटात येण्याची इच्छा झाली व त्यांनी लागलीच एक नवीन बचत गट तयार करायचा निर्णय घेतला व आपल्या गल्लीतीलच दहा महिलांचा अवंती नावाचा समताचा महिला बचत गट तयार केला. बचत गटाच्या नियमित सहा महिने बैठका झाल्यानंतर समतातर्फे महिलांना कर्ज वाटप होऊ लागले. त्यांनी पहिले पाच हजार रुपये कर्ज घेतले व त्यातून एक शेळी घेतली.

पहिले कर्ज नियमित फेडून मी दुसरे दहा हजाराचे कर्ज घेतले. या कर्जातून शिवणकाम करायचे प्रशिक्षण घेऊन स्वतःची शिलाई मशीन घेतली. शिवनकामामुळे माझ्याकडे महिला कामे घेऊन येऊ लागल्या. यातून मिळणाऱ्या पैश्यातून मी कर्जाचे नियमित हफ्ते फेडू लागले. दिवसेंदिवस महिलांची संख्या वाढत गेली त्यातून मग सुरेखा ताईनी दहा हजाराचे कर्ज फेडून वीस हजारांचे कर्ज घेऊन एक पिठाची गिरणी घेतली. एकीकडे गिरणी मधून येणारे उत्पन्न व दुसरीकडे शिवनकामातून येणारे उत्पन्न यामुळे आर्थिक परिस्थिती बदलत गेली. पती बरीच वर्षे भांड्याच्या दुकानावर काम करत असल्यामुळे त्यांना या व्यवसायाची बरीच माहिती झाली होती. त्यामुळे दुसऱ्याच्या दुकानावर काम करण्यापेक्षा आपण आपले स्वतःचे दुकान टाकलेले बरे राहील असे त्यांनी ठरवले. पुढचे तीस हजाराचे कर्ज व स्वतःकडील काही भांडवल घेऊन आपल्याच जागेत छोटे भांड्याचे दुकान टाकले. दुकान नवीन असल्यामुळे म्हणावे तसे चालत नसल्यामुळे त्यांचे पती पुन्हा आधीच्याच दुकानावर कामाला जाऊ लागले व दुकान ताई स्वतः सांभाळू लागल्या. घरात सासूबाई असल्यामुळे त्यांचीही या कामात त्यांना मदत होऊ लागली. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक घडी आता बसत आहे. पन्नास हजाराचे कर्ज घेऊन त्यांनी आपल्याच व्यवसायात गुंतवून व्यवसाय वाढवला आहे. त्याचबरोबर त्यांचे मुलंही चांगले शिक्षण घेत आहेत. ताईचे शिक्षण अर्धवटच राहिले याची त्यांना आता खंत वाटत नाही कारण एक चांगली उद्योजिका बनले याचे त्यांना समाधान आहे.



| | |
|---|---|
| नाव | फटाले शिवकन्या बाबासाहेब |
| गाव | बहिरवाडी. |
| वय | ३२ वर्ष |
| शिक्षण | ७ वी |
| व्यवसाय | मेस व खानावळ |
| बचत गट नाव | सावता समता महिला बचत गट |

**शिवकन्या बाबासाहेब फटाले** या आता बहिरवाडी येथे राहत असून त्यांचे मूळ गाव रामपुरी आहे. शिवकन्या ताईच्या कुटुंबात त्या त्यांचे पती, दोन मुलं व सासू असे कुटुंब आहे. शिवकन्याताई अकरा वर्षांपूर्वी सावता समता बचत गटामध्ये दाखल झाल्या. त्यांचे पती मोंढ्यात एका दुकानात ड्रायव्हर म्हणून काम करायचे. पतीच्या पगारावरच घर चालायचे. पगार कमी असल्यामुळे घर कसेबसे चालत होते. आपणही काही तरी काम करावे असे त्यांना सारखे वाटत होते. पण घरात सासू व मुलांकडे लक्ष द्यायला कुणी नसल्यामुळे काही करताही येत नव्हते. त्यांना शिवनकाम येत असल्यामुळे घरात बसूनच त्या शिवणकाम करू लागल्या. या कामातून त्यांच्याकडे महिलांची ये जा वाढत गेली याचा विचार करून त्यांनी दहा हजाराचे कर्ज घेऊन स्वतःच्याच घरात साड्यांचा छोटा व्यवसाय सुरु केला. चालू केलेला व्यवसाय हवा तसा चालत नसल्यामुळे त्यांनी घरगुती मेस सुरु केली. सुरुवातीला त्यांच्याकडे शाळेच्या मुलांचे तीन डबे सुरु झाले व नंतर यांची संख्या वाढून पंधरा डब्यापर्यंत गेली. एकीकडे मेस व दुसरीकडे साड्यांचा व्यवसाय या दोन्हीतून चांगले उत्पन्न मिळू लागले. मुलांच्या शिक्षणाच्या खर्चाचे ओझे थोडे हलके झाले.

पुढे त्यांनी टप्प्याटप्प्याने पन्नास हजारापर्यंत कर्ज घेत गेल्या व यात थोडे स्वतः कडील भांडवल टाकून त्यांनी स्वतःचे हॉटेल टाकले. हॉटेलमध्ये घरगुती पद्धतीचे व चांगले जेवण त्या देऊ लागल्या यात त्यांचे पती व त्यांच्या सासू त्यांना मदत करतात. हॉटेलच्या व्यवसायात त्या आता चांगल्या स्थिर झाल्या आहेत. सुरुवातीपासून काहीतरी करण्याची त्यांची जिद्द असल्यामुळे त्या आज एक यशस्वी महिला उद्योजक म्हणून नावारूपाला आल्या आहेत. समताकडून घेतलेल्या कर्जांचा वापर त्या योग्य ठिकाणी करत गेल्या. त्यातून कर्जाची नियमित परतफेड करणे त्यांना सोपे गेले. बचत गटात आल्यामुळे गटाची शिस्त लागली त्यामुळे नियमित बचत केल्यामुळे त्यांच्या नावावर आज चांगली बचत जमा झाली आहे. त्यांनी आता संस्थेमध्ये आरडीचे सुद्धा खाते उघडले असुन त्यात नियमित पैसे भरत आहेत. समताच्या आर्थिक मदतीमुळे त्या आज स्वावलंबी झाल्या आहेत. त्यांच्या या यशस्वी वाटचालीसाठी समता नेहमीच त्यांच्या सोबत होती व पुढे देखिल राहील.



| | |
|---|---|
| नाव | मंगल बाबासाहेब मस्के |
| गाव | रा. पालवण, ता.जि. बीड |
| वय | ३९ वर्ष |
| शिक्षण | ८ वी |
| व्यवसाय | कांडप यंत्र व पिठाची गिरणी |
| बचत गट नाव | रेणुका महिला बचत गट, पालवण |

**मंगल बाबासाहेब मस्के** या पालवण गावच्या रहिवाशी असुन त्यांच्या कुटुंबात पती, दोन मुली, एक मुलगा व सासू असे कुटुंब आहे. मंगलताई यांचे कुटुंब म्हणजे सर्वसाधारण अल्पभूधारक शेतकरी. बीडमधील शेती ही प्रामुख्याने पावसावर अवलंबून असलेली आहे. त्यामुळे सर्व कुटुंबाच्या आर्थिक गरजा अश्या शेतीवर भागवणे कठीणच! मग हातात आलेल्या उत्पन्नातून कितीही काटकसर केली तरी खाली काहीच शिल्लक राहत नसे. यातून कधी एकदाची सुटका होईल असे त्यांना नेहमी वाटत रहायचे.

आपल्यात काहीतरी करायची जिद्द असेल तर आपण काहीपण करू शकतो. चूल व मुल या इतकेच आपले आयुष्य मर्यादित न राहता याच्या पलीकडे जाऊन काहीतरी करावं लागेल असे त्यांना वाटू लागले. त्यातून मार्ग काढत त्यांनी व त्यांच्या पतीने मिळून एखादा छोटासा का होईना एखादा घरगुती व्यवसाय करायचं ठरवले. मंगलताई रेणुका समता महिला बचत गटात असल्यामुळे त्यांनी गटातून पहिले पाच हजाराचे कर्ज घेऊन शिलाई मशीन घेतली. यातून त्या हळूहळू शिवनकाम करायला लागल्या. शिलाई मशीनच्या कामातून थोडे फार पैसे मिळत होते. या पैश्यातून कर्जाचा हफ्ता नियमित फेडत होत्या. पहिल्या कर्जाची नियमित परतफेड करून त्यांनी दहा हजार रुपयांचे कर्ज घेऊन कपडे विकण्याचा छोटासा व्यवसाय सुरु केला.

पुढे जाऊन मंगलताईनी ग्रामीण स्वयंम रोजगाराचे मसाला पापड, लोणचे, चटण्या, शेवया करायचे प्रशिक्षण घेतले. यासोबतच त्यांनी तयार केलेल्या मालाचे मार्केटिंग कसे करावे याचेही प्रशिक्षण घेतले. आधीच्या कर्जाची नियमित परतफेड करून त्यांनी पंधरा, वीस व तीस हजाराचे कर्ज घेऊन यात स्वतःचे भांडवल टाकून चटणी कांडण मशिन, शेवया मशीन व पिठाची गिरणी घेतली. आज त्यांचा गुरुकृपा गृहउद्योग या नावाने व्यवसाय सुरु असुन या व्यवसायातून त्या दररोज पाचशे ते एक हजार रुपये रोज कमवत आहेत. या व्यवसायात त्यांना त्यांच्या कुटुंबाची पण तेवढीच साथ मिळत आहे. या व्यवसायामुळे त्यांचे मुलं सुद्धा चांगले व उच्च शिक्षण घेत आहेत. मंगलताई आज एक यशस्वी उद्योजक म्हणून पुढे आल्या आहेत. त्यांच्या या प्रवासात त्यांना समताने वेळोवेळी दिलेले अर्थसाहय्य त्यांच्या व्यवसायाला पुढे घेऊन जाण्यास महत्वाचे ठरले आहे.



| | |
|---|---|
| नाव | नागरगोजे उषा दिनकर |
| गाव | वडगाव-गुंधा ता.जि. बीड |
| वय | ३८ वर्ष |
| शिक्षण | दहावी |
| व्यवसाय | साडी सेंटर व मुलांचे कपडे |
| बचत गट नाव | संतोषीमाता समता महिला बचत गट |

**उषाताई** या बीड तालुक्यातील वडगाव गावच्या रहिवाशी. त्या २०११ पासून संतोषीमाता समता महिला बचत गटातून समताच्या सभासद झाल्या. शेतातले कामे करून मिळेल त्या वेळेत त्या छोटे मोठे शिवनकाम करायच्या. शिलाई मशीनच्या कामाला त्यांनी समताच्या गटाचे कर्ज घेऊन पिको फॉलची मशीन घेऊन जोड दिली. या जोडधंद्यामुळे उत्पन्नातही वाढ होत गेली. हा व्यवसाय त्या काही वर्ष करत राहिल्या व यादरम्यान त्या समताचे कर्ज घेऊन त्याची नियमित परतफेड करत होत्या. या व्यवसायात त्यांचा चांगला जम बसल्यावर त्यांनी समताचे चाळीस हजार कर्ज घेऊन गावातच साडीचे दुकान टाकले. जसजसा व्यवसाय वाढू लागला तसतसा या दुकानात त्यांनी माल वाढवत नेऊन आता त्या लहान मुलांचे कपडेही विकू लागल्या आहेत.

शिवनकामातून झालेल्या ओळखीमुळे व कमी किमतीत माल विकत असल्यामुळे गावात आणखीन दोन-तीन कपड्यांचे दुकान असताना सुद्धा त्यांचा व्यवसाय चांगला चालतो आहे. येणाऱ्या विविध सणाप्रमाणे त्या आपल्या दुकानात माल भरतात व विकतात. या व्यवसायामुळे त्यांना व त्यांच्या कुटुंबाला चांगले आर्थिक बळ मिळाले असुन त्यांची मुले आता उच्च शिक्षण घेत आहेत. उषाताई आता जेव्हा गरज असते तेव्हा कर्ज घेऊन याच व्यवसायात त्यांचा वापर करतात. बचत गटाच्या माध्यमातून त्यांचा सुरु झालेला यशस्वी महिला उद्योजक बनण्याचा प्रवास आज बऱ्यापैकी पुर्ण होताना दिसत आहे. समताचे विविध कार्यक्रम, मेळावे यात त्यांचा सहभाग व यातून त्यांना व्यवसायाचे मिळालेले मार्गदर्शन व आर्थिक साक्षरतेचे धडे व्यवसाय वाढीसाठी महत्वाचे ठरले.

समताच्या नियमित होणाऱ्या बचत गट बैठका, गटात होणाऱ्या चर्चा व विचारांची, कल्पनांची होणारी देवाणघेवाण यातून त्यांचा उद्योग जगतेचा पाया मजबूत झाला. आजही त्यांचा संतोषीमाता समता महिला बचत गटाची नियमित बैठक होत असुन गटातील इतर महिला सुद्धा शेतीपूरक व्यवसाय करत आहेत. उषाताईनी आता पन्नास हजाराचे कर्ज घेऊन याच व्यवसायात गुंतवून व्यवसाय वाढवला आहे.



| | |
|---|---|
| नाव | बचूटे सुहाशिनी राम |
| गाव | प्रकाश आंबेडकर नगर, बीड |
| वय | ४७ वर्ष |
| शिक्षण | ७ वी |
| व्यवसाय | चप्पल चे दुकान |
| बचत गट नाव | लकी समता महिला बचत गट |

मी **बचूटे सुहासिनी राम** रा. प्रकाश आंबेडकर नगर, इमामपूर रोड बीड. मी गेल्या ५ वर्षा पासून समताच्या गटामध्ये आहे. माझे पती लोकांच्या दुकानात काम करतात अन मी लहान मुलांचे कपडे एका पिशवीत घेऊन दारोदारी फिरून विकायचे व लोकांचे धुनी भांडी पण करायचे. गरज पडली तर दवाखान्यात जाऊन फारशी पुसण्याची काम देखील मी केले आहे. जगण्याचा हा लढा सुरु असताना मला एका ओळखीच्या ताईने समता महिला बचत गटाबद्दल माहिती सांगितली. मी समताच्या ऑफिस ला जाऊन चौकशी केली आणि लकी समता महिला नावाचा गट बनवला. मला पहिले पाच हजाराचे कर्ज मिळाले त्या पैश्यातून घरातील किराणा सामान भरले तेव्हा परिस्थिती तशी होती. पुढे मी आणखी कर्ज घेतले व माझ्या डोक्यावर असलेले सावकाराचे कर्ज फेडले. सावकाराच्या कर्जाचा बोजा कमी झाल्याने सुटकेचा निश्वास सोडला. त्यानंतर मी कधीच सावकाराचे कर्ज घेतले नाही. आईच्या नावावर देखील मीच कर्ज घेत होते आणि भरत पण होते. तेव्हा माझ्या डोक्यावरील कर्ज कमी झाले मी माझे कर्ज स्वतः फेडले तेव्हा माझा मुलगा देखील मला म्हणाला आई समताच्या पैश्यामूळे आपण कर्ज मुक्त झालोत. मला अभिमान आहे की मी समताची सभासद आहे याचा.

पुढे मी माझ्या नावावर पंधरा व आईच्या नावावर पंधरा असे तीस हजाराचे कर्ज घेतले. मी हे पैसे आता घरात खर्च करणार नाही याचा निश्चय केला. मी चपलाचा माल भरला अन घरातूनच विकायला सुरवात केली. या व्यवसायात माझा मुलगा सुद्धा मला मदत करू लागला. पुढे या व्यवसायातून मी आर्थिकदृष्ट्या चांगली स्थिर झाले. आता मुलाला सुभाष रोड येथे चपलाचे दुकान टाकून दिले असुन मी अजूनही घरातूनच माझे दुकान चालवत आहे. आज माझं दुकान आणि संसार दोन्ही देखील व्यवस्थित चालू आहे अन आम्ही आता कर्ज मुक्त झालो आहोत. व्यवसाय सुरु करण्याअगोदर गरजा भागवण्यासाठी मला पाच रुपये शेकड्याने कर्ज काढावे लागत होते व ते फेडण्यासाठी मरमर करावी लागत असे. मला असं वाटतंय की प्रत्येक महिलेने एक गट तयार करायला पाहिजे आणि गटातील कर्ज घेऊन आपल्या स्वतः च्या पायावर उभ रहायला शिकल पाहिजे. आज मी स्वाभिमानाने सांगू शकते की मी माझ्या कष्टाने पैसे कमावते. माझ्या अतिशय प्रतिकूल परिस्थितीत मला समताची खंबीर साथ मिळाली. आज समतामूळे मी माझे तीस अन् आईचे तीस हजार असे एकूण साठ हजाराचे कर्ज घेऊन माझ्या दुकानात आणखीन माल भरला आहे. मी आता कर्जाचे हप्ते देखील नियमित भरत असुन मला जसे कर्ज लागेल तसे मी काढते व आपल्या व्यवसायात लावून व्यवसाय वाढवत आहे.



| | |
|---|---|
| नाव | सागर विशाल बचूटे |
| गाव | प्रकाश आंबेडकर नगर, बीड |
| वय | ३२ वर्ष |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | शिवणकाम, किराणा दुकान, लेडीज वेअर |
| बचत गट नाव | आराध्या समता महिला बचत गट |

मी **सागर विशाल बचूटे.** रा. प्रकाश आंबेडकर नगर बीड. माझं माहेर मुंबई आहे. माझे पती रिक्षा चालवतात. माझ्या घरात मी माझे पती माझी सासू आणि एक मुलगा एक मुलगी असा माझा परिवार आहे. आई वडिलांची परिस्तिथी बेताची होती. मला ही शिक्षणाची आवड होती. पण नियतीला काही वेगळंच मंजूर होत. माझे वडील अचानक आम्हाला सोडून गेले. आमच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. सगळी जबाबदारी माझ्यासह आईवर येऊन पडली. मग आईने किराणा दुकान टाकले त्यामुळे उत्पन्नाचा मार्ग मिळाला. पुढे घरातूनच ज्वेलरी साहित्य विकण्यास सुरुवात केली. माझं लग्न झालं तेव्हा मी घरात बसूनच असायचे. पण माझ्यातली तळमळ मला शांत बसू देत नसायची. मी छोटेसे किराणा दुकान माझ्याच घरी सुरु केले. याच काळात मी आराध्या समता महिला बचत गट केला. यातून मला पाच हजार कर्ज मिळाले अन माझा समतासोबतचा प्रवास सुरु झाला.

पुढे काही दिवसांनी मी समता संस्थेमध्ये साफसफाईचेही काम करू लागले. माझ्या दुकानातील मिळणारा नफा आणि समता ऑफिसच्या कामाचे पैसे मिळून मी माझ्या कर्जाचे हप्ते परतफेड करू लागले. आजही आमचा गट नियमित चालतो. मी माझे व माझ्या सासूचे पाच हजाराचे कर्ज माझ्या दुकानातील माल भरण्यासाठी वापरले. माझे पहिले कर्ज फिटल्यानंतर पुढचे चाळीस हजाराचे कर्ज घेऊन साड्या, अस्तर, रेडिमेड ब्लाउज, लहान मुलांचे कपडे असे सामान सुद्धा माझ्या दुकानात आणले. माझी नियमित कर्ज व बचत भरणा व घेतलेल्या कर्जातून उभा केलेला व्यवसाय याची समता संस्थेने दखल घेत माझा महिला उद्योजक पुरस्काराने सुद्धा गौरव केला आहे. यामुळे माझा आत्मविश्वास व जिद्द आणखीन वाढली आहे. मला आता जसे लागेल तसे मी समता संथेचे कर्ज काढते व आपल्या व्यवसायात याची गुंतवणूक करते.

समताच्या विविध महिला मेळावे, शिबीर, कार्यक्रम तथा वार्षिक सभेमधून आम्हाला सर्व माहिती दिली जाते. समताचे काम किती पारदर्शक पद्धतीने चालते हे आम्हाला अश्या कार्यक्रमातून व बचत गटाच्या नियमित होणाऱ्या बैठकामधून कळते. मी आता समता संस्थेचे साठ हजाराचे कर्ज काढून माझ्या व्यवसायात गुंतवून माझा व्यवसाय वाढवला आहे. **समतासोबतचा प्रवास मला एक यशस्वी महिला उद्योजक बनवण्यासाठी महत्वाचा ठरला आहे.**



| | |
|---|---|
| नाव | मोमीन खैरोनीसा जब्बार मिया |
| गाव | प्रकाश आंबेडकर नगर, बीड |
| वय | ५० वर्ष |
| शिक्षण | अशिक्षित |
| व्यवसाय | स्टेशनरी, बांगड्यांचे दुकान. |
| बचत गट नाव | लकी समता महिला बचत गट |

मी **मोमीन खैरोनीसा जब्बार मिया** रा. प्रकाश आंबेडकर नगर इमामपूर रोड बीड. गेल्या ५ वर्षापासून लकी समता महिला बचत गटाची सभासद आहे. माझ्या घरची परिस्तिथी हि नाजूक आहे. मी जेव्हा सुहाशिनीताईंना भेटले तेव्हा मला त्यानी समताच्या गटाबद्दल सांगितलं तेव्हा मी पण समताची सभासद झाले. मला पहिले कर्ज ५००० रुपये मिळाले तेव्हा मी त्या पैश्याचे स्टेशनरी सामान आणले आणि घरातच दुकान सुरु केले. रक्कम छोटी असल्यामुळे त्यात जास्त काही करू शकत नव्हते पण हरकत नाही त्यामुळे माझ्या व्यवसायाला सुरवात तर झाली होती. मला नेहमी पती आणि मुलगा यांच्या समोर पैश्यासाठी हात पसरावे लागत होते. मग मी विचार केला की, आपणच व्यवसाय सुरु केला तर? मनात पक्क केल की आपण काही तरी करूयात म्हणुन मी माझ्या व्यवसायाची सुरवात स्टेशनरी साहित्य विकण्यापासून केली. मी माझ्या कर्जाचे हप्ते स्वतः भरायला लागले. मी दुसरे दहा हजार कर्ज घेतले त्याच्या बांगड्या खरेदी करून दुसऱ्या व्यवसायाची जोड दिली. अचानक कुटुंबावर आलेल्या आर्थिक संकटामुळे काही काळ कुटुंबाची घडी विस्कटली गेली. अश्या काळात सुद्धा मी जिद्दीने व खंबीरपणे उभी राहिले व आपला व्यवसाय न डगमगता चालू ठेवला.

आज समताने मला स्वयंमपुर्ण केले आहे. माझ्या अतिशय प्रतिकूल परिस्थितीत मला समताची खंबीर साथ मिळत गेली व मी या अशा प्रतिकूल परिस्थितीचा सामना करू शकले. आता कर्जाचे हप्ते देखील नियमित भरत असुन मला जसे कर्ज लागेल तसे मी काढते व आपल्या व्यवसायात लावून व्यवसाय वाढवत आहे. आज घडीला मी समताचे तीस हजार कर्ज घेऊन ते माझ्या बांगड्याच्या व्यवसायात गुंतवले आहे. समताच्या विविध महिला मेळावे, शिबीर, कार्यक्रम तथा वार्षिक सभेमधून आम्हाला सर्व माहिती दिली जाते. समताचे काम किती पारदर्शक पद्धतीने चालते हे आम्हाला अश्या कार्यक्रमातून व बचत गटाच्या नियमित होणाऱ्या बैठकामधून कळते. समतासोबतचा प्रवास मला एक यशस्वी महिला उद्योजक बनवण्यासाठी महत्वाचा ठरला आहे.



| | |
|---|---|
| नाव | मोहर लहू गोरे |
| गाव | दगडी शहाजानपूर |
| वय | ४० वर्ष |
| शिक्षण | ८ वी |
| व्यवसाय | कपड्याचे दुकान |
| बचत गट नाव | मा जिजाऊ समता महिला बचत गट |

माझे नाव **मोहर लहू गोरे.** गाव दगडी शहाजानपूर आणि गटाचे नाव मा जिजाऊ समता महिला बचत गट आहे. माझे सासर आणि माहेर दोन्ही दगडी शहाजनपुर आहे. माझे शिक्षण ८ वी पर्यंत झाले की लवकरच माझे लग्न झाले. सासरचे कुटुंबाचे उत्पन्न शेतीच होते. तेव्हा कापूस किंवा सोयाबीन असे नगदी पिके घेतली जात नव्हती. पारंपरीक पिकांपासून शेतीत फारसे उत्पन्न निघत नव्हते. कुटुंबाचा खर्च भागत नव्हता मग मी दुसऱ्याच्या रानातही कामाला जायची. त्यानंतर दुसऱ्याच्या रानात कामाला जाण्याऐवजी आपण आपल्या स्वतःचे उत्पन्नाचे साधन उभे करायचे असे ठरवले. बचत गटाचे कर्ज आणि स्वतः जवळचे काही पैसे टाकून थोडे कपड्यांचा माल भरला आणि घरगुती कपड्यांचा व्यवसाय सुरू केला. तसेच स्टेशनरी सामानही ठेवायला सुरुवात केली. जसजसे कपडे आणि स्टेशनरीची विक्री वाढत गेली तसे मी सामान आणि कपड्यांचा मालही जास्त वाढवत गेले. काही उधारीवर तर काही बचत गटाचे कर्ज घेऊन तसेच काही जवळचे भांडवल टाकून दुकान वाढवत गेले. त्यासोबतच किराणा दुकान देखील चालू केले. शेतीला जोडधंदा म्हणून शेळी खरेदी केली. शेळी सांभाळत तसेच खरेदी विक्री करत करत गाय आणि म्हैसही घेतली. त्यासोबतच दहा ते पंधरा गावरान कोंबड्या देखील माझ्याकडे आहेत. त्यामुळे दूध तूप तसेच कोंबड्यांचे अंडे या सर्वांचे उत्पन्नही येऊ लागले. मी माझ्या व्यवसायासाठी घरातून एकही रुपया घेतला नाही. सर्व भांडवल स्वतः उभे केले आणि ही उत्पन्नाची साधने निर्माण केली.

कोरोना काळात माझ्या पतींना कोरोना झाला त्या आजारपणात खूप पैसा खर्च झाला पण पती कोरोनातून सुखरूप बरे झाले हे माझ्यासाठी महत्त्वाचे आहे. तसेच त्यानंतर सासूबाईंचे आजारपण झाले त्यातही खूप मोठा खर्च झाला. आता सासूबाईंची ही तब्येत बरी आहे आणि माझ्या कुटुंबालाही स्थैर्य मिळालेले आहे. माझ्या व्यवसायामध्ये मला भांडवलासाठी बचत गटाचा खूप आधार होतो. मी पाच हजार रुपयांपासून ते पन्नास हजार रुपयांपर्यंत कर्ज वाढवत नेले आणि नियमित परतफेडही करते. यापुढेही व्यवसायामध्ये वाढ करणे हे माझे स्वप्न आहे आणि ते मी करणारच आहे. समताच्या मेळाव्यांमध्ये बैठकांमध्ये महिलांच्या उद्योजकता विकासासाठी नेहमीच मार्गदर्शन केले जाते. त्यातून आम्हाला काहीतरी उद्योग व्यवसाय करण्याची प्रेरणा मिळते आणि सोबतच कमी व्याजाचे कर्ज देखील मिळते. त्यामुळे समता बचत गटाची मदत आणि मार्गदर्शन कायम मिळत असते.

समतामुळे इतर ही योजनांची माहिती मिळते. सततच्या मेळाव्यामधून आणि कार्यक्रमांना आम्ही उपस्थित राहतो, त्यातून शासकीय योजना, सार्वजनिक आरोग्य, महिलांवरील हिंसाचार थांबवणे, झाडे लावणे आणि वाढवणे अशा अनेक उपक्रमात सहभागी होता येते. त्यामुळे समता केवळ कर्ज देणारी संस्थां नाही, तर आयुष्याच्या सर्वच घटकांमध्ये मदत करणारी सखी आहे, असे मला वाटते.



| | |
|---|---|
| नाव | अंजली अशोक बेदरे |
| गाव | सरफा लाईन, धोंडीपुरा, बीड. |
| वय | ३७ वर्ष |
| शिक्षण | ४ थी |
| व्यवसाय | शिवणकाम, विणकाम, ब्युटीशियन |
| बचत गट नाव | रेणुका माता समता महिला बचत गट |

मी **अंजली अशोक बेदरे,** माझं माहेर पुणे आहे. माझ्या घरात मी माझे मिस्टर एक मुलगी एक मुलगा सासूबाई असा परिवार आहे. माझे पती आणि मुलगा सोन्याचा व्यवसाय करतात व मी पार्लर, शिवणकाम, विणकाम, ब्युटी पार्लर हे सगळे काम करते. मला लग्ना अगोदरच या सगळ्या गोष्टीची आवड होती. माझे पार्लरचे प्रशिक्षण अगोदर पूर्ण झालेलं होत. लग्ना नंतर मला माझा स्वतः चा व्यवसाय करायची इच्छा होती. पण घरातल्या जबाबदाऱ्या खूप होत्या व पूर्ण कुटुंबाची जबाबदारी पती वर होती. मग करायच काय मी बाहेर जाऊन काम केलेलं पतीला आवडत नव्हते त्यामुळं मग मी असं ठरवलं कि, आपण आपला व्यवसाय घरातून सुरु करायचा. मग मी घरात ब्लाउज, पिको फॉल करायला लागल्यामुळे हळू हळू महिलांना माहिती होत गेली. मग विचार केला आपलं पार्लर पण आपण सुरु करायला पाहिजे म्हणुन मी माझे पार्लरचे सामान आणून ठेवले. दोन्ही व्यवसाय सुरळीत सुरु असताना मला भांडवलाची गरज भासू लागली.

समता महिला बचत गटाची माहिती मी समता कार्यकर्त्याकडून फोनवरच घेतली व गट तयार केला. मला या गटातून पहिले कर्ज मिळाले व त्यात अजून एक शिलाई मशीन घेतली आणि मुलींचे शिवण वर्ग सुरू केले. हा गट सुरु केल्यापासून गटाची नियमित बैठक होते. या बैठकीत आम्ही विविध विषयावर चर्चा व विचारांची देवाण घेवाण करत असतो. महिलांना घर कामातून वेळ मिळत नाही अश्या परिस्थितीत गटाच्या बैठकीत आम्ही आवर्जून उपस्थित राहतो. समताच्या होणाऱ्या विविध कार्यक्रम, मेळाव्यातून आम्हाला व्यवसायाचे मार्गदर्शन मिळते व त्याचबरोबर इतर महिलांनी केलेले उद्योग, व्यवसाय याची माहिती मिळते. माझ्या व्यवसायाला भांडवलाची खूप गरज होती. समतामुळे माझी हि अडचण कायमची दूर झाली आहे. या गटामुळे मला माझ्या स्वतःच्या पायावर उभा रहायला खूप मदत झाली. मी आता या समता महिला बचत गटातून आणखीन कर्ज घेऊन माझ्या व्यवसायात गुंतवले आहे. टप्प्याटप्प्याने माझा व्यवसाय वाढत असुन कुटुंबाच्या आर्थिक गरजा व मुलांच्या शिक्षणाचा थोडाफार भार माझ्या या व्यवसायामुळे आता हलका झाला आहे. आज या व्यवसायातून माझा आत्मविश्वास वाढला असुन आता हा व्यवसाय आणखीन वाढवायचा माझा मानस आहे.



| | |
|---|---|
| नाव | वणवे जिजाबाई संतोष |
| गाव | बीड. |
| वय | २८ वर्ष |
| शिक्षण | ७ वी |
| व्यवसाय | पिठाची गिरणी, शेवई मशीन, शिलाई काम |
| बचत गट नाव | वैष्णवी माता समता महिला बचत गट |

मी **वनवे जिजाबाई संतोष** माझे गाव ब्रम्हनाथ येळम असुन माझ्या कुटुंबात मी माझे पती व माझे एक मुलगी एक मुलगा असा माझा परिवार आहे. बीड येथे राहायला आल्यानंतर हाताला काहीतरी काम असावे असे सारखे वाटत होते व तसे माझे प्रयत्नहि चालू होते. मी वैष्णवी समता बचत गटातून समताची सभासद होते. गटाच्या नियमित होणाऱ्या बैठकामधून व समताच्या कार्यक्रम, मेळावे, शिबीर यातून सतत मार्गदर्शन मिळत गेले. बचतीचे महत्व व कर्जाचा योग्य वापर कसा करायचा याचे चांगले ज्ञान मला मिळत गेले. पुढे मी बचत गटाचे पहिले कर्ज घेतले व त्यातून एक शिलाई मशीन घेतली. शिलाई कामातून मला थोडेफार पैसे मिळू लागले याचा मला फायदा घरातील छोटे छोटे खर्च भागवण्यासाठी होऊ लागला. माझे पती ट्रक ड्रायव्हर असल्यामुळे कित्येक दिवस ते घराबाहेरच असायचे. शिलाई मशीनच्या कामातून येणारे उत्पन्न कमी असल्यामुळे मी माझे आधीचे कर्ज फेडून पुन्हा वीस हजाराचे कर्ज घेतले. या कर्जातून मी शेवई मशीन व पिठाची गिरणी विकत घेतली व नवीन व्यवसाय उभा केला. नव्या व्यवसायामुळे दरमहा उत्पन्नात चांगली वाढ झाली. आता कुटुंबाच्या आवश्यक गरजासह मुलांच्या शिक्षणाचा सुद्धा खर्च मी सहज भागवू लागले आहे.

बचत गट नियमित बैठकीच्या शिस्तीतून बचत असो वा कर्ज हफ्ता असो आम्हाला भरायची सवय लागली. समताचे कार्यक्रम, मेळावे, शिबीर हे सर्व महिला केंद्रित आहे. यातून व्यवसाय प्रशिक्षण, प्रोत्साहन व आर्थिक पाठबळ यामुळे माझ्या सारख्या असंख्य महिला छोटे छोटे व्यवसाय करत स्वावलंबी होत आहेत. आजघडीला मी समताचे चाळीस हजाराचे कर्ज घेतले आहे. या कर्जातून मी काही पैसे मुलांच्या शिक्षणासाठी तर राहिलेले पैसे याच व्यवसायात गुंतवले आहे. एका व्यवसायातून दुसऱ्या व्यवसायाकडे जाताना माझे कमी असलेले शिक्षण कधी आड आले नाही. हा जोड व्यवसाय चालू केला या व्यवसायावर माझ्या मुलांचे शिक्षण, घर खर्च मी भागवत होते गटात आल्यामुळे व्याजाचे पैसे काढण्याची गरज भासली नाही बचत गटात आल्यामुळे मला बचत करायची सवय देखील लागली बचत गटात आल्यामुळे मी स्वतःचा व्यवसाय चालू केला शिक्षण कमी असतांना देखील मी एक छोटी उद्योजक बनू शकले याचा मला खूप अभिमान वाटत आहे आज माझा व्यवसाय चांगल्या पद्धतीत चालू आहे.



| | |
|---|---|
| नाव | आशा रामप्रसाद कोल्हे |
| गाव | तिरुपती कॉलनी, बीड |
| वय | ४० वर्ष |
| शिक्षण | ११ वी |
| व्यवसाय | चिंतामणी मल्टीसर्व्हिसेस |
| बचत गट नाव | कालिका समता महिला बचत गट |

मी **आशा रामप्रसाद कोल्हे,** माझे प्राथमिक शिक्षण माझे माहेर शिरापूर धुमाळ ता. शिरूर जि. बीड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. माझे माध्यमिक (११ वी) पर्यंतचे शिक्षण हे गजानन माध्यमिक उच्च माध्यमिक शाळा राजुरी नवगण येथे झाले. माझी वडीलाकडील कुटुंब ही शेतकरी असल्यामुळे माझे लग्न वयाच्या १८ व्या वर्षी झाले. मला लग्नाच्या आधी काही व्यवहारिक ज्ञान नव्हते, कारण मी शेतकरी कुटुंबातील होते. माझे शिक्षण अकरावी पर्यंतच झाले होते. मी खेड्यातील असल्यामुळे जास्त नॉलेज नव्हते. परंतु सरांनी काही खटाटोप करून माहेरच्या कडून सहकार्य घेऊन बँकेचे कर्ज काढून आर्थिक तरतूद केली व त्यानंतर आम्ही लवकर म्हणून काम करत असलेले तेच दुकान चालवायला घेतले. त्यानंतर एका वर्षांनीच शासनाने शासन धोरण व न्यायालय आदेशानुसार झुणका भाकर केंद्र ताब्यात घेतले. आता काय करायचे? बँकेचे कर्ज कसे फेडायचे? खूप जीवनात अडचणीच अडचणी येत होत्या. जरा सुरळीत चालले की काही ना काही अडचणी येतच होत्या. जीवन परीक्षा पाहत होते. त्यानंतर काही दिवसानंतर नगर रोडला यांच्या मित्राचे मध्यस्थीने चिंतामणी एजन्सीज हे दुकान रु. ६०००/- प्रति महिना प्रमाणे भाडेतत्त्वावर घेतले. सदर दुकान खूप दिवस बंद होते, लाईट नव्हती. अशा अवस्थेत चिंतामणी मल्टी सर्विसेस दुकानाचे उद्घाटन करून दुकान सुरू केले. पहिल्या दिवसाचे कलेक्शन पाच-सहा रुपये होते. त्यामुळे सदर दुकानाचा किराया सहा महिण्यापर्यंत दुसऱ्यांकडून व्याजानी पैसे घेऊन भरला. किरायाचे पैसे द्यायला एकही दिवस मागे पुढे झाले तर मालक येऊन दुकानाची चावी मागायचा, तुमच्याच्याने भाडे देणे होत नाही तर गाळा सोडा असे म्हणायचा. असे करत करत दिवस निघून गेले. सन २०११ मध्ये शासनाने महा इ सेवा केंद्र योजना चालू केली त्याअंतर्गत आम्ही एक केंद्र घेतले. त्यानंतर एकाच महिन्याने दुकानाचाही व्यवहार झाला व किरायाने असलेले दुकान आम्ही स्वतः क्रीडा मंडळाकडे थेट भाडेकरू म्हणून करार करून घेतले. असा जीवनात संघर्ष होता, पण पतींचा खूप सपोर्ट होता. चिंतामणी मल्टी सर्विसेस या दुकानाचा परवाना माझ्याच नावे काढलेला होता. अशाप्रकारे व्यावसायिक म्हणून माझ्या जीवनात सुरुवात झाली.

सन २०१२ मध्ये स्वराज्य ग्रुप नावाची भागीदारी संस्था नोंदवण्यात आली व त्यातही मी भागीदार म्हणून राहिले. एकंदर सामाजिक स्थिती व शेती क्षेत्रामध्ये असलेला वाव विचारात घेता आम्ही शेतकऱ्यांना सोबत घेऊन ग्राहकांना ताजा स्वच्छ व आरोग्यदायी आहार मिळावा म्हणून शेतकरी ते थेट ग्राहक विक्रीचा व्यवसाय करण्याचे ठरवलं. या संकल्पनेतूनच मोठे काम करण्याच्या उद्देशाने SWG किसान बाजार फार्मर्स प्रोड्युसर कंपनी ची स्थापना करण्यात आली सदर कंपनीमध्ये मी संचालक म्हणून काम करत आहे. वर्ष २०१५ ते २०२५ पर्यंतच्या प्रवासात मी समता संस्थेचे नियमित कर्ज घेत आले आहे. या कर्जाचा वापर मी माझ्या सर्व व्यवसायात सातत्याने करत आले आहे. आज घडीला माझ्याकडे समता संस्थेचे पन्नास हजाराचे कर्ज सुरु असुन त्याच्या नियमित परतफेडही सुरू आहे.



| | |
|---|---|
| नाव | फटाले स्वाती दत्ता |
| गाव | बहिरवाडी. |
| वय | ३४ वर्ष |
| शिक्षण | ७ वी |
| व्यवसाय | मेस व खानावळ |
| बचत गट नाव | सावता समता महिला बचत गट |

मी **स्वाती दत्ता फटाले** मी बहिरवाडी येथे राहत असून माझे गाव रामपुरी आहे. माझ्या परिवारात मी माझे पती माझा मुलगा असा माझा परिवार आहे. माझे पती ऑटोरिक्षा ड्रायव्हर असल्यामुळे अतिशय माफक उत्पन्न घरात यायचे. कुटुंबाच्या आर्थिक गरजा पुर्णपणे भागत नसल्यामुळे आपणही काहीतरी छोटासा उद्योग करावा असे मला सारखे वाटत होते. शिक्षण कमी असल्यामळे बाहेर नोकरी मिळणे सुद्धा अशक्यच त्यात एक लहान मुलगा त्याचा सांभाळ होताच. बचत गटाची सभासद असल्यामुळे बचत गटातून कर्ज घेऊन काही तरी करावे असे वाटत होते पण सुरुवातीला समता बचत गटातून फक्त पाच हजाराचं कर्ज मिळत होते. या छोट्या भांडवलातून एखादा व्यवसाय करणे मला कठीण वाटत असल्यामुळे मी हे कर्ज घर खर्चात खर्च केले. त्यानंतर चौथे तीस हजाराचे कर्ज घेऊन एक किराणा दुकान अयोध्या नगर येथे सुरू केले होते. किराणा दुकानात मी कटलरी सामान देखील ठेवले होते. व्यवसायात चांगला जम बसताच अचानक काही कारणास्तव आम्हाला ते दुकान बंद करावे लागले. काहीं दिवस पतीच्या कमाईवरच घर चालू होते. पुन्हा आर्थिक अडचणी डोके वर काढू लागल्या. शांत बसून प्रश्न सुटणार नव्हते हे चांगले कळत होते. या दरम्यान मी समता बँकेचे दोनदा तीस हजार कर्ज घेऊन फेडले होते.

आता मी पन्नास हजाराचे कर्ज घेतले व हे कर्ज घेऊन एक हॉटेल व नाष्टा सेंटर सुरू करायचे ठरवले व सुरु सुद्धा केले. माझ्या हॉटेलमध्ये घरगुती पद्धतीचे व चांगल्या क्वालिटीचे जेवण मिळत आहे. मी स्वतः हा हॉटेल व्यवसाय चालवते व माझ्या हाताखाली दोन बायकाही कामाला आहेत. या व्यवसायात माझ्या पतीची देखील मला मदत होते. आता माझा व्यवसाय चांगला चालत आहे. समताचे आर्थिक पाठबळ वेळोवेळी मिळत गेले व आवश्यक असणारे भांडवल गुंतवणुकीचा मोठा प्रश्न सुटत गेला. आज घडीला मी समताचे पन्नास हजाराचे कर्ज दोन वेळा घेतले असुन त्याचा वापर माझ्या या व्यवसायासाठी करत आले आहे. अतिशय सहज व सुलभ पद्धतीने मिळणाऱ्या समताच्या कर्जामुळे मला अतिशय गरजेच्या वेळी भांडवल मिळत गेले. **गटाच्या नियमित होणाऱ्या बैठका, कार्यक्रम, मेळावे, शिबीर यातून माझ्या उद्योजक होण्याचा पाया मजबूत होत गेला. आज मी आत्मविश्वासाने माझा व्यवसाय चालवत असुन समतासोबतचा माझा प्रवास निरंतर सुरू आहे.**



| | |
|---|---|
| नाव | कविता गोकुळ गायकवाड |
| गाव | अंकुश नगर, बीड |
| वय | ३५ वर्ष |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | लेडीज वेअर्स, लेडीज टेलर |
| बचत गट नाव | श्री बालाजी समता महिला बचत गट |

मी **कविता गोकुळ गायकवाड** मूळ गाव सोडून वर्ष २००८ पासून बीड येथे वास्तव्यास आहे. मी, माझे पती, दोन मुलं असं आमचं कुटुंब. माझे पती चहाचे छोटेसे दुकान चालवत त्यामुळे घरची आर्थिक परिस्थिती नाजूकच होती. अश्या परिस्थितीत कुटुंबाचा गाडा पुढे घेऊन जाणे अवघड झाले होते. यातून काहीतरी मार्ग काढणे गरजेचे वाटत होते. मला शिवनकामाची खूप आवड होती पण जमत नव्हते. आपण जर यालाच आपल्या उपजीविकेचे साधन बनवले तर आपल्या कुटुंबासाठी एक आर्थिक आधार होऊ शकतो हे माझ्या लक्षात आले. माझ्या आजूबाजूच्या परिसराचा अंदाज घेतला तर माझ्या लक्षात आले कि, इथे कुठेच शिवणकाम शिकवण्याचा क्लास कुणी घेत नव्हते. अंकुश नगर ते शाहू नगर असे दररोज पायी जाऊन मी तीन महिने शिवण क्लास पूर्ण केला. शिलाई मशीन आधीपासूनच असल्यामुळे मी पत्र्याच्या शेडमध्ये बसून छोटी छोटी कामे करू लागले. माझ्या स्वतःच्या कमाईचे पैसे घरात येऊ लागले. या कामातून म्हणावे तेवढे पैसे भेटत नव्हते पण दोन पैसे आपणही कमवत आहोत याचा आनंद माझ्यासाठी फार मोठा होता. आता थांबायचे नाही असे मी ठरवून टाकले.

पुढे समता महिला बचत गट या संस्थेसोबत माझा प्रवास सुरु झाला. पाच ते पन्नास हजाराच्या प्रवासात मी माझा व्यवसाय आता चांगला वाढवला आहे. आता माझ्याकडे माझे स्वतःचे दुकान असुन या दुकानात सध्या मशिनच्या जागी एक हायस्पीड मशिन आणि दोन डबल पाट मशिन मी वापरत आहे. मी व्यवसायाची केलेली निवड अन यासाठी समताने दिलेले आर्थिक पाठबळ याने माझा व्यवसायात चांगला जम बसला आहे. कुटुंबाचा आर्थिक भार व मुलांच्या शिक्षणाच्या गरजा आता पुर्ण होऊ लागल्या आहेत. पतीच्या खांद्याला खांदा लावून मी व माझे कुटुंब आता स्वयंमपुर्ण जीवन जगत आहोत. आज माझ्या कुटुंबाची आर्थिक स्थिती भक्कम झाली असुन आम्ही आता पत्र्याच्या शेडमधून स्वतःच्या आरसीसी घरात रहायला गेलो आहोत. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत समताची मिळालेली साथ, सोबत यामुळे भांडवल गुंतवणुकीचा अवघड प्रश्न सुटत गेला. बचत गट बैठक त्यातील शिस्त, विविध कार्यक्रम, मेळावे शिबीर यातून भेटलेले व्यवसायाचे बहुमूल्य मार्गदर्शन व इतर महिला उद्योजक यांच्याशी यानिमित्ताने झालेला मनमोकळा संवाद याने माझा आत्मविश्वास वाढत गेला. **आज मागे वळून बघताना कशाचीही खंत वाटत नाही पण आपण आज या व्यवसायातून घडलो याचा अभिमान मात्र सतत वाटत असतो.**



| | |
|---|---|
| नाव | बिरलिगे पुनम बाबासाहेब |
| गाव | गढाळावस्ती, नेकनुर, ता.जि. बिड |
| वय | २८ वर्ष |
| शिक्षण | १२ वी |
| व्यवसाय | ब्युटी पार्लर |
| बचत गट नाव | स्वरा समता महिला बचत गट |

नेकनूर मधील गढाळवस्तीत आपल्या पती, सासू व दोन मुलांसोबत राहणाऱ्या पूनमताई या २०१७ मध्ये समता संस्थेसोबत जोडल्या गेल्या. स्वरा समता महिला बचत गटाच्या सभासद असलेल्या पूनमताई शिवणकाम काम चांगल्या करायच्या. समताच्या महिला मेळाव्यात त्या सहभागी झाल्यानंतर या मेळाव्यातून पुढे आलेल्या उद्योजक महिलांना पाहून त्यांनाही उद्योजक बनण्याची प्रेरणा मिळत गेली. त्यातूनच त्यांनी मग समताचे पहिले कर्ज घेऊन एक शिलाई मशीन खरेदी केली व शिवणकाम करण्यास सुरुवात केली. त्यांचे पती तलाठी ऑफिसमध्ये कोतवाल म्हणून काम करायचे त्यातून त्यांना मिळणारा पगार फारच कमी असल्यामुळे पूनमताईच्या शिवणकामातून कुटुंबाला तेवढाच आधार मिळत होता.

काही वर्ष शिवणकाम केल्यानंतर त्यांनी या व्यवसायाशी संबंधित पिको फॉल मशीन घेऊन आपल्या छोट्या व्यवसायाला थोडे मजबूत केले. यासाठी त्यांना समताच्या दुसऱ्या दहा हजाराच्या कर्जाची मदत झाली. हा व्यवसाय करत असताना त्यांना त्यांच्या कुटुंबाची तेवढीच तोलामोलाची साथ मिळत गेली. या व्यवसायामुळे त्यांची आजूबाजूच्या परिसरात चांगली ओळख निर्माण झाली. महिलांची नियमित होणारी ये जा व त्यांच्याशी होणारा संवाद यातून त्यांना महिलांच्या गरजा कळत गेल्या. पुढे त्यांनी ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणानंतर त्या आपल्याच घरी महिलांचे छोटे मोठे मेकअप करू लागल्या. या कामातून चांगला नफा मिळत गेला. आपले दहा हजाराचे कर्ज फेडल्यानंतर त्यांनी वीस हजाराचे कर्ज घेतले. यादरम्यान त्यांनी आपल्या सासूचे नावही गटात घेऊन त्यांना सभासद करून घेतले होते.

आपले व सासूबाईच्या कर्जातून त्यांनी नवीन ब्युटी पार्लर टाकले. शिवणकामापासून सुरु झालेला प्रवास ते ब्युटी पार्लर व्यवसायाचा टप्पा असा यशस्वी प्रवास त्यांनी केला. यासाठी त्यांना कुटुंबाची साथ व समताच्या आर्थिक मदतीचा आधार वेळोवेळी मिळत गेला. काहीतरी करायची प्रगल्भ इच्छा व या इच्छेला कष्टाची जोड देऊन जिद्दीने त्या पुढे आल्या आहेत. नेहमी काहीतरी नवीन शिकण्याची तळमळ त्यांची आजही सुरु आहे. या व्यवसायांनी त्यांच्या मुलांच्या शैक्षणिक गरजा सुद्धा आता चांगल्या भागत आहेत. समताच्या नियमित होणाऱ्या बैठका व शिस्त यामुळे कर्जाची नियमित परतफेड करताना बचतही मागे पडत गेली. अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून पुढे आलेल्या पूनमताईनी आता तीस हजाराचे कर्ज घेऊन ब्युटी पार्लर व्यवसायातच गुंतवले आहे व आपला व्यवसाय वाढवला आहे.



| नाव | तेवर ज्योती आनंद स्वामी |
| --- | --- |
| गाव | बीड |
| वय | ४५ वर्ष |
| शिक्षण | ३ री |
| व्यवसाय | मुरकुल, चिवडा, पापड उद्योग. |
| बचत गट नाव | संत सावता समता महिला बचत गट बीड |

**ज्योती तेवर** या मुळच्या तामिळनाडू या राज्यातल्या असुन त्यांचे सासर व माहेर दोन्ही याच राज्यातले. त्यांचे कुटुंब पोट भरण्यासाठी बीड येथे येऊन स्थायिक झाले. त्यांच्या कुटुंबात पती, एक मुलगा व दोन मुली आहेत. पती मजुरी करुन त्यातून येणाऱ्या पैश्यातून कुटुंब चालत होते. पुढे त्यांच्या पतीने मजुरीचे काम सोडून साचलेल्या पैश्यातून ज्योतीताई व त्यांचे पती असे दोघे मिळून कच्चे मुरकुल आणून त्यांना ऊन देऊन ते तळून त्यावर मसाला, मिर्ची टाकून ते पॅकिंग करून बाजारात विकायला सुरुवात केली. त्याचबरोबर चिवडा, पापड तयार करणे व त्यांचे सुद्धा पॅकिंग करून बाजारात विकणे असा त्यांचा व्यवसाय सुरु झाला. पण जसजसा व्यवसाय वाढत जाऊ लागला तसतसा पैसा कमी पडू लागला. कमी पडत असलेला पैसा कुठून उभा करायचा असा प्रश्न त्यांना पडला.

ज्योतीताई जेथे राहतात तेथे त्यांच्या शेजारच्या ताई बचत गटात असल्यामुळे त्यांना बचत गटाची माहिती मिळाली. व्यवसाय वाढवण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाचा त्यांना चांगला मार्ग मिळाला. त्यांनी नवीन बचत गट करून त्या समताच्या सभासद झाल्या. पहिले पाच हजाराचे कर्ज घेऊन त्यांनी आपल्या व्यवसायात गुंतवले. दुसरे दहा हजाराचे कर्ज घेऊन त्यांनी ते आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी वापरले. पुढचे वीस व तीस हजाराचे कर्ज घेऊन त्यांनी ते सुद्धा आपल्या व्यवसायात लावून व्यवसाय वाढवत नेला. एकवेळ दोन वेळचे जेवणाचे अवघड असताना त्यांनी जिद्दीने व कष्टाने स्वतःला व्यवसायात झोकून देऊन आपल्या पती सोबत एक यशस्वी पाउल टाकत आज स्वावलंबी झाल्या आहेत. या व्यवसायामुळे त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक गरजा आता पुर्ण होताना दिसतात.

या व्यवसायामुळे त्यांच्या दोन्ही मुलीचे आता लग्न झाले आहे. त्याचबरोबर त्यांच्या मुलाचे शिक्षण सुद्धा व्यवस्थित सुरू आहे. ताई सध्या चाळीस हजाराचे कर्ज घेऊन त्यांनी याच व्यवसायात गुंतवून त्याची त्या नियमित परतफेड करत आहेत. समताच्या विविध कार्यक्रम, मेळाव्यातून व्यवसायाचे सतत मार्गदर्शन मिळत गेले. विविध महिलांनी केलेल्या व्यवसायाचे व त्यांनी व्यक्त केलेले मनोगत त्या लक्ष देऊन ऐकत गेल्या. यातून त्यांना व्यवसायात करण्यास खूप मदत झाली. त्यांच्या या व्यवसायातून त्यांनी आजूबाजूच्या परिसरातील काही महिलांना सुद्धा रोजगार उपलब्ध करून दिला आहे. **आज नवऱ्याच्या खांद्याला खांदा लावून त्या व्यवसाय करत आहेत व एक यशस्वी उद्योजक म्हणून नावारूपाला आल्या आहेत. समताचा आर्थिक मदतीचा हात त्यांनी घट्ट पकडून त्या आपल्या व्यवसायात प्रगती करत आहेत.**




| | |
|---|---|
| नाव | उषा गोरख कांबळे |
| गाव | बहिरवाडी |
| वय | ४५ वर्ष |
| शिक्षण | ७ वी |
| व्यवसाय | मिरची कांडण, पिठाची चक्की उद्योग |
| बचत गट नाव | निकिता समता महिला बचत गट बहिरवाडी |

**उषा गोरख कांबळे** यांच्या कुटुंबात पती एक मुलगा व दोन मुली असे कुटुंब आहे. उषाताईचे मूळ गावं हिवरापहाडी असुन त्यांचे माहेर म्हणजे बीड मधील बहिरवाडी. हिवरापहाडी हे गाव डोंगरपट्ट्यात असलेले छोटे गाव असल्यामुळे हाताला हवे तेवढे कामे मिळत नाही. शेतीसुद्धा फार कमी असल्यामुळे कुटूंबाचा उदरनिर्वाह होणे कठीण जात होते. त्यामुळे उषाताई पुर्ण कुटुंबासह बीडमधील बहिरवाडी या त्यांच्या माहेरी आल्या.

एक खोली भाड्याने घेऊन त्या राहू लागल्या. पती हे बांधकाम मिस्त्री म्हणून कामाला जात होते. त्यांच्या कामातून येणाऱ्या पैशातून घर चालत असे. येणाऱ्या तुटपुंज्या पैश्यातून कुटुंबाचा दोन वेळचा जेवणाचा खर्च भागवणे सुद्धा कठीण जात होते. त्यामुळे उषाताई सुद्धा विटभट्टीवर कामाला जाऊ लागल्या. या कामातून त्यांना जेमतेम पैसे मिळत होते. तरी सुद्धा कुटुंबाची फरफट सुरूच होती. रोजची होणारी धावपळ व त्यातून होणारी तुटपुंजी कमाई या चक्रात त्या अडकल्या होत्या. यातून काहीतरी चांगला मार्ग निघेल या आशेवर त्या आला दिवस पुढे ढकलत होत्या. बहिरवाडीत नुकताच स्थापन झालेल्या समताच्या निकिता समता महिला बचत गटाच्या त्या सभासद झाल्या. गटात आल्यावर त्यांनी पहिले कर्ज पाच हजाराचे घेतले. उषाताई ज्या ठिकाणी राहत होत्या त्या परिसरात पिठाची गिरणी नसल्यामुळे त्यांनी त्यांच्याकडे जमा असलेली सर्व पुंजी व घेतलेले कर्ज यातून एक पिठाची गिरणी घेतली. हळूहळू गिऱ्हाईक वाढत गेले व यातून त्यांना थोडा फार नफा राहू लागला. कुटुंबाची गाडी हळूहळू रुळावर येऊ लागली. त्या कर्जाचे हफ्ते सुद्धा वेळेवर फेडू लागल्या. पहिल्या कर्जाची पुर्ण परतफेड केल्यानंतर त्यांनी दहा हजाराचे कर्ज घेऊन आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी वापरले.

पुढे वीस हजाराचे कर्ज घेऊन त्यांनी त्यात स्वत: कडील काही रक्कम टाकून मिरची कांडन यंत्र घेतले. एकीकडे पिठाची गिरणी व दुसरीकडे मिरची कांडण मशीन असा त्यांचा दुहेरी व्यवसाय सुरु झाला. त्यांचा हा व्यवसाय आता चांगला सुरू असुन कुटुंबाची आर्थिक घडी सुद्धा चांगली बसली आहे. थेंबे थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे दोन पैसे मागे पडत गेले. साचलेल्या या पैश्यातून त्यांनी त्याच्या मुलीचे चांगले लग्न लावून दिले. **आता उषाताईच्या आर्थिक अडचणी संपून त्या एक चागंल्या महिला उद्योजक म्हणून पुढे आल्या आहेत.** समतासोबतचा त्यांचा प्रवास आजही सुरु असुन त्यांची चांगली बचतही मागे पडत आहे. समताच्या होणाऱ्या विविध कार्यक्रमाना त्या आवर्जून उपस्थित राहतात.



| | |
|---|---|
| नाव | जगताप सुनिता सुधाकर |
| गाव | मुर्शदपूर |
| वय | ५३ वर्ष |
| शिक्षण | ५ वी |
| व्यवसाय | शेळीपालन आणि कुक्कुटपालन |
| बचत गट नाव | श्रद्धा समता शक्ती महिला बचत गट |

**सुनिता सुधाकर जगताप** यांचे गाव मुर्शदपूर असुन त्या पेशाने शेतकरी कुटुंबातील. सध्या बीडमध्ये शेती करणे आता पहिल्यासारखे सोपे राहिलेले नाहे. अनियमित पडणारा पाऊस असो वा मालाला मिळणारा नगण्य भाव असो अश्या अनेक कारणांनी शेती करणे कठीण होऊन बसले आहे. शेतीपूरक एखादा व्यवसाय करावा तर त्यासाठी लागणारे भांडवल कसे उभे करावे हाही एक प्रश्नच होता. अश्यातच वर्ष २०१८ मध्ये सुनिता ताई व त्यांची सून अश्या दोघी सासु सुना श्रद्धा नावाच्या समता बचत गटामध्ये दाखल झाल्या.

गटात दाखल झाल्यानंतर एक दोन वर्षात त्यांनी शेतीला जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन करायचा निर्णय घेतला. या व्यवसायाला लागणारे भांडवल त्यांनी समता गटातील दोघींच्या नावावरील कर्ज घेऊन उभे केले. नवा व्यवसाय जसजसा पुढे जात होता तसतसा कुटुंबाला नियमित उत्पन्नाचा आधार मिळत गेला. कुक्कुटपालनाचा व्यवसाय स्थिर होताच त्यांनी याच व्यवसायाला जोडून शेळीपालन हा नवीन व्यवसाय सुरु केला. आधीच्या कर्जाची नियमित परतफेड केल्यामुळे त्यांनी पुन्हा दोघींच्या नावावर चाळीस हजाराचे कर्ज घेऊन त्यातून काही शेळ्या खरेदी केल्या. त्यांचे दोन्ही व्यवसाय सुरळीत सुरु असल्यामुळे दरमहा उपन्नात वाढ होत गेली. हळूहळू कुटुंबाचे आर्थिक प्रश्न मिटत गेले. रिकाम्या हाताला व्यवसायाची जोड मिळाल्यामुळे शेतीवरचे अवलंबित्व संपले. पुढे त्यांनी दोघींच्या नावावर ऐंशी हजाराचे कर्ज घेऊन कुक्कुटपालन व शेळीपालनाच्या जागेवर मोठे पत्र्याचे शेड बांधले.

आता त्यांच्या व्यवसायाने चांगली गती घेतली आहे. समताच्या नियमित होणाऱ्या बैठका, कार्यक्रम, मेळावे यातून त्यांना व्यवसाय विषयक मार्गदर्शन, व आर्थिक साक्षरतेचे महत्व कळत गेले. यातून त्या एक यशस्वी महिला उद्योजक म्हणून पुढे आल्या. मध्यंतरीच्या काळात पतीचा व नातवाचा भीषण अपघात झाला होता. अपघातात गंभीर दुखापत झाल्यामुळे दवाखान्यात खूप पैसा खर्च झाला. व्यवसायामधून आलेल्या उत्पन्नातून त्यांनी हा सर्व खर्च भागवला. अश्या अनेक आव्हानांना सामोरे जात न डगमगता त्या आजही त्याच जोमाने आपला व्यवसाय जिद्दीने करत आहेत. आता त्यांनी समताचे एक लाखाचे कर्ज घेऊन याच व्यवसायात गुंतवले आहे. समताच्या वेळोवेळी दिलेल्या आर्थिक आधारामुळे त्यांचा व्यवसायातील आत्मविश्वास वृद्धिंगत होण्यास कायम मदत मिळाली आहे.



| | |
|---|---|
| नाव | जाधव संगीता सुनील |
| गाव | बहिरवाडी, ता.जि. बीड |
| वय | ४५ वर्ष |
| शिक्षण | ५ वी |
| व्यवसाय | किराणा, पिठाची गिरणी, शेवया, पापड |
| बचत गट नाव | नारीशक्ती समता महिला बचत गट |

**संगीता सुनील जाधव** या राहणाऱ्या बहिरवाडीच्या रहिवाशी असुन त्यांच्या कुटुंबात पती व तीन मुले असतात. त्या स्वत: शेतमजूर म्हणून काम करत तर त्यांचे पती मोटार गॅरेजवर काम करतात. पण यातून येणारे उत्पन्न अतिशय कमी असल्यामुळे कुटुंबाचा आर्थिक गाडा हाकणे अवघड जात होते. त्यात मुलांच्या शिक्षणासाठीचा खर्चहि झेपत नव्हता. कुटुंबाची सधस्थिती बघता येणारे भविष्य फारच आव्हानांचे असणार याची त्यांना कल्पना आली. त्यातूनच मग त्यांनी विचार करून एक शेवयाची मशीन खरेदी केली. या मशिनीमुळे त्या उन्हाळ कामे करू लागल्यामुळे यातून त्यांना दोन पैसे मिळत गेले व महिलांसोबत ओळखी वाढत गेल्या.

पुढे त्या समता संस्थेच्या नारीशक्ती बचत गटात येऊन समताच्या सभासद झाल्या. गटात आल्यावर समताकडून वेळोवेळी त्यांना उद्योग व्यवसायाचे मार्गदर्शन मिळत गेले. त्यांनी समताचे कर्ज घेऊन व स्वत: कडील काही भांडवल गुंतवून एक पिठाची गिरणी घेतली. गिरणी व उन्हाळ कामामुळे कुटुंबाच्या उत्पन्नाच्या साधनात वाढ झाली. मुलांच्या शिक्षणाच्या थोड्या फार गरजा पुर्ण होऊ लागल्या. कर्जाची नियमित परतफेड करत गेल्या. आजूबाजूच्या परिसराचा अभ्यास करून त्यांनी एक छोटेसे किराणा दुकान सुरु करण्याचा निर्णय घेतला. आधी घेतलेले कर्ज पुर्ण भरून त्यांनी वीस हजार कर्ज घेतले व यात स्वत:कडील काही पैसे टाकून एक छोटेसे किराणा सुरु केले. किराणा दुकान टाकण्याचा त्यांचा निर्णय त्यांनी सार्थ ठरवताना अजून एक व्यवसायाची जोड त्यांच्या कुटुंबाला मिळाली.

बघता बघता त्यांचे सर्व व्यवसाय व्यवस्थित चालू लागले. यामुळे कुटुंबाची आर्थिक घडी बसण्यास मदत झाली. समताचे आर्थिक पाठबळ मिळाल्यामुळे सावकारी कर्ज घेण्याची कधी वेळ आली नाही. समता घेत असलेले कार्यक्रम, मेळावे यातून उद्योग व्यवसायाचा पाया मजबूत होत गेला. गटाची शिस्त व समताचे मार्गदर्शन वेळोवेळी मिळत गेल्यामुळे एक महिला उद्योजक म्हणून पुढे येण्यास मदत होत गेली.

संगीताताईचा व्यवसाय आता चांगला चालत असुन त्यांनी आता पन्नास हजाराचे कर्ज घेऊन याच व्यवसायात गुंतवले आहे व व्यवसाय वाढवत नेला आहे. त्यांच्या गटाला आता सात वर्ष होऊन गेली आहेत. त्यांचा गट आजही नियमित चालू असुन गटात बचतही चांगली जमा झाली आहे. मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवून त्यांची बचत मागे पडत आहे. गटातील इतर सभासदही छोटे मोठे व्यवसाय करत असुन त्याचा त्यांना चांगला फायदाही होतो आहे.



| | |
|---|---|
| नाव | संगीता अनंतराव वानरे |
| गाव | स्नेह नगर, बीड |
| वय | ५२ वर्ष |
| शिक्षण | ७ वी |
| व्यवसाय | पिठाची गिरणी, बांगड्या, शेवया, पापड |
| बचत गट नाव | जिज्ञासा समता महिला बचत गट बीड |

**संगीता वानरे** यांचे सासर सोनपेठमधील शेळगावचे. सोनपेठ हे खेडे गाव असल्यामुळे कशी बशी आकरा वर्षे येथे काढल्यावर त्या कुटुंबासह शेळगाव येथे येऊन स्थायिक झाल्या. संगीताताई यांचा व्यवसाय म्हणजे गावोगावी जावून बांगड्या भरण्याचा. त्यामुळे त्यांनी सोनपेठ हे गाव सोडून शेळगाव येथे येऊन त्यांचे पती व त्या बांगड्याचा व्यवसाय करू लागले. पण व्यवसायातील धावपळ खूप असायची व त्यातून मिळणारे पैसे म्हणावे तसे मिळत नव्हते. कुटुंबाची आर्थिक गरज भागत नसल्यास कुटुंबाच्या प्रमुखांना आणखीन कष्ट, श्रम हे करावेच लागतात. तसेच काहीसे संगीता ताईसोबत घडताना दिसून येते.

आर्थिक गरजा भागत नसल्यामुळे त्यांनी सोनपेठ हे गाव सोडले व बीड येथे येऊन स्थायिक झाल्या. गेल्या पंचवीस वर्षापासून त्या बीडमध्ये राहत असताना शेजारील महिलांच्या मदतीने समता संस्थेच्या बचत गटात दाखल झाल्या. बचत गटाच्या नियमित होणाऱ्या बैठका, कार्यक्रम,मेळावे यात सहभागी होऊ लागल्या. यातून त्यांना उद्योग व्यवसायाचे मार्गदर्शन मिळत गेले. पुढे त्यांनी आपल्या जिज्ञासा समता महिला गटाचे कर्ज घेऊन घरघुगुती हात शेवया, कुरडया, पापड व पापडया करण्याचं काम सुरु केले. त्यांचे पती गावोगावी जाऊन बांगडयाचा व्यवसाय करू लागले व ताई घरगुती व्यवसाय करू लागल्या. नव्या व्यवसायाने कुटुंबाची आर्थिक घडी बसत असताना गटातील कर्जाची नियमित परतफेड सुद्धा त्या करू लागल्या. जसेजसे कर्ज फिटत जाईल तसतसे त्या पुढचे कर्ज घेत गेल्या व आपल्या या दोन्ही व्यवसायामध्ये गुंतवणूक करत व्यवसाय वाढवत नेला.

आता त्यांनी पिठाच्या दोन गिरण्या घेतल्या आहेत. यातील एका गिरणीतून त्या उपवासाचे पीठ दळून देतात. आज संगीताताई आपल्या या व्यवसायातून चांगले उत्पन्न मिळवत आहेतच, पण त्यासोबतच त्या आता स्वावलंबी जीवन जगत आहेत. आता त्या लग्न सराईमध्ये लग्नाच्या बांगड्या भरण्याच्या ऑडर सुद्धा घेत आहेत. गटात आल्यामुळे वेळोवेळी मिळत गेलेली व्यवसायिक माहिती व आर्थिक पाठबळ यामुळे त्या एक यशस्वी महिला उद्योजक म्हणून नावारूपाला आल्या आहेत. परिवर्तनाकडून प्रगतीकडे असा त्यांचा प्रवास सुरु आहे. त्या आता तीस हजाराचे कर्ज घेऊन त्याची नियमित परतफेड करत आहेत.



| | |
|---|---|
| नाव | चित्रे राधा इंद्रजीत |
| गाव | वांगी |
| वय | ३५ वर्ष |
| शिक्षण | ७ वी |
| व्यवसाय | वीटभट्टी |
| बचत गट नाव | गोरोबाकाका समता महिला बचत गट |

**राधा इंद्रजीत चित्रे** या वांगी या गावात राहतात. यांचा व्यवसाय वीटभट्टीचा. परिस्थिती खूप नाजुक असल्यामुळे या वीटभट्टीवर स्वतः एकट्या काम करायच्या तर कधी कधी दोघंही नवरा–बायको काम करायचे. मजूर लावण्यासाठी पैसे नसायचे व मजूर लावले तर मजुराला कामाची मजुरी देण्यासाठी पैसे नसायचे. असे एक ना अनेक प्रश्न त्यांच्यापुढे होते म्हणून हे दोघेच घरच्या घरी काम करायचे. जवळपास तीन वर्ष दोघा नवरा बायको नेच घरच्या घरी वीटभट्टीवर काम करून व विटा विकू लागले. जसजसा विटा विक्री होऊ लागल्या तसतसा थोडा थोडा पैसा मागे पडू लागला. यातून मग एखाद दुसरा बाहेरचा मजूर लावून काम करून घेऊ लागले. वीटभट्टीचा व्यवसाय वाढवायची खूप इच्छा होती पण भांडवल नसल्यामुळे हा व्यवसाय ते वाढवण्याचा विचारही करू शकत नव्हते.

राधाताईच्या काही मैत्रिणी संक्रातीच्या वेळेला राधाताईच्या घरी आल्या तेव्हा गप्पा मारत असताना बचत गटाचा विषय निघाला. तेव्हा त्यांच्या मैत्रिणींनी सांगितले की, आम्ही स्वतः समता संस्थेच्या बचत गटात आहोत, तेव्हा तू ही या गटात ये आणि त्यांनी समताच्या कार्यकर्त्यांचा नंबर ताईंना दिला. मग या ताईंनी समताच्या कार्यकर्त्यांना बोलवून १० सभासदांचा गोरोबाकाका नावाचा नवीन बचत गट तयार केला. पहिले कर्ज समताकडून पाच हजार रुपयांचे भेटले तेव्हा यातून विटा बनवण्यासाठी लागणारी माती आणली व जास्त मजूर कामाला लावले. कामही वाढू लागलं अन गावाल्याच मजुरांच्या हाताला कामही भेटलं. आपले पाच हजार रुपये कर्ज त्यांनी फेडून दहा हजाराचं कर्ज घेतलं व तेही याच वीटभट्टीच्या व्यवसायात गुंतवले.समताकडून मिळत असलेल्या नियमित अर्थसहाय्यामुळे व्यवसाय वाढीसाठी मदत होत गेली. यातून मग कुटुंबाचा आर्थिक कणा मजबूत होत गेला. मुलांच्या शिक्षणाचा मार्गही सुकर होत गेला.

समताकडून पुन्हा वीस हजार रुपये कर्ज घेऊन त्यांनी वीट बनवण्यासाठी लागणारी पांढरी माती परळीहून आणली. आता हा व्यवसाय खूपच वाढला असून मुलगाही लातूर सारख्या शहरात हॉस्टेलवर राहून चांगले शिक्षण घेत आहे.आता चित्राताईच्या मुलीचेही लग्न झाले आहे. पुढे समताकडून तीस हजाराचं कर्ज घेऊन त्यांनी वीटभट्टीच्या व्यवसायामध्येच गुंतवलं आहे. त्यांचा व्यवसाय आता चांगला वाढला असून या व्यवसायामुळे त्यांची गावातील पतही खूप चांगली वाढली आहे.




| | |
|---|---|
| नाव | मंदाकिनी विष्णू खेत्रे |
| गाव | लिंबारुई, ता.जि. बीड |
| वय | ३५ वर्ष |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | शिवणकाम व भाजीपाला विक्रेता |
| बचत गट नाव | श्री संत सावतामाळी समता महिला बचत गट |

**मंदाकिनी विष्णू खेत्रे** या राहणार लिंबारुई ता.जि. बीड येथील असून श्री संत सावतामाळीसमता बचत गटाद्वारे समताच्या सभासद झाल्या. त्यांच्या कुटुंबात पती, दोन मुले व सासू असा परिवार आहे. गावात असणाऱ्या काही महिला बचत गटाच्या बैठका बघून त्यांना पण गटात येण्याचे मन करायचे. बचत कश्यासाठी करायची? गटाचे फायदे काय आहेत? असे अनेक प्रश्न घेऊन त्या गटात दाखल झाल्या. आज जवळपास चार वर्षे झाली त्या गटाच्या बैठकीला नियमित येतात. आपल्या संसारामध्ये आपण स्वकष्टाने कमावलेल्या पैशांचा कसा हातभार लावता येईल असे त्यांना सारखे वाटत रहायचे. दोघेही शेतीमध्ये काम करायचे पण शेतीचा पैसा शेतीलाच पुरत नव्हता त्यात आपल्या मुलांचे शिक्षण त्यांचे पुढचे भविष्य कसे जाणार याची सतत चिंता सतावत असे.

गटात आल्यावर त्यांनी पहिले कर्ज दहा हजार घेऊन त्याची शिलाई मशीन घेतली व ब्लाऊज शिवण्याचे प्रशिक्षण घेऊन ब्लाउज व साड्यांना पिको फॉल करू लागल्या. शेतीच्या कामातून जास्त वेळ मिळत नसे परंतु त्यांनी जिद्दीने रोजशेतातून संध्याकाळी घरी आल्यानंतर सर्व घरकामे आवरून हे काम करायच्या. दिवसभर शेतामध्ये भाजीपाला काढून तो रोज सकाळी मार्केटला द्यायचा व त्याच पैश्यांवर त्यांचे घर चालत असे. पण भाजीपाल्याला चांगला भाव मिळत नसल्याने पैसे कमी मिळायचे. पुढे त्यांनी दुसरे वीस हजार कर्ज घेतले त्यात स्वतःकडील काही पैसे टाकून स्टेशनरीचे छोटसे दुकान सुरु केल. जेव्हा त्या सावकाराकडून पैसे घ्यायच्या तेव्हा मनामध्ये एक भीती असायची पण आता मात्र तस काही होत नाही, कारण आता त्या जेव्हा समता बचत गटाचे कर्ज घेतात तेव्हा त्यांना असं वाटत की घरातीलच आपल्या माणसाकडूनच आपण पैसे घेत आहोत.

जेव्हा जेव्हा आम्ही गटाच्या बैठकीला एकत्र येतो तेव्हा तेव्हाआम्हाला कधीच असं वाटत नाही की दहा घरच्या दहा महिला आहोत म्हणून. गटाच्या बैठकीत जेव्हा आम्ही विविध विषयावर चर्चा करतो तेव्हा गटातील महिला मन मोकळे पणाने बोलताना एकमेकांचे सुख दुःख वाटून घेतात. आज त्यांच्याकडे तीस हजाराचे कर्ज असून ते मी माझ्या शेतातील विहीर खोदन्यासाठी वापरले आहे. समता संस्था ही फक्त कर्ज देण्यापूर्ती मर्यादित नसून महिलांना कुटुंबात आर्थिक साक्षर व स्वावलंबी करून समतेच्या वाटेवर घेऊन जाणारी संस्था म्हणून काम करते आहे. **तसेच समता हे सर्व काम करत असताना सर्वसमावेशक विचार व एकमेकाप्रती सहकार्याची भावना निर्माण करते.**



| | |
|---|---|
| नाव | सुजाता प्रशांत वासनिक |
| गाव | बीड |
| वय | ३५ वर्ष |
| शिक्षण | एम. ए. |
| व्यवसाय | कपड्याचे दुकान |
| बचत गट नाव | तथागत समता महिला बचत गट |

वर्ष २०१६ मध्ये सुजाताताई तथागत समता महिला बचत गटाच्या माध्यमातून समताच्या सभासद झाल्या. दरमहा दोनशे रुपयाने बचत करून सुरू झालेला बचत गट आजही नियमित सुरू आहे. समताच्या यशस्वी महिला उद्योजकापैकी एक असलेल्या सुजाताताईनी सुद्धा आपले सुरुवातीचे पाच हजाराचे कर्ज घेऊन आपल्या उद्योगाला सुरुवात केली. त्यांचा पहिला उद्योग म्हणजे लघुउद्योग! या उद्योगातून त्यांनी सर्वप्रथम घरगुती पापड, लोणचे, मसाले तयार करून विक्री करण्यास सुरुवात केली. अतिशय माफक किंमतीत त्या या सर्व वस्तु विकत व चविष्ट असल्यामुळे त्यांचा व्यवसाय वाढत गेला. पण फक्त यावरच न थांबता सुजाता ताईंनी पहिले कर्ज फेडून आपल्या दुसऱ्या कर्जातून महिलांना लागणारे सौंदर्य प्रसाधनातून तयार केलेले साहित्य विकण्यास सुरुवात केली. त्यात प्रामुख्याने कानातले, गळ्यातील हार, बिंदिया, कमरेचा पट्टा, पायातले, केसांचा जुडा इ. असे अनेक प्रकारचे प्रसाधने त्यांनी तयार करून सर्वच स्तरावरील महिलांना व परवडेल अश्या वाजवी दरात विकत गेल्या. या व्यवसायातून एक नवीन उद्योजक अशी त्यांची ओळख तयार होत गेली.

इथेही त्या थांबल्या नाहीत पुढे त्यांनी समताचे आणखी कर्ज घेऊन साड्या व इतर कपडे विक्रीचा व्यवसाय सुरू केला. महिलांना आवश्यक असलेले सर्व प्रकारचे कपडे त्या आपल्या घरगुती दुकानांमधून विकत आहेत. व्यवसायाला भांडवलाची, कष्टाची जोड त्या देत गेल्या. प्रत्येक व्यवसायातून घडत, शिकत त्या पुढे येत गेल्या. हा सर्व व्यवसाय सांभाळून त्या आपल्या कुटुंबाच्या जबाबदाऱ्यासुद्धा यशस्वीपणे सांभाळत आहेत. या व्यवसायामुळे त्यांच्या कुटुंबाला आर्थिक आधारही मिळत आहे. बचत गटाची नियमित बैठक, कर्जाची नियमित परतफेड व घेतलेल्या कर्जाचा योग्य ठिकाणी वापर त्यांनी केला. समताच्या विविध कार्यक्रम व मेळाव्यातून तसेच कार्यकर्त्या कडून मिळालेले मार्गदर्शन याचा त्यांनी त्यांच्या व्यवसायवाढीसाठी उपयोग करून घेतला. ताईंनी आता पन्नास हजार कर्ज घेऊन स्वत:चे कपड्यांचे दुकान सुरू केले आहे. घरगुती लघुउद्योग ते इथपर्यंतचा त्यांचा यशस्वी प्रवास आजपावेतो सुरू आहे. कुटूंबाची आर्थिक घडी बसवण्यास आपलाही हातभार लागत आहे याचा त्यांना अभिमान वाटतो. आर्थिक साक्षरतेतून सक्षमतेकडे जात असताना त्यांनी यासाठी घेतलेले कष्ट, नाविण्याचा ध्यास व त्याला पुढे घेऊन जाण्याची जिद्द यामुळे त्यांची प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे. समता महिला बचत गटामुळे त्यांच्यासह गटातील इतर महिलां देखील आर्थिक सक्षम झाल्या आहेत. तथागत बचत गटातील महिलांसह समताच्या इतर गटातील महिलाही आपले छोटे मोठे व्यवसाय करून व्यवसायिक बनत आपल्या पायावर स्वावलंबी जीवन जगत आहेत. या सर्व महिलांना समताचे आर्थिक पाठबळ वेळोवेळी मिळत असल्याने अनेक यशस्वी महिला उद्योजक म्हणून घडत आहेत.



| | |
|---|---|
| नाव | सीमा प्रवीण डोळसे |
| गाव | कृषी कॉलनी, बीड |
| वय | ३४ वर्ष |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | शिवणकाम, पार्लर, स्टेशनरी |
| बचत गट नाव | धनश्री समता महिला बचत गट |

मी **सीमा प्रवीण डोळसे** माझं माहेर कृषी कॉलनी बीड हे असुन माझे पती हे संभाजीनगर येथे खाजगी नोकरी करतात. कुटुंब बऱ्यापैकी मोठे असल्यामुळे नवऱ्याच्या पगारावर घर कसेबसे चालत होते. मला शिवणकाम चांगले जमत होते. लहानपणापासून बीडमध्येच राहत असल्यामुळे समता संस्थेच्या महिला बचत गटाबद्दल फक्त ऐकून होते. मला पण असं नेहमी वाटायचं की आपण पण एक बचत गट केला पाहिजे. आम्ही विश्वासातल्या ५ महिलांचा एक गट स्थापन केला. मला पहिले कर्ज दहा हजार रुपये मिळालं मी त्या पैशाची एक शिलाई मशीन विकत घेतली. शिवणकाम आधीपासून येत असल्यामुळे मी हळूहळू कामे घेऊ लागले. छोटा का होईना माझा व्यवसाय सुरु झाला. या छोट्या व्यवसायातून दोन पैसे मागे पडायला लागले.

जसजसा माझा व्यवसाय वाढत गेला तसतसा माझा आत्मविश्वास सुद्धा वाढत गेला. मी आता पिको फॉलची मशीन घेऊन माझ्या व्यवसायाचा विस्तार केला. घरातले छोटे मोठे खर्च व मुलांच्या शिक्षणाच्या गरजा मी माझ्या पातळीवर आता पुर्ण करू लागले. मी इथेच न थांबता पुढचे वीस हजाराचे कर्ज घेऊन स्टेशनरीचे साहित्य व ज्वेलरीचे दुकान टाकले. छोट्या छोट्या व्यवसायातून पुढे जाताना मी कष्टाने व जिद्दीने वाटचाल करते आहे. नवीन व्यवसायातून त्यांचा नफा दिवसेंदिवस वाढत असुन यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून कुटुंबाच्या महत्वाच्या आर्थिक गरजा भागवण्यास खूप मदत होत आहे. कर्जाचे हफ्ते नियमित फेडत पुढचे कर्ज घेऊन मी माझ्या याच व्यवसायात गुंतवत आहे व व्यवसाय वाढवत आहे.

आयुष्याच्या कठीण काळात समताचा आर्थिक आधार वेळोवेळी मिळत गेला. समताच्या सामाजिक भावनेतून सुरु असलेले काम माझ्यासारख्या असंख्य महिलांना स्वावलंबी व आत्मनिर्भर करण्यास महत्वाचे ठरत आहे. गेल्या अनेक वर्षापासून सुरु असलेल्या समताच्या कामाचा प्रभाव मी फक्त ऐकून होते पण आज प्रत्यक्ष अनुभवत आहे. माझ्यासारख्या असंख्य महिला आज समताच्या माध्यमातून छोटे छोटे उद्योग करत आहेत. महिला उद्योजगतेची माझी वाटचाल आजही निरंतर सुरु आहे. माझ्या गटातील इतर महिला सुद्धा छोटे मोठे व्यवसाय करत असुन आर्थिकदृष्ट्या सक्षम होताना दिसत आहे.



| | |
|---|---|
| नाव | बबिता रेणुकादास मुळे |
| गाव | भक्ती कॅन्स्ट्रक्शन, बीड |
| वय | ३४ वर्ष |
| शिक्षण | ५ वी |
| व्यवसाय | पिठाची गिरणी, स्टेशनरी, किराणा दुकान |
| बचत गट नाव | गिरीजा समता महिला बचत गट बीड |

**बबिता रेणुकादास मुळे** एक यशस्वी महिला उद्योजक म्हणून नावारूपाला येत असताना त्यांनी त्यांच्या कुटुंबात व आयुष्यात आलेल्या अनेक संकटावर व आव्हानांवर मात करत केलेला संघर्षाची ही कथा! कुटुंबात सासरे व त्यांचे पती हे दोघेच कमावणारे! कुटुंब तसे बऱ्यापैकी मोठे. बबिताताई, त्यांचे पती, एक मुलगा व सासू सासरे. कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाचा एक मार्ग बंद झाला कि, आर्थिक विवंचना डोके वर काढायला लागते. बबिताताईचे सासरे अचानक आजारी पडले ते कायमचेच अंथरुणाला खिळले. कुटुंबाचा सर्व आर्थिक भार त्यांच्या पतीवर आला. त्यांचे पती मार्केटिंगचे काम करायचे. सासऱ्यांच्या औषधोपचारावर बराच पैसा खर्च होत गेला. त्यातून कुटुंबाची घडी विस्कळीत होत गेली. अचानक त्यांच्या पतीना अर्धांगवायूचा झटका आला व त्यात त्यांचा एक हात निकामी झाला व मागोमाग त्यांच्या सासऱ्यांचे निधन झाले. पतीला सुद्धा अर्धांगवायूचा पुन्हा झटका आला अन् ते कायमचे अंथरुणात पडले व काही काळातच त्यांचेही निधन झाले. आता कुटुंबाचा सारा भार बबिताताईवर येऊन पडला. या काळात त्यांनी स्वतःमध्ये असलेल्या कलागुणांना व्यवसायात परिवर्तीत करून स्वतःच्या पायावर उभे राहण्यास सुरुवात केली.

सर्वप्रथम त्यांनी जवळ असलेल्या पैश्यातून महिलांसाठी साड्या, आर्ट ज्वेलरी, स्टेशनरी खरेदी करून त्यांची आपल्या घरातूनच विक्री करण्यास सुरुवात केली. यातून त्यांना थोडे पैसे मिळू लागले त्याचा थोडा आधार तर मिळत गेला पण कुटुंबाच्या गरजा भागवणे शक्य होत नव्हते. या छोट्याश्या व्यवसायातून महिलांच्या ओळखीतून त्या समता संस्थेच्या महिला बचत गटाच्या सभासद झाल्या व पहिले कर्ज पाच हजार घेऊन त्यांनी शिलाई मशीन घेऊन शिवनकाम सुरु केले. पुढे त्यांनी दुसरे दहा हजाराचे कर्ज घेऊन पिको फॉल मशीन खरेदी करून व्यवसायाची गती वाढवली. पुढे त्यांनी आपल्या सासुबाईंचेही नाव गटात दाखल करून घेतले व दोघींच्या नावावर तीस हजाराचे कर्ज घेऊन एक छोटेसे किराणा दुकान टाकले. आज त्यांचे छोटेसे कुटुंब अनेक अडचणीवर मात करत उभे राहिले आहे. बबिताताईचा एकमेव आधार असलेल्या आपल्या मुलाला त्या चांगले शिक्षण देऊ लागल्या आहेत. अतिशय कष्टाने व जिद्दीने त्यांनी आयुष्याची लढाई लढली व या लढाईतून त्या घडल्या व एक यशस्वी महिला उद्योजक म्हणून नावारूपाला आल्या. ताई पुढे सांगतात माझ्या आयुष्यात आलेल्या या बिकट प्रसंगात मला कोणीही जवळच्यानी काहीच मदत केली नाही. माझे पती वारल्यानंतर त्यांचे श्राद्ध घालण्यासाठी सुद्धा माझ्याकडे पैसा नव्हता. त्यावेळेस समता माझ्या पाठीशी खंबीर उभी राहिली. त्यांनी कोणताही विचार न करता मला तीस हजाराचे कर्ज देऊन मला मदत केली, असे बबिताताई सांगतात. आज त्या यशस्वी महिला उद्योजक म्हणून स्वावलंबी झाल्या आहेत. समता सोबतचा त्यांचा प्रवास आजही सुरु आहे आणि पुढेही राहील, असे त्या अभिमानाने सांगतात.



| | |
|---|---|
| नाव | काळे संगीता प्रकाश |
| गाव | बीड |
| वय | ४० वर्ष |
| शिक्षण | १२ वी |
| व्यवसाय | शिलाई काम/मसाले तयार करणे |
| बचत गट नाव | गौरवी समता महिला बचत गट बीड |

मी **संगीता प्रकाश काळे** माझे माहेर रायमोह. मी आई-वडिलांची एकुलती एक मुलगी खूप लाडात वाढलेली. आई-वडिलांनी खूप धुमधडाक्यात लग्न लावून दिले. आडगाव माझं सासर लग्न झाल्यानंतर काही वर्षांनी वडील वारले वडिलांची मी एकुलती एक मुलगी असल्यामुळे माझी आई नेहमी माझ्याकडे ये जा राहते. मुलांच्या शिक्षणासाठी आम्ही बीडमध्ये रहायला आलोत.

माझे पती एसटी महामंडळामध्ये नौकरीला आहेत. पतीला पगार कमी असल्यामुळे घरात नेहमी पैशाची कमतरता भासायची. वर्ष २०१६ मध्ये मी समताच्या गौरवी समता महिला बचत गटामध्ये दाखल झाले. गटातून दहा हजार रुपये कर्ज घेऊन मी सर्वप्रथम शिवणकामाचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षण पुर्ण होताच एक शिलाई मशीन घेऊन घरातील स्वतःचे व इतर कपड्यांचे शिवणकाम करून सराव केला. शिवणकामात चांगला हात बसल्यावर मी बाहेरची कामे घेण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर शिवणकाम करत करत मिळालेल्या वेळेत घरगुती मसालेही करून विकू लागले. माझे हे व्यवसाय चांगला चालू असताना अचानकच माझे आजारपण उद्भवले. ऑपरेशन करूनही माझा आजार बरा झाला नाही त्यामुळे पुन्हा ऑपरेशन करावे लागले. दुखण्यात झालेला खर्च व त्यातून बरे होण्यात गेलेला वेळ याने माझ्या व्यवसायाची घडी पुर्णपणे विस्कटली. पण पुन्हा न डगमगता मी माझा व्यवसाय पुन्हा उभा केला.

विस्कटलेल्या व्यवसायाची पुन्हा घडी बसवण्यासाठी भांडवलाची गरज असताना मी समता संस्थेकडून वीस हजाराचं कर्ज घेऊन पिको फॉलची मशीन खरेदी केली. मी व्यवसायात पुन्हा झेप घेतली. आज माझ्या या व्यवसायातून माझा घर खर्च व मुलांचे शिक्षण खूप यशस्वीरित्या पार पाडत आहे. माझी दोन्ही मुले आज चांगले व उच्च शिक्षण घेत आहेत. या व्यवसायामुळे माझ्या कुटुंबाला आर्थिक बळ मिळत गेले. आता मी समताचे पन्नास हजाराचे कर्ज घेऊन याच व्यवसायात गुंतवल्यामुळे माझा व्यवसाय दिवसेंदिवस वाढतो आहे. दुसरीकडे पतीचा पगारही वाढला आहे. आता आम्ही स्वतःचे घर घेतले असुन यात सुद्धा आम्हाला समताची आम्हाला आर्थिक मदत झाली.



| | |
|---|---|
| नाव | केंगार अरुणा अनिल |
| गाव | मुर्शदपूर |
| वय | २६ वर्ष |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | शेती आणि शेळीपालन |
| बचत गट नाव | सुप्रिया समता महिला बचत गट |

मी **अरुणा अनिल केंगार** मुर्शदपुर आमच एकूण आठ जणांचे मोठं कुटुंब आहे. माझे पती व दिर मिस्तरी काम करतात तर मी व माझी लहानी जाऊ शेती करतो. मी गेल्या नऊ वर्षापासून सुप्रिया समता महिला बचत गटांमध्ये असुन बचत गटामध्ये आल्यामुळे बचतीची सवय लागली, गटाच्या नियमित होणाऱ्या बैठकामधून पैसा कसा येतो व कसा जातो याचे महत्व कळू लागले. म्हणतात ना मध असेल तर माशा गोळा होतात तसेच पैसा असेल तर सगळे नातेवाईकही जवळ येतात. आमची परिस्थिती खाऊन पिऊन जेमतेम असायची. आम्ही समता संस्थेकडून कर्ज घ्यायला सुरुवात केली. समताच्या आर्थिक मदतीमुळे कुटुंबाच्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी आम्हाला कधी सावकाराच्या दारात जायची गरज पडली नाही.

आम्ही जेव्हा समताच्या कार्यक्रम, मेळाव्यात सहभागी होऊ लागलो. यातून आम्हाला स्वतःचे उद्योग सुरू करण्याची प्रेरणा मिळत गेली. शेतीला जोडून कोणता व्यवसाय करावा याचा विचार केला अन शेळी पालन करण्याचे ठरवले. समताच्या आर्थिक मदतीमुळे आम्ही शेळीपालन हा व्यवसाय चालू केला. शेळीपालन अन शेतीच्या उत्पन्नाची घडी नीट बसल्यावर समताकडून चाळीस हजाराचे कर्ज घेऊन एक गाय घेतली. शेतीला शेतीपूरक व्यवसायाची साथ मिळत गेली अन कुटुंबाची आर्थिक स्थिती स्थिर होत गेली. शेळीपालन व दुग्ध व्यवसाय आजही सुरळीत चालू असुन समताच्या आर्थिक पाठबळामुळे हि मजल मारणे शक्य झाले आहे.

आज माझी सुप्रिया महिला बचत गटांमध्ये जवळजवळ पंधरा हजार रुपये बचत जमा असुन समताने आमच्यावर फक्त कर्जाचं ओझ न टाकता आम्हाला दोन पैसे मागे टाकण्याची शिस्तही लावली आहे. आपण सुद्धा एक उद्योजक होऊ शकतो हा आत्मविश्वास समताने आमच्यात निर्माण केला आहे. मी माझे आधीचे कर्ज फेडून पुढचे कर्ज घेऊन याच व्यवसायात गुंतवून व्यवसाय अजून वाढवणार आहे.



| | |
|---|---|
| नाव | जाधव सुनीता संतराम |
| गाव | जाधववाडी, ता.जि. बीड |
| वय | ३८ वर्षे |
| शिक्षण | ५ वी |
| व्यवसाय | म्हैसपालन व शेळीपालन |
| बचत गट नाव | नगदनारायण समता महिला बचत गट |

**जाधव सुनीता संतराम** माझे गाव जाधववाडी असुन घरची परिस्थिती खूप हलाकीची होती जमीनही थोडी ती सुद्धा सासऱ्याच्या नावावर. आम्ही दोघे नवरा-बायको दुसऱ्याच्या इथे शेतात कामाला जात होतो व मुलेही लहान होते त्यामुळे घर खर्च भागत होत. मुले जसजसी मोठी होत गेली तस-तसा खर्च वाढू वाढत गेला पण मुलांचे शिक्षण, घर खर्च भागवायचा कसा हे आमच्या पुढे आव्हानच होते. मला नेहमी असं वाटायचं की, संघर्ष हा माझ्या पाचवीलाच पुजलेला आहे की काय? माझं शिक्षण फक्त पाचवीपर्यंत झाल्यामुळे मी ही काही करू शकत नव्हते. मी शिकले नाही म्हणून माझ्या मुलांना खूप शिकवायचं ही माझी इच्छा होती पण शिक्षणासाठी पैसाच लागतो.

एक दिवस मला आमच्या गावातील महिलांकडूनच समता पतसंस्थेची माहिती मिळाली. अगोदरच गावात बचत गट झाला आहे हे मला माहीतच नव्हतं. महिलांनीच मला सांगितलं की समता पतसंस्था ही फक्त महिलांच्या बचत गटासाठीच काम करते. पुढे मी २०१५ मध्ये त्याच महिलांनी केलेल्या नगदनारायण या समताच्या बचत गटाची सभासद झाले. बचत गटात आले तर खरं पण कधी कधी शंभर रुपये ही भरण्यासाठी नसायचे. मला बचत गटात आल्यावर सहा महिन्यांनी समता पतसंस्थेकडून कर्ज मिळाले कर्ज मिळाल्यावर विचार केला जर हे पैसे आपण घरात खर्चले तर कर्जाचा हप्ता भरणार कुठून! म्हणून मी एक शेळी घेण्याचं ठरवलं आणि शेळी घेतली. आम्ही दुसऱ्याच्या इथं कामाला जात असलो तरी ही शेळी सांभाळली आणि शेळ्या वाढवत नेल्या.

कालांतराने आम्ही दुसऱ्याकडे कामासाठी जाणं कमी केलं व पुन्हा समताकडून दहा हजाराचे कर्ज घेतलं व त्याची एक गाय घेतली. माझी बचत गटात आणि समता संस्थेमध्ये पत निर्माण झाली कर्ज वाढतच गेलं. आज आम्ही पाच हजाराहून चाळीस हजाराचा कर्जाचा टप्पा पार केला आहे. घेतलेल्या या कर्जातून कधी शेळ्या तर कधी म्हशी घेत गेलो व व्यवसाय वाढवत गेलो. आमच्याकडे आज घडीला दोन गाई, चार म्हशी, दोन शेळ्या असे पशुधन आहे. या व्यवसायात माझ्यासह माझी पती मला मदत करतात. या दुग्ध व्यवसायातून आम्ही बनवलेले दही, तूप विकण्यासाठी जाधववाडी वरून जवळच काही अंतरावर असलेल्या बीड शहरामध्ये यावं लागत. आमच्या या शेतीपूरक व्यवसायातून आम्हाला मासिक चांगले उत्पन्न मिळत असुन मुलांच्या शैक्षणिक गरजा पण पुर्ण करण्यास सुद्धा मदत होते आहे. समताच्या वेळोवेळी दिलेल्या आर्थिक पाठबळामुळे आम्ही हे सर्व करू शकलो आहे.



| | |
|---|---|
| नाव | शैला प्रेमदास केंगार |
| गाव | मुर्शदपूर, ता.जि. बीड |
| वय | ४० वर्षे |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | शिवणकाम व शेळीपालन |
| बचत गट नाव | नरसूबाबा समता महिला बचत गट |

मी **शैला प्रेमदास केंगार** राहणार मुर्शदपूर. गेल्या अकरा वर्षापासून नरसुबाबा समता महिला बचत गटामध्ये आहे. आजच्या घडीला या बचत गटाची मी अध्यक्ष आहे. मी बचत गटात असावी अशी माझ्या पतीची व माझी इच्छा होती म्हणून त्यांनी माझं नाव या बचत गटात टाकलं होतं ते स्वतः टेलर काम करत होते. मी बचत गटात नको म्हणत असतानाही ते म्हणाले कधी अडीअडचणीला हा बचत गट आपल्या कामाला येईल. बचत गटात आल्यामुळे आम्हाला दर महिन्याला नियमित बचत करण्याची सवय लागली. आम्ही आमच्या कुटुंबाच्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी या पतसंस्थेकडून पाच हजार रुपये कर्ज घेऊन ते नियमित परतफेडही केले होते.

वर्ष २०१३ मध्ये काही आर्थिक अडचणीमुळे माझ्या पतीचे निधन झाले. माझ्या संसाराची सगळी घडीच विस्कटली गेली. चार जणांच्या कुटुंबाची जबाबदारी माझ्या एकटीवर येऊन पडली. जोपर्यंत पती होते तोपर्यंत मी कोणतच काम केलं नव्हतं. माझे शिक्षणही कमी असल्यामुळे घराच्या बाहेरही कधी पडले नव्हते. अश्या या बिकट काळात बचत गटाचा मला खूप मोठा आधार भेटला. कधी मुलांच्या शिक्षणासाठी तर कधी घरातल्या अडीअडचणीसाठी समता संस्थेकडून मला वेळोवेळी कर्ज मिळत गेले. गटाच्या बैठकीमध्ये सर्व शासकीय योजनेची आम्हाला माहिती मिळत होती. समताने माझ्या मुलांच्या शिक्षणासाठी दोन वर्ष अन्नपूर्णा शैक्षणिक शिष्यवृत्ती सुद्धा दिली होती. कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी मी मुर्शदपूरच्या जगताप वस्तीवरील अंगणवाडीत मदतनीस म्हणून कामाला लागले. तिथे मानधन कमी असल्यामुळे त्या मानधनावर घर खर्च व मुलांचा शिक्षणाचा खर्च भागत नव्हता. तेव्हा काहीतरी जोड धंदा करण्याची गरज भासू लागली.

माझ्या घरात शिलाई मशीन होतीच मग मी समताच दहा हजार रुपये कर्ज घेऊन शिवणकामाचे प्रशिक्षण घेतले व काही पैसे मुलांच्या शिक्षणासाठी वापरले. आता मी शिवणकामाला सुरुवात केली असुन पुन्हा समताचे तीस हजार रुपये कर्ज घेऊन शेळीपालन देखील सुरू केले आहे. या शेळीपालनमुळे माझ्या उत्पन्नात भर पडत गेली. मी आजही शेळ्यासाठी शेतातून डोक्यावर गवताचं गाठोड आणते. शेळ्यांची संख्या वर्षाला वाढते पण मला वेळ नसल्यामुळे सांभाळणं होत नाहीत म्हणून मी ते छोटे छोटे बोकडाचे पिल्ले विकून टाकते. आता मी समता कडून पन्नास हजार रुपयांचं कर्ज घेऊन शेळीपालन व्यवसायाच्या उत्पन्नातून जमवलेले काही पैसे टाकून एक सिमेंटची रूम बांधली. एकटीच्या जीवावर कुटुंबाची जबाबदारी पार पाडणे हा फार मोठा संघर्ष माझ्या वाट्याला आला पण तो समतामुळे थोडा सुसह्य झाला. आमच्या गरजा अडीअडचणी समजून घेऊन प्रत्येक वेळी आमच्यासाठी समताने मदतीचा हात पुढे केला. त्यामुळे समता परिवाराचा आम्हाला नेहमीच आधार वाटतो.



| | |
|---|---|
| नाव | शबाना मुख्तार शेख |
| गाव | जाधववाडी, ता.जि. बीड |
| वय | ४० वर्षे |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | साडीवरील आरीवर्क |
| बचत गट नाव | रेहान समता महिला बचत गट |

**शबाना मुक्तार शेख** यांचे शिक्षण दहावी पर्यंतचे. लग्न होऊन सासरी आल्यावर त्या बीड येथे स्थायिक झाल्या. वर्ष २०११ मध्ये रेहान समता महिला बचत गटातून त्या समताच्या सभासद झाल्या. बचत गटाच्या नियमित होणाऱ्या बैठकाना त्या आवर्जून उपस्थित रहायच्या. नियमित बचत व कर्ज परतफेड यातून त्या गेल्या सहा वर्षापासून गटाच्या आता अध्यक्ष बनल्या आहेत. सुरुवातीपासूनच शिवणकामाची आवड असल्यामुळे त्यांनी हाच व्यवसाय म्हणून निवडला. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सामान्यच असल्याकारणाने त्या या व्यवसायात जास्त वेळ देऊ शकत होत्या. पाच हजाराच्या कर्जापासून सुरु झालेला त्यांचा प्रवास आज पन्नास हजाराचे कर्ज घेऊन सुरूच आहे. समताचे वेळोवेळी घेतलेले कर्ज त्यांनी कधी कुटुंबाच्या अत्यावश्यक गरजासाठी तर कधी आपल्या व्यवसायासाठी वापरले. शिवणकामापासून सुरु झालेला त्यांचा व्यवसाय त्या टप्याटप्याने वाढवत गेल्या. आता त्यांनी त्यांचे पुर्ण लक्ष कपड्याच्या व्यवसायावर केंद्रित केले आहे. साड्यांवर आरीवर्कचे काम त्या खूप चांगले करतात. यासाठी लागणारे साहित्य त्यांनी समताकडून घेतलेल्या कर्जातून खरेदी केले आहे.

बचत गटात आल्यामुळे महिला जोडत जाऊन त्यांच्या ओळखी वाढत गेल्या. याचा फायदा त्यांना व्यवसाय वाढीसाठी होत गेला. त्यांनी तयार केलेल्या आरीवर्कच्या साड्यांची महिलांमध्ये खूप मागणी असुन त्यांना याच्या भरपूर ऑर्डर नियमित भेटत असतात. बीड शहरातही त्या बऱ्याच नामांकित दुकानाला या साड्या विक्रीसाठी देत असतात. इथेच न थांबता त्यांनी आता आरीवर्कचे प्रशिक्षण वर्ग सुद्धा सुरु केले आहे. या प्रशिक्षण वर्गातून त्या असंख्य महिलांना शिकवत आहेत. उत्पन्नाचे विविध मार्ग त्यांनी याच व्यवसायातून उभे केले. आज त्यांचे मासिक उत्पन्न पंचवीस हजाराच्या घरात पोहोचले आहे. व्यवसायाची आवड व त्यातील सातत्य राखत त्या जिद्दीने एक यशस्वी महिला उद्योजक म्हणून नावारूपाला आल्या आहेत. समताच्या सहकार्यामुळे व आर्थिक पाठबळामुळे त्या आजही समतासोबत जोडून आहेत.




| | |
|---|---|
| नाव | नागरगोजे ज्योती प्रभाकर |
| गाव | वडगाव–गुंधा, ता.जि. बीड |
| वय | ४० वर्षे |
| शिक्षण | १२ वी |
| व्यवसाय | पिठाची चक्की व शिलाई मशीन |
| बचत गट नाव | संतोषीमाता समता महिला बचत गट |

२०११ पासून संतोषीमाता समता महिला बचत गट, वडगाव–गुंधा, बीडच्या सभासद असलेल्या **ज्योती प्रभाकर नागरगोजे** यांचा महिला उद्योगजगतेचा प्रवास इतर महिलांना प्रेरणा देणारा आहे. शिलाईकाम आधीपासूनच त्यांना येत होते. पण सासरी आल्यापासून कुटुंबाची जबाबदारी पडल्यामुळे त्यांचे या कामाकडे काही काळ दुर्लक्ष झाले. पण बचत गटात आल्यानंतर गटातील कर्ज घेऊन त्यांनी एक शिलाई मशीन खरेदी केली. हळूहळू त्यांनी गावातील शिवणकाम करून देण्यास सुरुवात केली. बघताबघता दोन पैसे मागे पडत गेले व कामाचा आवाकाही वाढत गेला. पुढे त्यांनी कर्ज घेऊन पिको फॉलची मशीन घेतली. एकीकडे शेतीतील कामे व दुसरीकडे शिवणकाम असे त्यांचे कामाचे चक्र सुरु झाले. या व्यवसायातून येणाऱ्या उत्पन्नातून कुटुंबाच्या छोट्या छोट्या गरजा त्या भागवत गेल्या.

या व्यवसायाच्या ओळखीतून त्यांना महिलांच्या गरजा कळत गेल्या. गावात पिठाच्या गिरण्याचे प्रमाण कमी होते हे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी समताचे कर्ज घेऊन एक पिठाची गिरणी खरेदी केली. नव्या व्यवसायामुळे त्यांना उत्पन्नाचा अजून एक मार्ग भेटला. शिवणकाम, शेती, गिरणी असा त्यांचा व्यवसाय सुरु झाला. आयुष्यात येणाऱ्या अनेक अडचणीवर मात करत त्यांनी इथपर्यंतचा पल्ला गाठला आहे. गिरणीच्या कामातून त्या रोज तीनशे ते चारशे रुपये कमावत आहेत. आधीच्या व्यवसायाला नव्या जोडधंद्याची जोड त्यांनी दिली.



समता घेत असलेल्या विविध कार्यक्रम, मेळावे व शिबीर यांना त्या उपस्थित असतात. यात भेटलेले व्यवसाय मार्गदर्शन तथा इतर उद्योजक महिलांच्या चर्चा व त्यांच्याशी झालेली माहितीची देवाणघेवाण यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढत जाऊन छोटे छोटे व्यवसाय करण्यास सुरुवात केली. आजही त्यांचा बचत गट नियमित सुरु असुन त्यांनी आता तीस हजाराचे कर्ज घेतले आहे. गटाची नियमित होणारी बैठक व या बैठकीत केलेली नियमित बचतीमुळे त्यांची आज बचतही चांगली जमा झाली आहे.



| | |
|---|---|
| नाव | शृंगारे ललिता नागेश |
| गाव | भक्ती कंट्रक्शन, बीड |
| वय | ४५ वर्ष |
| शिक्षण | ९ वी |
| व्यवसाय | ज्वेलरी, बांगड्यांचे दुकान |
| बचत गट नाव | अरिहंत समता महिला बचत गट |

**ललिता नागेश शृंगारे** या बीडच्या रहिवाशी असुन त्यांचे सासर म्हणजे भक्ती कन्स्ट्रक्शन बीड. कुटुंबात पती व दोन मुले असा त्यांचा परिवार. त्यांच्या पतीचा गावोगावी जाऊन बांगड्या भरण्याचा व्यवसाय. साहजिकच घरात येणारे उत्पन्न हे अनिश्चित व त्यातून होणारी आर्थिक ओढाताण स्वस्थ बसू देणारी नव्हती. आला दिवस फक्त पुढे ढकलणे एवढ्यापुरते आयुष्य मर्यादित झाले. आर्थिक उत्पन्नाचा मार्ग शोधावा लागतो अन तो आपल्या आजूबाजूलाच असतो ज्याला भेटला त्याचा प्रवास सुरु होतो. असाच मार्ग ललिता ताईना भेटला! जेवणाचे डबे करून देण्याचा झाले घरातून जेवणाचे डबे देण्याचे काम त्यांनी सुरु केले. पण हे काम त्या जास्त काळ करू शकल्या नाहीत. या कामात मिळत असेलेला प्रतिसाद कुटुंबाची आर्थिक घडी बसवण्यासाठी अपुरा पडत होता. पुन्हा एकदा जुन्या व्यवसायाकडे वळावे लागले. घराच्या लगत एक दुकान भाड्याने घेऊन तिथे बांगड्यांचे दुकान टाकले. पती गावोगावी जाऊन बांगड्या भरायचे तर ललिताताई दुकानात बसून. दुकानात माल जास्त नसल्याकारणाने म्हणावे तसे चालत नव्हते. यातूनच मग त्यांच्या पतीने खाजगी नोकरी करण्याचा मार्ग निवडला.

पुढे ललिताताई यांना समता महिला बचत गटाबद्दल माहिती मिळाली. व्यवसायाला भांडवलाची गरज होती अन हे भांडवलासाठी बचत गटाची गरज होती. बचत गटाचे महत्व कळून त्यांनी लगेचच एक अरिहंत नावाचा बचत करून समता संस्थेला जोडला. गटाचे कर्ज घेऊन त्यांनी त्यांच्या दुकानात विविध डिजाईनच्या बांगड्याचा माल भरला. आता पहिल्यापेक्षा दुकान बरे चालू लागले होते. मासिक उत्पन्नात वाढ झाल्यामुळे बचत गट कर्जाचे हफ्ते व कौटुंबिक आर्थिक गरजा बऱ्यापैकी पुर्ण होऊ लागल्या. पहिले कर्ज फिटले कि, दुसरे कर्ज घेत त्या आपल्या दुकानात माल वाढवू लागल्या. आजघडीला त्यांच्या दुकानात बांगड्या भरण्यासाठी चांगली गर्दी होत आहे. त्या इथेच थांबल्या नाहीत तर त्यांनी याच दुकानात स्टेशनरी समान आणून विकण्यास सुद्धा सुरुवात केली आहे. याचा फायदा त्यांना कुटुंबाची आर्थिक घडी बसवण्यासाठी तर झालाच व मुलांना उत्तम शिक्षण देण्यासाठी सुद्धा झाला. आजही त्यांचा गट नियमित सुरु असुन त्या त्यांना हवे तेव्हा कर्ज घेऊन आपल्या या व्यवसायात गुंतवतात.



| नाव | सोनाली शशिकांत आगळे |
|---|---|
| गाव | तिरुपती नगर, बीड |
| वय | ३५ वर्ष |
| शिक्षण | ९ वी |
| व्यवसाय | पिठाची गिरणी व शेवया करणे |
| बचत गट नाव | -- समता महिला बचत गट |

**सोनाली शशिकांत आगळे** या आपले पती व एक मुलीसह येलमघाट येथे राहत. त्यांच्या पतीचे येलमघाट येथे इलेक्ट्रॉनिकचे दुकान आहे पण आर्थिक अडचणीमुळे त्या बीडमध्ये येऊन कुटुंबासह स्थायिक झाल्या. बचत गटाच्या माध्यमातून त्या समताच्या सभासद झाल्या. बचत गटातून मिळणाऱ्या छोट्या छोट्या कर्जातून महिलांनी काही छोटे व्यवसाय करत करत स्वावलंबी व्हावे असे समताचे कार्यकर्ते बचत गटाच्या बैठकीतून सभासदांना सातत्याने सांगत असतात. सोनालीताईनी हि गोष्ट लक्षात ठेऊन आपले पहिले कर्ज घेऊन व स्वतःकडील काही पैसे टाकून सर्वप्रथम एक छोटीशी पिठाची गिरणी घेतली. पिठाच्या गिरणीतून मिळणाऱ्या पैश्यातून कुटुंबाला त्यांचा थोडाफार हातभार लागत होता. गिरणीचे नियमित उत्पन्न सुरू झाले त्यातून घेतलेल्या कर्जाचे हफ्ते भरणे सुद्धा सुरू झाले. पुढचे कर्ज घेऊन त्यांनी शेवया बनवण्याची मशीन खरेदी केली. आधीच्या व्यवसायाला नवीन व्यवसायाची जोड दिली. मिळणाऱ्या मासिक उत्पन्नात आता भर पडली. याचबरोबर मुलांच्या शैक्षणिक गरजा भागू लागल्या. आजूबाजूच्या परिसरातून त्यांना भरपूर कामे भेटू लागली. हळूहळू व्यवसायात जम बसत गेला.

आजघडीला छोट्याश्या पण दैनंदिन गरजेला आवश्यक असणारा व्यवसाय त्या करत आहेत. आपले चालू कर्ज फेडून त्या आता मिरची कांडण मशीन घेणार असून आपला व्यवसाय वाढवणार आहेत. समताच्या कर्जाची नियमित परतफेड त्या करतच आहेत. त्याचबरोबर त्यांनी मुलीच्या भविष्याची तरतूद म्हणून समतामध्ये आपल्या मुलीच्या नावाने कन्यारत्न ठेव योजनेत दरमहा बचतीचे आर.डी. खाते सुद्धा उघडले असुन त्यात त्यांनी आतापर्यंत तीस हजाराच्यावर बचत जमा केली आहे. आर्थिक साक्षरतेकडून स्वयंपूर्ततेकडे असा त्यांचा प्रवास चालू आहे. आज दोघेही पती पत्नी खांद्याला खांदा लाऊन कुटुंबाचा गाडा यशस्वीपणे पुढे घेऊन जात आहेत.



| | |
|---|---|
| नाव | निकिता दीपक आगळे |
| गाव | सराफ लाईन धोंडीपुरा, बीड |
| वय | ३६ वर्ष |
| शिक्षण | १२ वी |
| व्यवसाय | शिवणकाम, लेडीज वेअर |
| बचत गट नाव | रेणुका माता समता महिला बचत गट |

**निकिता दीपक आगळे** या अतिशय सर्वसामान्य कुटुंबातल्या. पती व सासरे हे दुसऱ्याच्या दुकानावर कामाला त्यांच्या पगारातून घर चालते. पोटापाण्याच्या सोयीपुरता घरात पैसा तर येत होता पण अचानक एखादे आलेले आजारपण याने कुटुंबाची आर्थिक घडी अक्षरशः विस्कळीत होऊन जायची. त्यात पुन्हा मुलांचे शिक्षण व त्यांच्या भविष्याची करावी लागणारी तरतूद त्यांना चिंतीत करायची. असे असंख्य प्रश्न समोर असताना आपणही कुटुंबाला हातभार लागेल असे एखादे काम करावे वाटत होते पण काय करावे हे सुचत नव्हते. शिवणकामाची आवड असल्यामुळे त्यांना शिवणकाम चांगले जमत होते. एक दिवस त्यांना शेजारील ताईकडून बचत गटाविषयी माहिती मिळाली. समताच्या कार्यकर्त्यांना भेटून त्यांनी त्यांचा नवीन बचत गट तयार केला. गटात आल्यानंतर त्यांनी पहिले कर्ज घेऊन शिलाई मशीन व पिको फॉल मशीन घेऊन व्यवसायाला सुरुवात केली. अतिशय उत्साहाने सुरु केलेल्या व्यवसायाचा आनंद तर होताच पण हा व्यवसाय त्यांनी चांगला चालवत ठेवला पुढे नेला. एका बाजूला व्यवसाय व दुसऱ्या बाजूला कर्जाची नियमित परतफेड त्या करू लागल्या. प्रतिकूल परिस्थितीतून बाहेर येऊन त्यांनी चांगले व्यवसायात चांगली गती घेतली. या व्यवसायातून त्यांनी महिलांच्या गरजा ओळखून आपले आधीचे कर्ज फेडून पुढचे कर्ज घेत साड्या व कपडे यांचा माल खरेदी करून आपल्या घरातच छोटे दुकान उघडले. महिलांचा जसजसा प्रतिसाद मिळत गेला तसतसा त्यांनी पुढचे कर्ज घेत आणखीन माल खरेदी करून व्यवसाय वाढवत नेला.

त्यांना या व्यवसायातून कुटुंबाची आर्थिक घडी बसण्यास मदत होत आहे. असंख्य प्रश्नांनी चिंतीत असलेल्या निकिताताई आज स्वावलंबी होण्यासाठीची एक एक पायरी चढत पुढे जात आहेत. समता बचत गट बैठकामधून महिलांना आर्थिक साक्षर करण्यासह व्यवसाय मार्गदर्शन यातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांचा पाया भक्कम करून त्यांना सातत्याने उभी करत आहे. समताने नेहमीच महिलांना आहे त्या परिस्थितीतून लढण्यासाठीची सकारात्मक उर्जा दिली आहे. यासाठी घेण्यात येणारे विविध कार्यक्रम, मेळावे हे त्यांना केंद्रस्थानी ठेऊन आखले जातात. बचत गट पुरस्कार, उद्योजक महिला पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला जातो व त्यांच्यात असणारा अत्मविश्वास वाढवला जातो. निकिताताई आता त्यांच्या व्यवसायात चांगल्या स्थिर झाल्या आहेत. जेव्हा कर्जाची गरज असते तेव्हा त्या कर्ज घेऊन आपल्या व्यवसाय वाढीसाठी त्याचा वापर करतात. एक यशस्वी महिला उद्योजक म्हणून त्या नावारूपाला आल्या आहेत. आजही त्यांच्या गटाची नियमित बैठक होत असुन महिला बचत, कर्ज हफ्ते नियमित भरत असुन आपल्या कुटुंबाच्या व्यापातून काहीवेळ गप्पा, चर्चा यात मनमोकळेपणाने सहभागी होतात.




| | |
|---|---|
| नाव | राधा बाळू शेळके |
| गाव | मैंदा, ता.जि. बीड |
| वय | ३६ वर्ष |
| शिक्षण | १२ वी |
| व्यवसाय | शिवणकाम व किराणा दुकान |
| बचत गट नाव | पांडुरंग समता महिला बचत गट |

मी **राधा शेळके** राहणार मैदा गावची असुन मला शिवणकाम चांगले करता येते. गावांमध्ये बचत गटांची संख्या हळूहळू वाढत होती. यातच मी सुद्धा बचत गटाचा भाग बनले. मी एक नवीन दहा जणींचा पांडुरंग नावाचा बचत गट तयार केला व समाताची सभासद झाले. सुरुवातीचे पाच सहा महिने गट सुरळीत चालल्यानंतर मी गटातून कर्ज घेतले. घेतलेल्या कर्जातून एक शिलाई मशीन घेऊन त्याला लागणारे साहित्य खरेदी केले व शिवनकामाचे काम सुरु केले. गावातील छोटी छोटी शिवनकामे करायला सुरुवात केली व त्याचबरोबर मुलींचे शिवन क्लास सुद्धा घ्यायला लागले. या दोन्ही कामातातून थोडेफार उत्पन्न मिळू लागले. या कामातून जास्त उत्पन्न मिळत नसल्यामुळे याला जोडून अजून एखादा व्यवसाय करता येईल असे मी ठरवले.

माझे आधीचे कर्ज पुर्ण फेडून मी पुढचे कर्ज घेतले. या कर्जात मी मझ्या जवळ असलेली काही रक्कम टाकून गावातच किराणा दुकान सुरु केले. गावात किराणा दुकान कमी असल्यामुळे ते चांगले चालत आहे. मी घेतलेला निर्णय बरोबर ठरला असुन यामुळे माझे मासिक उत्पन्न आता वाढले आहे. शेतीचे येणारे अनियमित उत्पन्न व एकट्या पतीच्या पगारावर चालणारे माझे घर यातून सतत आर्थिक चनचन असायची. माझ्या या व्यवसायाने या सर्वावर मात करत मला व माझ्या कुटुंबाला आर्थिक स्थिरता मिळाली आहे. कुटुंबाच्या आवश्यक गरजा व मुलांच्या शिक्षणासाठीचा खर्च याची मला आता चिंता सतावत नाही. टप्प्याटप्प्याने मिळत गेलेल्या समताच्या कर्जातून मी आता दुकानातील माल वाढवत नेत आहे. समता सोबतच्या प्रवासात व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या पूरक गोष्टी आत्मसात करत करत पुढे आले आहे.

समताच्या विविध उपक्रमातून आम्ही सर्व बचत गटातील महिला घडत आहोत. बचतीची सवय, कर्जाचा योग्य ठिकाणी वापर यामुळे छोट्या छोट्या व्यवसायातून मोठ्या उद्योगाकडे आमची वाटचाल सुरु आहे. आता मी माझे चाळीस हजाराचे कर्ज घेऊन हे भांडवल किराणा दुकानात वापरले आहे व व्यवसाय आणखीन वाढवला आहे. माझ्यासह माझ्या गटातील इतर सभासदांनी सुद्धा आपले छोटे मोठे व्यवसाय सुरु केले असुन त्या सुद्धा आता माझ्यासारखे स्वावलंबी जीवन जगत आहेत. समतेच्या वाटेने समृद्धीकडे असा आमचा प्रवास सुरु आहे. या प्रवासात समताचे आर्थिक पाठबळ आम्हाला वेळोवेळी मिळत आहे.




| | |
|---|---|
| नाव | संजीवनी पंढरीनाथ मोरे |
| गाव | गोविंद नगर, ता.जि. बीड |
| वय | ४५ वर्ष |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | शिलाई काम |
| बचत गट नाव | शक्ती समता महिला बचत गट |

मी **संजीवनी पंढरीनाथ मोरे** पती खाजगी ट्रॅव्हल्स वर ड्रायव्हर म्हणून काम करतात. मला दोन मुली एक मुलगा आहे. वर्ष २०१५ मध्ये त्यांनी शक्ती नावाचा महिला बचत गट स्थापन केला व त्या समताच्या सभासद झाल्या. आपल्या रूढी परंपरेनुसार फक्त चूल आणि मूल एवढच स्त्रियांचे आयुष्य! रांधा–वाढा, उष्टी काढा याच्यापलीकडे त्यांचे जगच नाही. गटात आल्यामुळे आमची दरमहा गटाची बैठक होऊ लागली. बैठकीमध्ये वेगवेगळ्या विषयावर आम्ही चर्चा करत असताना आम्हाला नवनवीन माहिती मिळत गेली. गटाला सहा महिने पूर्ण होताच समता संस्थेकडून कर्ज वाटपास सुरुवात झाली. मी ही समताचे पाच हजार रुपये कर्ज घेतले. पतीचा पगार जेमतेम असल्यामुळे ते पैसे आम्ही घर खर्चासाठीच वापरले. पहिले कर्ज परतफेड झाल्यावर पुन्हा दहा हजार रुपये कर्ज घेण्याचा विचार करू लागले. पण या वेळेला ठरवलं की कर्ज घेऊन घरात खर्च न करता काहीतरी व्यवसाय चालू करायचा. समताचे कर्ज घेतले तर खरे पण या कर्जातून काय करायचं हा प्रश्नच होता.

तरी धाडस करून मी एक शिलाई मशीन घेतली व शिवनकामाचे प्रशिक्षण घेऊन घरातल्याच कपड्यांवर आधी सराव केला. यातून मी चांगले कपडे शिवायला शिकले व नंतर मी बाहेरची कामे घेऊ लागले. शिवणकामाच्या पैशातून घरातील आर्थिक गरजा भागवण्यासाठी माझ्या पतीला माझी मदत होऊ लागली. म्हणतात ना देव लागला द्यायला आणि झोळी नाही घ्यायला अगदी माझ्या बाबतीत तसेच घडत गेले. मला अचानक जडलेल्या मानसिक आजारातून सावरण्यात तीन वर्षाचा कालावधी गेला. या काळातही बचत गटात माझे पती नियमित जाऊन बचत व कर्ज हफ्ते भरत. मी पुन्हा बरी झाल्यावर गटात नियमित येऊ लागले. माझ्या आजारपणात खूप पैसा व वेळ खर्च झाल्यामुळे माझ्या व्यवसायाची घडी विस्कळीत झाली. पण जिद्दीने मी उभी राहत पुन्हा शिवणकाम करू लागले. आता पहिल्यासारखी पुन्हा माझ्या पतीला माझ्या शिलाई कामामुळे आर्थिक मदत होऊ लागली. माझं आजारपण मुलांचे शिक्षण याच्यामध्ये आम्हाला समताचा खूप आर्थिक आधार मिळाला.

मोठ्या मुलीचं लग्न ठरलं जसजसं लग्न जवळ येऊ लागलं तसतसं पैशाची जमवा जमव करत होते. पुन्हा एकदा समताने मदतीचा हात पुढे केला आणि अगदी हळदीच्या दिवशी पन्नास हजाराच कर्ज आम्हाला आमच्या मुलीच्या लग्नासाठी दिलं. आमच्या बचत गटामुळे आम्हाला सावकाराकडे वा इतर ठिकाणी जायची कधीच गरजच पडली नाही. समता पतसंस्था ही आम्हाला आमची हक्काची संस्था वाटते. कारण समताच्या कार्यकर्त्यांनी आम्हाला आर्थिक आधारासह पडत्या काळात मानसिक आधारहि दिला आहे.



| | |
|---|---|
| नाव | अनिता संतोष राऊत |
| गाव | काळेगाव हवेली, ता.जि. बीड |
| वय | ३८ वर्ष |
| शिक्षण | -- |
| व्यवसाय | शिलाई मशीन व साडी सेंटर |
| बचत गट नाव | गोरक्षनाथ समता महिला बचत गट |

**अनिता संतोष राऊत** या काळेगाव हवेली ता.जि. बीडच्या राहणाऱ्या. पावला पावलावर संघर्ष काय असतो याची कहानी म्हणजे अनिताताई. नवऱ्याला दारूचे व्यसन! या व्यसनापोटी झालेलं प्रचंड कर्ज अन उत्पन्नाचे साधन काय तर मजुरी करणे. पदराशी तीन लेकरं अन सासू सासरे असे भले मोठे कुटुंब. कर्जाचा विळखा इतका वाढत गेला कि, त्यातूनच मग नवऱ्याचे झालेलं अकाली निधन कर्जाचा भला मोठा डोंगर माथी मारून गेलं. तीन लेकरं व सासू सासरे यांचे पालनपोषण करावे का कर्जाचा डोंगर फोडावा अश्या चक्रात सापडलेलं आयुष्य. फार कमी वयात संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. मिळेल ते मजुरी काम करून कुटुंबाचं पोट भरावे लागे. दिवसांमागून दिवस जात होते रोज मजुरी करायची अन दिवस ढकलत पुढे जायचे असे चालू होते.

गावामध्ये एक अंगणवाडीची जागा रिक्त झाली होती त्या ठिकाणी गावातील लोकांनी माझा विचार अंगणवाडी सेविका म्हणून केला. उदरनिर्वाहाचे एक साधन मिळाले एवढी एकच आनंदाची घटना. मिळालेल्या नोकरीतून लढण्याचा आधार मिळाला. कधी मधी माहेरी गेल्यावर आई वडील सनावाराला त्यांना व मुलांना नवे कपडे खरेदी करत ताईनी हे घेण्यास नकार दिला व वडिलांना मला एक शिलाई मशीन घेऊन देण्याचे सांगितले व शिलाई मशीन घेतली. शिवणकाम आधीपासून येत असल्यामुळे गावातील कामे घेऊ लागल्या. जगण्याला दिशा मिळत गेली अन कष्टाला दाम मिळत गेला. २०१६-१७ सली बचत गटाच्या माध्यमातून समता संस्थेची दारे उघडली. कर्ज घेऊन शिवणकामाचे साहित्य खरेदी केले त्यातून व्यवसायाची वाढ केली. गोरक्षनाथ समता महिला बचत गटातून त्या कर्ज घेत व कधी मुलांच्या शिक्षणासाठी तर कधी व्यवसायवाढीसाठी वापर करत करत पुढे येत गेल्या. वर्ष २०२० च्या कोरोनाकाळापूर्वी समताचे कर्ज काढून साड्या इतर कपडे खरेदी करून गावात विकण्यास सुरुवात केली. कोरोनाकाळात दुकान चांगले चालू लागले व त्यातून चांगले उपन्न मिळाले. माथी असेलेला कर्जाचा डोंगर बऱ्याच अंशी कमी झाला.

सातत्याने कर्ज घेऊन त्यांनी व्यवसायात गुंतवले व व्यवसाय वाढवत नेला आहे. बचत गटाच्या बैठकीला नियमित येऊन बचत व कर्जाची परतफेड करत गेल्या. बचत गटाच्या बैठका, समताचे कार्यक्रम, मेळावे यात आवर्जून उपस्थित राहून मिळालेल्या मार्गदर्शनातून घडत गेल्या व आज एक यशस्वी लढा जिंकत उद्योजक झाल्या. आज घडीला त्यांनी पन्नास हजार कर्ज घेऊन ते आपल्या व्यवसायात गुंतवले आहे व आजही न चुकता आपला कर्जाचा हफ्ता नियमित भरतात.



| | |
|---|---|
| नाव | भाग्यश्री अंगद खांडे |
| गाव | म्हाळजजवळा, ता.जि. बीड |
| वय | २८ वर्ष |
| शिक्षण | ७ वी |
| व्यवसाय | शिवणकाम व पार्लर |
| बचत गट नाव | मोहिनीराज समता महिला बचत गट |

मी **भाग्यश्री खांडे** राहणार जवळा ता.जि. बीड येथील असून मी मोहिनीराज गटात सदस्य आहे मी समता संस्थेच्या गटामध्ये गेल्या सहा वर्षांपासून आहे. माझ्या कुटुंबात मी पती व दोन मुले असुन दोन एकर शेती आहे. पण हि शेती हलकी असल्यामुळे यातून काहीच पिक मिळत नाही. त्यात नवरा व्यसनाच्या आहारी गेलेला त्यामुळे घरात येणारे उत्पन्न नसल्यासारखेच, जे काही येत ते सासूसाऱ्याच्या हाती. बचत गटात जाण्यासाठी घरातून विरोध होता व गटात भरायला पैसाही नव्हता. माझ्या मजुरी कामाचे पैसेही मला सासू साऱ्यांच्या हाती घ्यावे लागत. नवऱ्याला व्यसन असल्यामुळे घरात सारखे भांडणे होत. त्यामुळे मला दोन तीन महिने माहेरी रहावे लागत. पण असे किती दिवस चालणार आई–वडिलांना माझा त्रास किती दिवस द्यायचा म्हणून मी ठरवले त्यांच्याकडे न राहता सासरी जाऊन लेकरा बाळांना व पतीला बाजूला घेऊन राहायचे. ठरल्याप्रमाणे आम्ही विभक्त होताच मी बचत गटात दाखल झाले व याला नवऱ्याने सुद्धा विरोध केला नाही.

बचत गटात आल्यावर नियमित बैठकातून माहिती मिळत गेली. आपल्या आजूबाजूला असंख्य महिला बचत गटाच्या माध्यमातून स्वावलंबी होऊ लागल्या. सुरुवातीचे तीन महिने गट नियमित चालल्यानंतर मी दहा हजाराचे कर्ज घेऊन घराची थोडी डागदुजी केली व एक शिलाई मशीन खरेदी केली. कर्जाचे नियमित हप्ते शिवनकामातून आलेल्या पैश्यातून भरले व पुढे जाऊन वीस हजार रुपये कर्ज घेतले. या पैश्यातून मी एक पिको फॉलची मशीन व ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण घेऊन यासाठी लागणारे काही आवश्यक साहित्य खरेदी केले. माझे शिलाईचे काम करत करत ब्युटी पार्लरची कामे सुद्धा करू लागले. पुढे जाऊन मी गावातील मुलींना ब्युटी पार्लर व शिवणकामाचे प्रशिक्षण दिले. नियमित उत्पन्नाचा चांगला आर्थिक मार्ग मिळाल्यामुळे कुटुंबाची आर्थिक स्थिती स्थिर झाली. आता मी तीस हजाराचे कर्ज घेऊन एक पत्र्याची रूम बांधली ज्यात मी आता महिला व मुलींच्या प्रशिक्षण वर्गासाठी बसायला जागा केली आहे. आता मला चांगले उत्पन्न मिळत असुन यातून माझ्या कुटुंबाच्या गरजा चांगल्या भागत आहेत त्याचबरोबर गटाची बचत, कर्ज हफ्ते नियमित भरत आहे. बचत गटाच्या माध्यमातून समताने दिलेला आर्थिक आधार मला कठीण काळात मिळाला व त्यातून कष्टाने, जिद्दीने बिकट परिस्थितीवर मात करत इथपर्यंत आले त्याबद्दल समताचे आभार.



| | |
|---|---|
| नाव | रंजना रमेश इनामदार |
| गाव | मानकुरवाडी |
| वय | ३५ वर्ष |
| शिक्षण | १२ वी |
| व्यवसाय | कपड्याचे दुकान |
| बचत गट नाव | सत्यजित समता महिला बचत गट |

**रंजना रमेश इनामदार** खरं तर मी राहणार मानकुरवाडी येथील आहे. शेती आणि घर मानकुरवाडीला आहे. ढेकनमोहा येथे जागा घेऊन एक गाळा बांधलेला आहे. दर मंगळवारी ढेकनमोहा येथील बाजार भरतो. गाळा रिकामा होता म्हणून मी थोडा कपड्याचा माल भरून तिथे दुकान चालू केलं. दर मंगळवारी मी दुकान उघडायचे एक दिवस दुकान उघडलं आणि शेजारी मैत्रिणीकडे गेले तेव्हा तिथे बचत गटाची मिटिंग चालू होती. मी माझ्या मैत्रिणीला विचारलं असता तिने मला या बचत गटाविषयी माहिती सांगितली. मग मी समता पतसंस्थेच्या कार्यकर्त्या कडून सगळी माहिती घेतली अन सत्यजित नावाच्या बचत गटाची सभासद झाले. हा गट जुना असल्यामुळे सगळ्या सभासदांनी कर्ज घेतलेल होते. संक्रातीचा महिना जवळ आला होता मी ही विचार केला की आपणही समता पतसंस्थेकडून कर्ज घेऊन साड्याचा माल भरला तर संक्रातीसाठी विकला जाईल. मी माझा अर्ज भरला व समताकडून दहा हजार रुपये कर्ज घेतले व स्वतःकडचे काही पैसे गुंतवून थोडासा साड्याचा माल भरला. संक्रातीला सगळ्या साड्या विकल्या गेल्यानंतर मग मी ते दहा हजार रुपये कर्ज परतफेड करून वीस हजार रुपये कर्ज घेतलं. मी विचार केला कोणते कपडे खरेदी केली तर नफा जास्त राहू शकतो. खेड्यामध्ये कसे कपडे लोक वापरतात त्यानुसार आम्ही हात रुमाला पासून ते टॉवेल पर्यंत सगळे कपडे खरेदी केले. दुकान चांगले चालू लागले मलाही दुकानाची जास्तच गोडी लागत गेली व शेतातलं काम नको वाटायला लागले.

मी समताच्या मेळाव्यात जेव्हा जायचे तेव्हा महिला मेळाव्यामध्ये स्वतः कसे व्यवसाय केले हे सांगत होत्या. हे पाहून मलाही प्रोत्साहन मिळालं अन् मी पुन्हा समता संस्थेकडून तीस हजाराचं कर्ज घेतलं. स्वतःच्या व्यवसायातून राहिलेला काही नफा शेतातील मालाचे काही पैसे जमा करून दुकानात जास्त माल भरला व तो विकलाही जाऊ लागला. माझ्या हे लक्षात आलं कि, माणसाला जगण्यासाठी ज्या तीन गोष्टींची गरज असते त्यातील एक म्हणजे कापड असते. त्यामुळे हा सगळ्यात जास्त उत्पन्न मिळवून देणारा व्यवसाय आहे म्हणून आम्ही ठरवलं की आता आठ दिवसाला दुकान न उघडता रोज उघडायचं. आता पुन्हा आम्ही समता कडून पन्नास हजाराचं कर्ज घेतलं अन पुन्हा मालामध्ये भर टाकली. मला माझा व्यवसाय वाढवण्यासाठी समता संस्थेकडून आर्थिक मदत झाली व व्यवसायाचे मार्गदर्शनहि मिळाले. आज आमच्या दुकानात अडीच ते तीन लाखापर्यंतचा माल आहे. आता मी असा विचार करत आहे की शक्य झालं तर दुकानात एक दोन महिला कामासाठी ठेवाव्यात जेणेकरून त्यांच्याही हाताला काम मिळेल आणि चार पैसेही मिळतील व त्यांचं कुटुंब चांगले भागेल. आज सर्वात जास्त मागणीत असणारा आणि नेहमी चालणारा हा व्यवसाय आहे.



| | |
|---|---|
| नाव | भाग्यश्री विश्वंभर खडके |
| गाव | विप्रनगर, बीड |
| वय | ४५ वर्ष |
| शिक्षण | बी.ए. |
| व्यवसाय | फुलवती, वाती, चकली |
| बचत गट नाव | गायत्री समता महिला बचत गट |

मी **भाग्यश्री खडके** गायत्री बचत गटात गेल्या दहा वर्षापासून असुन आमचा गट माझ्या माहेरी विप्रनगर बीड मध्ये आहे. माझे पती आधीपासूनच चकली व्यावसाय करत होते व मी त्यांना मदत करायचे. माझे शिक्षण बी.ए. झालेले असुन देखिल मला बाहेर नोकरीसाठी जाता येते नव्हते. मी घरात माझी दोन लहान मुले व सासु सासरे यांचा सांभाळ करत घर सांभाळत असे. पण आपण देखील काहितरी करावे असे मला सारखे वाटत होते. मी घरी पूजेसाठी फुलवाती बनवायचे त्या पाहून शेजारी राहणाऱ्या बायका आम्हाला पण अश्या बनून देत जा म्हणायच्या. मग मी विचार केला की, हाच उद्योग आपण सुरु केला तर मग मी लोकांच्या मागणीनुसार त्या बनवून देऊ लागले. दिवाळी, दसरा, गणपती, महालक्ष्मी या सणाला जास्त मागणी येऊ लागली पण वेळ पुरत नव्हता व सर्व काम हाताने करावे लागत असल्यामुळे एकट्याने ते पुर्ण करणेही शक्य नव्हते.

यातून मार्ग काढत मी फुलवाती बनवण्याची मशीन घेण्याचे ठरवले व समता बचत गटाचे तीस हजार कर्ज व स्व–भांडवल टाकून मशीन खरेदी केली व व्यवसाय जोरात सुरू केला. पुढे मग मी समताचे पुन्हा तीस हजार कर्ज व नंतर पन्नास हजाराचे कर्ज घेऊन चकली मशिन विकत घेतली. हे दोन्ही व्यवसाय मी स्वतः घरी बसूनच चालवते व माझे पती तयार केलेला माल बाजारात पोहांच करायला मला मदत करतात. स्थानिक बाजारात मी केलेल्या वाती, फुलवाती यांची मागणी चांगली असुन मी आता नागपूर, नांदेड, वाशी, परभणी, उस्मानाबाद यासारख्या जिल्ह्यात सुद्धा पुरवठा करते. वाती व फुलवाती यांची मागणी दिवसेंदिवस वाढत असुन दिल्ली व गुजरात सारख्या राज्यात पण आता पुरवठा करू लागले आहे. या व्यवसायामुळे माझ्या कुटुंबाला मोठा आर्थिक हातभार मिळाला आहे. बचत गटाच्या माध्यमातून प्रत्येक महिला स्वावलंबी होत आहे. घराच्या बाहेर न जाता देखील छोट्या छोट्या व्यवसायातून स्वतःच्या पायावर उभ्या राहत आहेत. समता संस्था बचत गटाच्या सहाय्याने आमच्या सारख्या असंख्य महिलांना आर्थिक पाठबळ देण्याचे काम सातत्याने करत आहे.




| | |
|---|---|
| नाव | छाया संजय घुमरे |
| गाव | मैदा, ता.जि. बीड |
| वय | ३७ वर्ष |
| शिक्षण | १२ वी |
| व्यवसाय | कापड दुकान, स्टेशनरी, ज्वेलरी |
| बचत गट नाव | आरती समता महिला बचत गट |

मी **छाया संजय घुमरे.** माझं गाव मैंदा आहे. माहेर दैठणा तालुका केज आहे. माझ्या कुटुंबात मी माझे पती मुलगा मुलगी आणि माझ्या सासूबाई आहेत माझे लग्न २००५ मध्ये झाले. मला त्यावेळी शेती बघून दिलेले होते व आमचे कुटुंब खूप मोठे व एकत्रच होते मला शेती असल्यामुळे पूर्ण वेळ शेतात काम करावे लागत होते. माझे शिक्षण बंद झाले होते मग मी लसीकरणाच्या निमित्ताने अंगणवाडीत गेले असता तेथे नर्सताईंची भेट झाली. माझे शिक्षण झालेले आहे हे त्यांना कळाल्यावर आशाच काम करता का असे त्यांनी विचारले. माझी पण काम करण्याची खूप इच्छा होती पण माझे पती आणि कुटुंबातील सदस्य यांनी मला आशाचे काम करण्याची परवानगी दिली नाही. माझी इच्छा असताना ते काम करता आले नाही त्यामुळे मी खूप खचून गेले. मला पुन्हा शेतातच काम करावे लागत पण काही दिवसांनी आमचे कुटुंब विभक्त झाले. शेतातील उत्पन्नावर कुटुंबाचा खर्च, मुलांचे शिक्षण होत नसल्यामुळे परिस्थिती खूप बिकट झाली. याकाळात आमच्या गावात मदतनीस व आशा या दोन्ही पदासाठी जागा निघाल्या. मग माझे कुटुंब विभक्त असल्यामुळे माझ्या पतीने मला दोन्ही कामे करण्याची परवानगी दिली व माझी आशा या पदासाठी निवड झाली.

ताडसोन्ना प्राथमिक आरोग्य केंद्रात लोक आधारित देखरेख आणि नियोजन प्रक्रियेची बैठक झाली. या बैठकीत समताच्या कार्यकर्त्यासोबत माझी भेट झाली व त्यांनी मला बचत गटाबद्दल माहिती दिली. मला पण वाटले आपण एक बचत गट केला पाहिजे मग मी आमच्या गावात आरती नावाचा बचत गट केला. तीन महिन्यांनी मला पाच हजार रुपये कर्ज मिळताच त्यातून मी स्टेशनरी सामान खरेदी केले. गटामुळे व आशाच्या कामामुळे महिलांचे माझ्याकडे येण्याचे प्रमाण वाढत होते म्हणून या स्टेशनरी सामानाची विक्री भरपूर झाली आणि मला चांगला नफा मिळत गेला. पुढे मी दुसरे रुपये दहा हजार कर्ज घेतले आणि स्टेशनरी ज्वेलरी आणि लेडीज वेअरचे कपडे आणले त्यामध्ये पण मला चांगला नफा झाला. मी आता रुपये वीस हजार कर्ज घेतले व याच व्यवसायात गुंतवले. बचत गटाचा लाभ माझ्यासह इतर महिलांना सुद्धा व्हावा म्हणून मी रोकडेश्वर, समर्थ, मनस्वी हे आणखी तीन बचत गट समताला जोडले.

सध्या मी तीस हजार रुपये कर्ज घेतलेले आहे आणि त्या कर्जातून मी साड्यांचा माल भरला आहे. त्यामुळे आता माझा स्टेशनरी आणि कपड्यांचा व्यवसाय व्यवस्थित वाढला आहे आणि माझे उत्पन्नही वाढले आहे. गटात येण्याआगोदर शेतीच्या उत्पन्नावर माझे काहीच भागत नसायचे पण आता माझ्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीमध्ये चांगला बदल झाला आहे. माझ्या मुलाचे शिक्षण व पती शेतात काम करतात आणि व्यवसायालाही मला हातभार लावतात. मुलगी शिक्षण घेत पार्लरचाही कोर्स करत आहे. त्यामुळे माझ्या कुटुंबाला स्थैर्य प्राप्त झाले आहे. याचे सर्व श्रेय समता परिवाराला आणि त्यांच्या उद्योजकता विकासाच्या कामाला जाते.




| | |
|---|---|
| नाव | ज्योती विलास काळे |
| गाव | पालवन |
| वय | ३० वर्ष |
| शिक्षण | ७ वी |
| व्यवसाय | गिरणी / काडणयंत्र |
| बचत गट नाव | आरोही समता महिला बचत गट |

**ज्योती विलास काळे** या मध्यमवर्गीय कुटुंबातील असुन त्या पालवन चौक, बीड येथे राहतात. कुटुंबात सात सदस्य असल्यामुळे बऱ्यापैकी मोठे कुटुंब. सहा वर्षापूर्वी त्यांचा अन बचत गटाचा प्रवास सुरु झाला. आरोही समता बचत गटाच्या सभासद असलेल्या ताई गटाच्या बैठकीला येऊन नियमित बचत भरत असत. सुरुवातीला पाच हजाराचे कर्ज त्यांनी घेतले होते. पहिल्या कर्जाचा नियमित भरणा करून त्यांनी दुसरे दहा हजाराचे कर्ज घेतले. या घेतलेल्या कर्जातून त्यांनी पिठाची गिरणी घेतली व आपल्या छोट्या व्यवसायाला सुरुवात केली. येणारे उत्पन्न यातून त्या कर्जाचा हफ्ता व बचत नियमित भरू लागल्या. कोणत्याही व्यवसायाची सुरुवात चांगली झाली कि, आत्मविश्वास आपोआप वाढत जातो. मग मागे वळून न बघता सतत पुढे जाण्याचा लढा सुरु होतो. थांबला तो संपला या उक्तीप्रमाणे त्याही थांबल्या नाहीत. आपले आधीचे कर्ज फिटल्यानंतर त्यांनी पुढचे कर्ज घेतले व मिरची कांडण मशीन घेऊन आपल्या व्यवसायाच्या कक्षा वाढवल्या. आधीच्या व्यवसायाला नव्या व्यवसायाची जोड दिली.

दरमहा होणाऱ्या उत्पन्नात आता वाढ झाली हि वाढ कुटुंबाच्या आर्थिक गरजांचा आधार झाली. व्यवसायातले सातत्य राखताना कुटुंबाच्या जबाबदाऱ्या सुद्धा त्यांनी यशस्वीपणे सांभाळल्या. बचत गटाची शिस्त त्यांनी आपल्या व्यवसायात व कुटुंबात सारखीच पाळली व यशाची एक एक पायरी चढत गेल्या. आधीचे कर्ज फेडून पुढचे कर्ज घेऊन त्या कधी कुटुंबासाठी तर कधी आपल्या व्यवसायासाठी त्याचा वापर करतात. त्यांचा आरोही समता महिला बचत गेल्या सहा वर्षापासून नियमित सुरु असुन गटातील महिला नियमित बैठकीला व समताच्या विविध कार्यक्रम, मेळावे, शिबीर यांना उपस्थित राहतात.





| | |
|---|---|
| नाव | मीना पांडुरंग जोगदंड |
| गाव | गोरेवस्ती, ता.जि. बीड |
| वय | ४५ वर्ष |
| शिक्षण | ४ थी |
| व्यवसाय | किराणा दुकान |
| बचत गट नाव | अस्मिता समताशक्ती महिला बचत गट |

**मीना पांडुरंग जोगदंड** याचं माहेर शिंप्पेगाव ता.गेवराई. सासर कमळेश्वर धानोरा तालुका शिरूर. एक वर्ष मामाच्या इथं राहिले व विचार केला आपण किती दिवस इथे मामाकडे राहणार आहोत. दोन लेकरं आहेत त्यांचेही काहीतरी भविष्य घडवायचं म्हणून मी बीड शहरात रहायला आले. त्यात शिक्षणही खूप कमी मग मी लोकांच्या घरी धुन्या भांड्याची कामे करू लागले. काही काळानंतर दवाखान्यामध्ये मावशीचे कामही करू लागले. धुन्या भांड्याच्या कामातून घर खर्च भागत होता व दवाखान्याचा पगार शिल्लक राहत होता. काही वर्षानंतर साठवलेले काही पैसे आणि व्याजाने काही पैसे काढून गोरे वस्ती येथे एक प्लॉट घेतला आणि शेड ठोकून राहू लागले. गल्लीतील सगळ्या महिलांशी चांगली ओळख झाली होतीच व एक दिवस आम्ही काही महिलांनी मिळून बचत गट करायचा ठरवलं.

आम्हाला बचत गटाची काहीच माहिती नव्हती पण मधल्या काळात समताच्या काही कार्यकर्त्या कौटुंबिक हिंसाचारावर सर्वे करण्यासाठी आमच्या घरी आल्या होत्या तेव्हा त्यांनी त्यांचा मोबाईल नंबर आम्हाला दिला होता. आम्ही सगळ्यांनी मिळून त्यांना फोन करून बोलावून घेतले व समता संस्थेचा बचत गट चालू केला. सहा महिन्यानंतर समता संस्था आमच्या बचत गटाला कर्ज वाटप करू लागली. मी स्वतः पाच हजार रुपये कर्ज घेतले व हे पैसे आणि काही सासवलेले पैसे मिळून ज्याच्याकडून व्याजाने काढले होते त्याला परत देऊन टाकले. पुन्हा समता पतसंस्थेकडून दहा हजाराचे कर्ज घेतले व काही पैसे घर खर्चासाठी वापरले राहिलेल्या पैशात पत्र्याच्या शेडच अर्धवट राहिलेलं काम पुर्ण केलं. या माझ्या संघर्षाच्या काळात मुलं कधी मोठे झाले हे कळलं सुद्धा नाही. एक दिवस विचार केला किती दिवस लोकांच्या हाताखाली काम करायचं आपणही स्वतः काहीतरी केलं पाहिजे म्हणून मी किराणा दुकान टाकायचं ठरवलं व समता संस्थेच राहिलेल पूर्ण कर्ज भरलं.

समता पतसंस्थेच्या कर्जाचे व्याज कमी असल्यामुळे आम्हाला हे कर्ज घेणे परवडत होतं. वीस हजार रुपये कर्ज घेऊन त्याचा किराणा माल भरला व दुकान सुरु केले. आता माझे दुकानही चांगले चालत आहे. मी तर माझ्या पायावर उभी राहिलेच पण माझी मुलेही त्यांच्या स्वतःच्या पायावर उभी आहेत. आता मी दुसऱ्याच्या येथे कामाला जात नाही कारण मी स्वतः आता दुकानाची मालकीण आहे. आजच्या घडीला समता संस्थेचे माझ्याकडे तीस हजार कर्ज असुन मी ते दुकानातील मालासाठीच वापरले आहे. दुकानातून जो नफा होतो त्याच्यामध्ये माझे घर आणि कर्जाचा हप्ता व बचत मी सहज भरू शकते. समताने मला माझ्या संघर्षाच्या काळात खूप मोठा आर्थिक आधार दिला.



| | |
|---|---|
| नाव | उषा बालाजी गळांगे |
| गाव | बहिरवाडी, ता.जि. बीड |
| वय | ४० वर्ष |
| शिक्षण | १२ वी |
| व्यवसाय | टेलरिंग, फॅशन डिझायनर |
| बचत गट नाव | मोगरा समताशक्ती महिला बचत गट |

मी **उषा गळांगे** माझे माहेर परभणी येथेच माझा लेडीज टेलरिंगचा कोर्स पूर्ण झाला होता. बहिरवाडी हे माझे सासर असुन मोठे एकत्रित कुटुंब. कौटुंबिक कारणास्तव मला स्वतंत्र व्हावे लागले. माझा टेलरिंगचा कोर्स हा आधीच झाला असल्याकारणाने मी एक शिलाई मशीन विकत घेतली व टेलरिंग व्यवसायाला सुरुवात केली. बहिरवाडी गाव हे छोटे असल्याकारणाने येथे माझ्या त्या व्यवसायाला हवी तशी गती मिळाली नाही. बचत गटातून कर्ज मिळते हे माहीत होते. आम्ही घरच्या चार जणी व शेजारच्या काही अशा १५ महिलांचा मिळून मोगरा नावाचा गट स्थापन केला. गटाच्या माध्यमातून सहा महिन्यानंतर आम्हाला प्रत्येकी पाच हजार कर्ज समता बचत गटातून मिळाले. मी माझे पाच हजार व बारक्या जावेचे पाच हजार कर्ज घेऊ आणखी एक पिको फॉलची मशीन विकत घेतली. टेलरिंग आणि पिको फॉल हे दोन्ही व्यवसाय मी बहिरवाडी येथे करत होते. या व्यवसायामधून येणाऱ्या पैशातून मी माझ्या कुटुंबाचा व मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवत होते.

दहा हजार कर्ज घेतल्यानंतर ते कर्ज मुलाच्या शिक्षणासाठी वापरले. घर लहान होते टेलरिंग साठी येणाऱ्या बायकासाठी घरामध्ये जागा कमी पडत होती. त्यामुळे बामणवाडी परिसरात एक छोटा गाळा किरायाने घेतला. समताचे वीस हजार कर्ज घेऊन दोन शिलाई मशिन विकत घेतल्या व घरच्या पिको फॉल मशीनसह व्यवसायाला सुरुवात केली. हाताखाली छोट्या जावेला घेऊन तिला देखील टेलरिंगचे काम शिकवले यामुळे व्यवसायात मदत झाली. टप्प्याटप्प्याने व्यवसाय वाढत जात असताना मी आणखीन पन्नास हजाराचे कर्ज काढून याच व्यवसायात गुंतवले आहे. व्यवसायात चांगला जम बसल्यावर मी आता शिवणकामाचे महिलांना व मुलींना प्रशिक्षण देणे सुरु केले आहे. यातील बऱ्याच जणींनी आपले छोटे व्यवसाय सुरु केले आहे. समताने मला कठीण काळात आर्थिक पाठबळ दिले त्यामुळे मला इथपर्यंतचा पल्ला गाठता आला. माझा गट अन व्यवसाय आजही चांगले चालू आहे.



| | |
|---|---|
| नाव | सरस्वती बाबासाहेब ठाकरे |
| गाव | स्नेह नगर, सटवाई मैदान, बीड |
| वय | ४२ वर्ष |
| शिक्षण | ५ वी |
| व्यवसाय | टेलरिंग, फॅशन डिझायनर |
| बचत गट नाव | जिज्ञासा समता महिला बचत गट बीड |

मी **सरस्वती ठाकरे** राहणार बीड सहा वर्षापासून बीडमध्ये स्नेहनगर मध्ये राहते. मी समताची गेल्या सहा वर्षापासून सभासद आहे. आमच्या कुटुंबामध्ये मजुरी करणे एवढे एकच उत्पन्नाचे साधन. माझे पती पलाऊडच्या दुकानांमध्ये हमालीचे तर मुलगा कलरची गुत्तेदारी करण्याचे काम करतो. मजुरीच्या कामांतून कुटुंब कसे बसे चालत होते. मुलांच्या शिक्षणाचं व मुलीच्या लग्नाचा खर्च असे भले मोठे कर्ज झालेले. मजुरी करून लोकाचे देणे फिटत नव्हते म्हणून मी काहीतरी उद्योग व्यवसाय करण्याचे ठरवले व समताच्या गटामध्ये दाखल झाले. मी समताच्या प्रत्येक कार्यक्रमात जात असे व त्या कार्यक्रमात मला व्यवसाय करणाऱ्या महिलांची माहिती मिळत होती. मला पण वाटत होत आपणही असा एखादा छोटा व्यवसाय केला पाहीजे. त्यातून मग मी माळवं विकन्याचा व्यवसाय करायचा असे ठरुवून बचत गटामधून पहिले कर्ज दहा हजार रुपये घेतले व यासाठी आवश्यक कॅरेट, तराजू, टोपले याची खरेदी केली.

माळव्याचा माल घेतला व माझ्या व्यवसायाला सुरुवात केली. सुरुवातीला व्यवसाय म्हणावा तसा चालत नव्हता कारण त्यातून फारच कमी पैसे मागे उरत होते. पण खचून न जाता मी आणखीन माल वाढवाला व माझ्या नफ्यात वाढ होत गेली. दुसरे वीस हजाराचे कर्ज घेऊन मी आणखी माळवं व फुलांचा माल घेण्यात वापरले. विविध प्रकारचे फुले घेऊन त्यांचे हार बनवायला व ते विकायला सुरुवात केली. आता पहिल्यापेक्षा जास्त नफा मला राहू लागला. मी आता आणखीन कर्ज घेऊन याच व्यवसायात गुंतवले असुन व्यवसायाला मोठे स्वरूप दिले आहे. आता माझा व्यवसाय खूप चांगला चालत असुन मला दिवसाला आठशे ते एक हजारापर्यंत नफा मिळतो आहे.

आतापर्यत मी किरायाच्या घरात राहत होते पण आता मी माझ्याकडील काही व पैसे व समताकडून घेतलेल्या कर्जातून मला स्वतःचा प्लॉट घ्यायचा आहे. या प्लॉटमध्ये पत्राचे शेड मारून स्वतःचे घर तयार करायचे आहे. मला विश्वास आहे की समताचे आर्थिक पाठबळ जोपर्यंत माझ्या पाठीशी आहे तोपर्यंत चिंता नाही. मला समताच्या गटात आल्यापासून व्यवसायासाठी आवश्यक वेगवेगळ्या गोष्टीची माहिती मिळत गेली व त्यातून माझी आर्थिक परिस्थिती बदलत गेली. मी जर समतामध्ये आली नसते तर माझ्यात हा बदल झालाच नसता असे मला वाटते.



| | |
|---|---|
| नाव | विमल मोहन चव्हाण |
| गाव | दगडी शहाजनपुर |
| वय | ४५ वर्ष |
| शिक्षण | ५ वी |
| व्यवसाय | कुक्कुटपालन |
| बचत गट नाव | मा जिजाऊ समता महिला बचत गट |

मी मागील अकरा वर्षांपासून समता बचत गटाशी जोडलेली आहे, माझे माहेर बीड आहे. माझा जन्म सुशिक्षित कुटुंबात होऊन देखील आईच्या आजारपणामुळे आईने माझे पाचवीचे शिक्षण झाले की, लवकर लग्न करून दिले. सासरची परिस्थिती गरिबीची होती त्यामुळे कष्ट करायची सवय नसताना खूप कष्ट करावे लागले. पती मिस्त्रीच्या हाताखाली काम करत होते आणि मी घरच्या एक एकर शेतात. अतिशय हलाखीच्या आणि कष्टाच्या परिस्थितीमध्ये आम्ही दिवस काढले. मी शेतात एकही मजूर न लावता बाईचे आणि गड्याचे सर्वच काम स्वतः केले आणि आमच्या दोघांच्या कामातून आलेल्या पैशातून एक एकर शेती विकत घेतली. वरचेवर कष्ट करून शेती खरेदी करत गेलो आज पाच एकर पाण्याखालची शेती आहे. तीन मुले झाली तिघांचेही उच्च शिक्षण पूर्ण झाले असुन माझा मोठा मुलगा MBBS झाला आहे. मी शेतात काम करीत होते पण माझ्या हातात खर्चाला पैसे नसायचे. अकरा वर्षांपूर्वी मी समता बचत गटात आले व पाच हजाराच्या कर्जापासून कर्ज घ्यायला सुरुवात केली.

पहिल्या कर्जातून घेतलेल्या शेळीने मला एक लाखाचे उत्पन्न दिले. जसजसे शेळ्याच्या उत्पन्नातून पैसे मिळत गेले तसतसे मी आणखी शेळ्या घेत गेले. पुढे मी या शेळीपालन व्यवसायातून गाय आणि म्हैस खरेदी केली. घरचे दूध आणि तुपाचेही उत्पन्न सुरू झाले असुन सध्या मी चाळीस हजार रुपये कर्ज घेऊन कुक्कुटपालन सुरू केलेले आहे. आज माझ्याकडे जवळजवळ तीनशे गावरान कोंबड्या आहेत. कोंबड्या आणि गावरान अंडे याचेही उत्पन्न आता मला मिळू लागले आहे. या सर्व जोड धंद्यातून येणाऱ्या उत्पन्नामुळे मी स्वयंपूर्ण झाले आहे. माझ्या बचत गटाची बचत आणि कर्ज हप्ते तसेच दैनंदिन खर्चासाठी मला पतीला किंवा मुलांना पैसे मागण्याची गरज पडत नाही. त्यामुळे समता बचत गटाची मी खूप खूप आभारी आहे. सर्वांनी बचत गटातून मिळणाऱ्या कमी व्याजाच्या कर्जाचा उपयोग करून घेऊन स्वावलंबी व्हावे.



| | |
|---|---|
| नाव | शेजवळ राणी संगपाल |
| गाव | बहिरवाडी |
| वय | ३५ वर्ष |
| शिक्षण | ७ वी |
| व्यवसाय | किराणा दुकान |
| बचत गट नाव | संत सेना महाराज समता महिला बचत गट |

मी **राणी शेजवळ** शिर्डी येथील राहणार असुन घरच्या काही अडचणीमुळे मी व माझे पती बीड येथे राहण्यासाठी आलो. पती किराणा दुकानावर कामासाठी लागले व मी घर सांभाळायचे. फक्त नवऱ्याच्या पगारावर बीडमध्ये घर भाडे व घर खर्च भागत नव्हता. आपणही काहीतरी करावे असे सतत वाटत होते पण करणार काय? शिक्षण कमी असल्यामुळे कुठे नोकरीही मिळत नव्हती. जवळ जी काही शिल्लक होती त्यातून बहिरवाडी येथे एक शेड किरायानी घेतले व छोटे किराणा दुकान सुरु केले. बीड ते बहिरवाडी असे रोज जाऊन येऊन दुकान चालवत होते. कोणताही व्यवसाय करायचा म्हणले कि, भांडवल लागतच असते मग तो कितीही छोटा असो वा मोठा! अतिशय कासव गतीने दुकान सुरु होते. बहीरवाडी येथे काही महिला बचत गट करणार होत्या मी देखील माझे नाव गटात दिले. सुरुवातीला मला पाच हजाराचे कर्ज समता बचत गटाने दिले. भांडवलाची सर्वात मोठी चिंता दूर झाली. मिळालेल्या कर्जातून किराणा दुकानात मालासाठी वापरले. दुकानातले समान वाढल्यामुळे गि-हायीक सुद्धा वाढत गेले. व्यवसायाला दिशा अन गती दोन्ही मिळाली. आता थांबून जमणार नाही म्हणून पुढचे कर्ज घेऊन साड्याचा माल भरला व दुकान मोठे केले.

अडचणीच्या काळात एखादा मदतीचा हात मिळाला कि, कष्ट, परिश्रम व जिद्दीला नवा हुरूप मिळतो अन टप्प्याटप्प्याने प्रगतीची दारे उघडत जातात. असा हात समताने मला अगदी योग्य वेळेला दिल्यामुळे मी थांबले नाही. मी आता बहिरवाडी येथे स्वतःची जागा घेतली आहे. या जागेवर मी दोन खोल्याचे घर बांधून घराजवळच तुळजाई नावाचे दुसरे किराणा दुकान सुरु केले आहे. आता हि दोन्ही दुकाने मी व माझे पती मिळून चालवत आहोत. सावकाराचे कर्ज घेण्यापूर्वीच मी बचत गटात जाण्याचा निर्णय घेतला तो किती योग्य होता हे आज मागे वळून पाहताना जाणवत राहते. बचत गटात आल्यापासून मला कधीच भांडवलाची चिंता राहिली नाही कारण समता नेहमी माझ्यासोबत होती. आजही मी समताचे पन्नास हजाराचे कर्ज घेऊन व्यवसायात गुंतवले असुन माझ्या बचत व कर्जाचे हफ्ते न चुकता नियमित भरते आहे. समताच्या विविध कार्यक्रम, शिबीर,मेळावे यांना उपस्थित राहून अजूनही शिकतेच आहे.



| | |
|---|---|
| नाव | शालन अशोक उमप |
| गाव | नामलगाव फाटा, घोसापुरी |
| वय | ४५ वर्ष |
| शिक्षण | १० वी |
| व्यवसाय | किराणा दुकान |
| बचत गट नाव | गणराज्य समता महिला बचत गट |

माझे नाव **शालन अशोक उमाप** असुन माझे माहेर कुमशी आहे. माझे शिक्षण दहावीपर्यंत झाले अभ्यासाची मला खूप आवड होती. दरवर्षी वर्गात पहिला नंबर येत होता पण घरी अत्यंत गरिबी अगदी अठरा विश्व दारिद्र्यच म्हणा ना!! आम्ही सहा बहिणी आणि एक भाऊ भाऊ एवढ्यांचे पोट भरणे हीच जबाबदारी आई वडिलांसाठी खूप जास्त होती. त्यामुळे शिक्षणाचा विचारच केला नाही. मी अभ्यासात हुशार म्हणून दहावीपर्यंतचा माझा शिक्षणाचा खर्च माझ्या शिक्षकांनीच केला. त्यावेळी माझा डीएडला नंबर लागला होता. डीएड साठी दहा हजार रुपये खर्च येत होता पण वडील म्हणाले 'दहा हजार रुपयात तुझं लग्न होऊन जाईल' तुझा शिक्षणाचा खर्च मला परवडत नाही. त्यानंतर लगेचच वडिलांनी माझे लग्न करून दिले. तेव्हा माझे पती मजुरीचे काम करत होते व गरज पडली तर मी पण धूनी भांड्याचे काम करू लागले. त्यानंतर माझ्या पतींना सासऱ्यांच्या जागेवर शाळेत शिपायाची नोकरी लागली. आम्हाला तीन मुली आणि एक मुलगा अशी अपत्य झाली.

सर्वांचे शिक्षण केले आणि मध्येच आमच्यावर जीवघेणे संकट ओढावले. माझ्या पतींचा खूप मोठा अपघात झाला!! त्यांचा जीव वाचला हेच मोठे म्हणायचे. या त्यांच्या अपघातामुळे दवाखान्याच्या खर्चात १८ लाख रुपये गेले. त्यासाठी अनेकांनी सढळ हाताने स्वतः होऊन लाखो रुपयांची मदत केली आणि आमची वेळ निभावून नेली. नंतर घरी परतल्यानंतर मी आमची थोडी शेती विकून सर्व लोकांचे देणे देऊन टाकले. मुलांचे शिक्षण लग्न आणि पतीच्या जीवघेण्या दवाखान्याचा खर्च यामुळे आर्थिक घडी चांगलीच कोलमडली होती. हळूहळू मूळ पदावर आणली. सहा वर्षांपूर्वी मी समता बचत गटात आले. गणराज्य समता महिला बचत गट हा बचत गट केला. त्यातून कर्ज घेऊन सुरुवातीला कौटुंबिक गरजा भागवल्या पण हाताशी खर्चाला पैसाच येत नव्हता, शिल्लक राहत नव्हता. त्यामुळे स्वतःचा उद्योग करायचे ठरवून आमच्या फाट्यावरील वस्तीवर किराणा दुकान नसल्याकारणाने दुकान टाकायचे ठरवले.

बचत गटाच्या वीस हजाराच्या कर्जातून छोटेसे किराणा दुकान टाकले. त्यातून चांगलाच नफा राहतोय हे लक्षात आले त्यामुळे दुकानांमध्ये वाढ करायचे ठरवले आणि तीस हजार रुपये कर्ज घेऊन आणखी किराणा माल भरला. आता नफ्यात आणखी वाढ झाली आहे त्यामुळे माझा उत्साह आणखी वाढला आहे. मी रोडवर गाळा घेऊन मोठे किराणा दुकान टाकायचे ठरवले. पण ज्यांचा गाळा घेण्यासाठी विचारले त्यांनी स्वतःच दुकान टाकले त्यामुळे माझी संधी हुकली. पुढील कर्ज घेऊन गाळा घेऊन दुकान टाकायचे असे मी ठरवले आहे. बचत गटाच्या कर्जामुळे मी स्वयंपूर्ण झाले असुन समताचे खूप खूप आभार.

नोंदणी क्रमांक :- बीएचआर/(बीएचाआर)/बीएनके/४०१/२००८ दिनांक २९.०९.२००८

# बीड तालुका समता महिला बचत गट सदस्यांची सहकारी पतसंस्था (म.)

## संचालक मंडळ

(२०२३ ते २०२८)

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | आयोध्या नामदेव टपले | अध्यक्ष |
| २ | कुरे मंगल पाराजी | उपाअध्यक्ष |
| ३ | छाया नितिन गवळी | सचिव |
| ४ | मगर करुणा संजय | संचालिका |
| ५ | वैशाली काकासाहेब कानडे | संचालिका |
| ६ | थिगळे उषा गोपाळराव | संचालिका |
| ७ | स्वाती प्रमोद गोले | संचालिका |
| ८ | शेख रेशमा मेहराज | संचालिका |
| ९ | दैवशाला सुंदरराव दुबाले | संचालिका |
| १० | मंगल सदाशिव शिंदे | संचालिका |
| ११ | दिपाली उमेश शेटे | संचालिका |
| १२ | कावेरी गवळीराम देवकते | संचालिका |
| १३ | अर्चना अनंता आवारे | संचालिका |
| १४ | हरगंगे त्रिंबक भगवानराव | तज्ञ संचालक |
| १५ | संतोष बाबाराव प्रभावती | तज्ञ संचालिक |




## समताशक्ती

प्रकाशक

समता प्रतिष्ठान संचालित

**समताशक्ती महिला नागरी सहकारी पतसंस्था म., बीड**

**समता महिला बचत गट सदस्यांची सहकारी पतसंस्था म. बीड**

कार्यालय : १/२/२७, लोकायत, ऑफिसर्स कॉलोनी, नगर रोड, बीड ४३११२२